# माणूस

शनिवार । ३१ मे १९७५ । एक रुपया



यांची मागणी अवास्तव व अन्याय्य नव्हती


# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ३१ मे | अंक : बावन्नावा (५३) |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


## गुडस् टॅक्स वसूल करून सरकारजमा न करणाऱ्या मालकांविरुद्ध

# मिसा कायद्याचा वापर का नाही ?

मुंबईपासून कल्याणपर्यंतच्या परिसरात २५ हजार माथाडी कामगार आहेत. त्यापैकी वाहतूकधंद्यातील ५ हजार कामगार ३५ टक्के महागाईभत्तावाढीच्या मागणीसाठी २८ एप्रिल १९७५ पासून बेमुदत संपावर होते. त्यांना पाठिंबा देण्यासाठी सर्वच्या सर्व माथाडी कामगारांनी १२ मे रोजी लाक्षणिक संप केला आणि सचिवालयावर मोर्चा काढून मुख्य मंत्र्यांना निवेदन दिले. त्यांना ३५ टक्के महागाईभत्ता वाढवून देण्याचे आवाहन मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांनी केले होते; पण मालकांकडून त्याला प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा माल घेऊन बाहेरगावी जाणारे ट्रक अडविण्याचा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्स्पोर्ट आणि जनरल कामगार युनियनने २१ मेपासून सुरू केला. पहिल्याच दिवशी ७५० हून अधिक मालट्रक अडवून ८७८ निदर्शकांनी अटक करवून घेतली.



संपनेते श्री. अण्णा पाटील

मुंबईसारख्या शहरात असंघटित व असुरक्षित कामगारांचा मोठा वर्ग होता व आहे. श्री. अण्णा पाटील, ज्ञानदेव गोळे, राघू विठोबा पोपळे प्रभृतींनी ९ ऑगस्ट १९६२ रोजी ४ हजार माथाडी कामगारांना एकत्र आणून मोर्चा काढला व संप केला. त्या संपात त्या वेळचे मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्वरित हस्तक्षेप केला आणि कामगारांना मजुरीत २५ टक्के वाढ मिळाली. तेव्हापासून त्यांची युनियन आपल्या मागण्यांसाठी सतत झगडत आहे.

१९६२ पूर्वीचा माथाडी कामगार व आजचा माथाडी कामगार यात खूप बदल घडून आला आहे. त्यांची युनियन व युनियनचे नेते त्याला मुख्यत: कारणीभूत आहेत. मुंबईची घाऊक बाजारपेठ व सर्व तऱ्हेच्या मालाची वाहतूक जरी महाराष्ट्रीय मालकांच्या हातात नसली तरी या क्षेत्रांची कारभारयंत्रणा मात्र चालवतो महाराष्ट्राचा माथाडी कामगार !

हा माथाडी कामगार म्हणजे कोण ? सांगली, सातारा, नगर, पुणे जिल्ह्यांतल्या खेड्यांतून शेतीवर गुजराण होत नसल्यामुळे कुटुंबाचे शेकडो पोशिंदे पोटासाठी मुंबईत येतात. गोदीत, बाजारपेठांत, वाहतूक कंपन्यांत मालाची चढउतार करतात. शंभर किलोचे पोते खांद्यावर, पाठुंगळीवर किंवा माथ्यावर घेऊन ट्रकवर चढवणे, ट्रकमधून गुदामात नेणे, रेल्वेवाघिणीतून धक्क्यावर उतरवणे हा अक्षरश: घाम गळणारा पेशा हे पोशिंदे पत्करतात. म्हणून माथ्यावर पोती घेतो तो माथाडी ! पूर्वी त्याला कुली, हमाल, गडी, घाटी म्हणून संबोधत; पण पोटासाठी राबणाऱ्या या श्रमिकांची अवहेलना युनियनने दूर केली व तो माथाडी या नावाने ओळखला जाऊ लागला.

युनियन स्थापन होण्यापूर्वी त्यांच्या टोळ्या असत. टोळीचा मुकादम आपल्या गावची माणसे आणून टोळी बनवी. मिळालेली सर्व मजुरी मुकादम सर्वांना सारखी वाटी; पण काही मुकादम जास्त रक्कम आपल्या कनवटीला लावीत व इतरांना अल्प मजुरी देत. त्यामुळे मजुरात असंतोष होता. मुकादमाच्या लहरीवर काम आणि दाम अवलंबून असे.

श्री. अण्णा पाटील पूर्वी गोदीत कामाला होते. ते मूळचे मंद्रूळकोळे (सातारा) गावचे. या असंघटित कामगारांची पिळवणूक

त्यांनी पाहिली होती. अखेर त्यांनी त्यांची संघटना उभारली. इंटकशी संलग्न असणारी माथाडी युनियन लढाऊ आहे.

१९६२ चा त्यांचा पहिला संप यशस्वी झाल्याने संपूर्ण माथाडी कामगारवर्ग युनियनमध्ये सामील होऊ लागला. १९६६ मध्ये ८ दिवसांच्या संपाने माथाडी कामगारांना महागाईभत्ता मिळू लागला. नंतरच्या ४ वर्षांत काही प्रमाणात वेतनवाढ मिळत गेली.


१९६६ चा करार ही एक महत्त्वाची घटना मानली जाते. कारण या करारानुसार कामगारांना सुरक्षित जीवन जगता यावे म्हणून प्रमुख धंद्यात १९७० पासून कामगारमंडळे (बोर्ड) स्थापन होत गेली. अशी मंडळे स्थापन करून कामगारांना संरक्षण देणारे महाराष्ट्र हे भारतातले पहिलेच राज्य.

मंडळात रजिस्टर असलेल्या कामगारालाच आज काम दिले जाते. काहींना वेतन, प्रॉव्हिडंड फंड, रजा, रजेचा पगार, ओव्हरटाइमभत्ता, नोकरीची शाश्वती आदी सवलतीही मिळतात. ही सर्व रक्कम मालकाने मंडळाकडे भरावयाची आणि मंडळाने कामगाराला द्यावयाची, अशी व्यवस्था आहे. त्यामुळे मालक किंवा मुकादम यांच्याकडून मजूर फसवला किंवा पिळला जाण्याची शक्यता नाही.

युनियनचे संयुक्त सरचिटणीस काशिनाथ पं. वळवईवर यांचे म्हणणे असे की, युनियनने उठसूठ संपाचा मार्ग अवलंबिलेला नाही. अर्जविनंत्या, चर्चा, मोर्चे, निदर्शने, वाटाघाटी आदी मार्गांचा अवलंब करून नाइलाज झाला म्हणजे अखेर संप केला जातो. पण संपातही, अन्नधान्य, साखर, औषधे व जीवनावश्यक वस्तूंवाचून सामान्य माणसाचे हाल होणार नाहीत, याची कटाक्षाने दक्षता घेतली जाते.

वाहतूकधंद्यातील ५ हजार माथाडी कामगारांच्या महागाईभत्त्यात ३५ टक्के वाढ व्हावी, ही मागणी अवास्तव वा अन्याय्य नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीही ती मान्यकरण्याचे आवाहन केले आहे. पण व्यर्थ. बॉम्बे गुडस् ट्रान्स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सेविंदरसिंग रेखी यांनी जाहिराती देऊन संपाविषयी विपर्यस्त माहिती जनतेपुढे ठेवली, असे श्री. अण्णा पाटील यांचे म्हणणे आहे.

कामगार आयुक्तांच्या कार्यालयात असोसिएशनशी १९६६ मध्ये युनियनचा करार झाला. त्यानुसार निर्देशांकाच्या वाढीप्रमाणे महागाईभत्ता वाढविण्याचे तत्त्व ठरले होते. १९७१ मध्ये ट्रान्स्पोर्ट लेबर बोर्ड स्थापन झाले. १९६६ च्या करारानुसार १९७१ मध्ये ४ टक्के व १९७२ मध्ये ९ टक्के वाढ देण्यात आली. १९७३ मध्ये निर्देशांकाप्रमाणे १६ टक्के वाढ देण्याचा आदेश कामगार आयुक्तांनी दिला. पण मालकांनी विरोध केला. पुढे ११ दिवस संप झाला. मजूरमंत्री नरेंद्र तिडके यांच्या मध्यस्थीने संप मिटला व महागाईभत्त्यात १६ टक्के वाढ देणे मालकांना भाग पडले. लेबर बोर्डात तसा




**संप काळात रस्त्यारस्त्यावर असे ट्रक्स अडवले गेले.**

ठराव झाला. पण त्यानुसार १६ टक्के वाढ देण्यास मालकांनी मे १९७४ पर्यंत वेळ लावला.

त्यानंतर १९७४ मध्ये महागाईभत्ता ३५ टक्क्यांनी वाढवून देण्याचा आदेश (१९६६ च्या करारानुसार) कामगार आयुक्तांनी मालकांना दिला. ट्रान्स्पोर्ट लेबर बोर्डाने मालकांना तशी समज दिली. पण मालकांनी टाळाटाळ केली. तेव्हा ३० नोव्हेंबर १९७४ रोजी बोर्डाने तसा ठरावच केला. त्या ठरावानुसार १ डिसेंबर १९७४ पासून ३५ टक्के वाढ द्यावी, असा मालकांना आदेश देण्यात आला.

त्यानुसार ६ वाहतूक कंपन्यांनी बोर्डात वाढीव पैसे भरले. इतरही कंपन्या तयार झाल्या होत्या. पण ट्रान्स्पोर्ट असोसिएशनने ताबडतोब सर्व कंपन्यांना पत्र पाठवून 'वाढ देऊ नये व परस्पर व्यवहार करू नये,' असा आदेश दिल्यामुळे संपावर जाणे भाग पडले, असे श्री. अण्णा पाटील यांचे म्हणणे आहे.

माथाडी कामगारांना ३५० ते १६०० रुपये मासिक उत्पन्न मिळते, या श्री. रेखी यांच्या विधानाबद्दल विचारता श्री. अण्णा पाटील म्हणाले : एवढे वेतन मिळाले असते तर संप करावा लागला नसता. माथाडी कामगारांना किमान १२९ व कमाल ६०० रुपये वेतन मिळते. सुमारे १२०० रुपये वेतन मिळाल्याची दोन उदाहरणे आहेत. पण ते वेतन अवघ्या दोन टोळ्यांचे असून त्यात १० कामगार आहेत. सकाळी ७ पासून रात्री दोन वाजेपर्यंत म्हणजे सतत १९ तास काम करून, घाम गाळल्यानंतर त्यांना हे वेतन मिळाले. ५००० कामगारांत अवघ्या १० कामगारांना हे वेतन मिळाले. यावरून श्री. रेखी यांचे विधान अचरटपणाचे आहे, हे लक्षात यावे.

१९७३ मध्ये माथाडी कामगारांना दिवाळी बोवणी म्हणून प्रत्येकी ६१ रुपये व नंतर प्रत्येकी साडेतीन टक्के रक्कम देण्याचा निर्णयही मालकांनी आजतागायत पाळला नाही, असे सांगून श्री. अण्णा पाटील म्हणाले, काही ट्रक मालक स्मगलिंगच्या मालाची ने-आण करतात. दिल्ली राईस बेकायदा मुंबईत येतो तो ट्रकनेच. तांदळाचे खोके भरून मुंबईत आणले जातात.

गेली १० वर्षे वाहतूक कंपन्या ग्राहकांकडून २० टक्के गुडस् टॅक्स बेकायदेशीररीत्या वसूल करीत असून कोटचवधी रुपयांची ही रक्कम त्यांनी सरकारकडे जमा केली नाही किंवा ट्रक मालकांनाही दिली नाही, असा गंभीर आरोप श्री. अण्णा पाटील यांनी केला आहे. ही रक्कम सरकारने त्यांच्याकडून ताबडतोब वसूल करावी किंवा ती वसूल न झाल्यास सर्व गुदामे मालासह ताब्यात घ्यावी व वाहतूक कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करावे, अशी त्यांची मागणी आहे.

महागाई वाढली ही वस्तुस्थिती आहे. निर्देशांकाप्रमाणे महागाईभत्ता देण्याचा करार १९६६ मध्ये झालेला आहे. त्याप्रमाणे महागाईभत्ता देणे हे मालकांचे कर्तव्य ठरते. पण मालक करार पाळत नाहीत. करार मोडण्याची दिक्कत त्यांना वाटत नाही.

एवढे दिवस संप चालू राहिल्याने मालाच्या हालचालीवर परिणाम झाला. माल पडून राहिला. त्याची ने-आण झाली नाही. त्यामुळे काही वस्तूंच्या किमती ५ ते १० टक्क्यांनी वाढल्या. सामान्य जनतेच्या हालात भर पडली. पण संप मिटविण्यासाठी आवाहन करण्यापेक्षा सरकारने काहीच केले नाही. मालकांना वठणीवर आणण्याचे ठाम धोरण सरकारजवळ नाही. मिसा वगैरे कायदे मालकांना का लावले जात नाहीत? गुडस् टॅक्स वसूल करून सरकारजमा न करणाऱ्या मालकांविरुद्ध काहीच कारवाई का केली जात नाही? की राज्यकर्त्या पक्षाशी जवळीक असलेल्या इंटकप्रणीत युनियनचे नेते अण्णा पाटील यांचे विधानच खोटे आहे?

माथाडी कामगार काबाडकष्ट करतात म्हणून प्रत्येक घरात जीवनावश्यक वस्तू पोहोचतात. युद्धकाळात राष्ट्राला रेल्वेवाघिणींचा तुटवडा पडू नये म्हणून रात्रंदिवस वॅगन्स खाली करणारा हा पिछाडीचा जवान दवा बाजारात, मेवामसाला बाजारात, रेल्वे गुडस् डेपोत, ऑइल-डाळ-फ्लोअर गिरण्यांत, कांदे-बटाटे व मच्छी बाजारात आणि निरनिराळ्या प्रकारच्या २६६६ कंपन्यांत विखुरलेला आहे. समाजवादी समाजरचनेत त्याला प्रतिष्ठा मिळणे आवश्यक आहे. पण बिचाऱ्याला त्यासाठी लढावे लागत आहे.

माथाडी युनियनने विधायक कार्य चालवले. सहकारी पतपेढी चालवून गरजू कामगारांना मदत केली जाते. गेल्या महिनाअखेर १५ लाख ४७ हजार रुपयांचे कर्ज वाटण्यात आले. व्यसनासक्त होऊन कुटुंबाची हेळसांड करणाऱ्या ९६ कामगारांच्या कुटुंबियांना दरमहा ६५०० रुपये पाठविले जातात. ही रक्कम युनियन बोर्डाकडून त्यांच्या पगारातून कापून घेते व पतपेढीमार्फत कुटुंबियांत रवाना करते. हे विधायक काम आहे.

महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, शेतकरी सहकारी संघ (मुंबई शाखा), बॉम्बे ग्रेन, राइस ऑइलसीडस् मर्चंटस् असोसिएशन, कलर अँड केमिकल मर्चंटस् असोसिएशन, खारीक व मेवा बाजार मर्चंटस् असोसिएशन, शुगर मर्चंटस् असोसिएशन, खजूर व्यापारी संघटना, घाऊक चहा व्यापारी संघटना, बारदान व्यापारी संघटना, गूळ व्यापारी संघटना, कांदे-बटाटे घाऊक व्यापारी संघटना, डेक्कन सेल्स कॉर्पोरेशन, रिटेल ट्रान्स्पोर्ट ओनर्स असोसिएशन, रेल्वे गुडस् क्लिअरिंग एजंटस् असोसिएशन, एक्स्पोर्ट वेअर हौसिंग एजन्सी, रॅलीज् इंडिया लि. आदी कंपन्यांनी व संस्थांनी १६ नोव्हेंबर १९७४ पासून १९६६ च्या करारानुसार माथाडी कामगारांना ३५ टक्के महागाईभत्ता दिला आहे.

महाराष्ट्रात मुंबई आहे; पण मुंबईत महाराष्ट्र नाही. महाराष्ट्राच्या मुंबापुरीत महाराष्ट्राची छाप दिसत नाही, असे म्हटले जाते. पण घाम गाळून कमाई करणारा मराठमोळा कष्टकरी ही महाराष्ट्राची छाप नव्हे काय? ती टिकविण्यासाठी, वाढविण्यासाठी, त्याच्या कष्टाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी त्याची साधी मागणी मंजूर झाली हे योग्यच झाले.

—गो. आ. भट

# सहज दिसले, लिहिले....

**रमेश जोशी**

ऑक्टोबर लागला तरी पाऊस संपला नव्हता. थोडी विश्रांती घेऊन जरा जास्तच ताकदीने आता पडू लागला होता. दुपारचे तीन वाजले होते. सरीवर सरी जोरदार पडतच होत्या. मुंबईला जाणाऱ्या टॅक्सी स्टँडसमोरच्या हॉटेलात गरम गरम चालू चहा घेत मी बसलो होतो. माझा नेहमीप्रमाणे टॅक्सीमध्ये फ्रंट सीटवर क्लेम लावला होता. टॅक्सी आणखी तिघांची वाट पाहत उभी होती. पलीकडच्या टेबलाभोवती सारे टॅक्सी ड्रायव्हर्स पॅसेंजरची वाट पहात थांबले होते. येणाऱ्या जाणाऱ्या रिक्षांकडे आशाळभूत नजरेने पहात बसले होते. पॅसेंजर गाठून देणाऱ्या पोऱ्यांची नेहेमीचीच धांदल चालू होती. आणखी तीन पॅसेंजर जमल्याबरोबर ड्रायव्हरने हाक मारली. आम्ही आमच्या ठरलेल्या जागा घेतल्या. त्या तिघांतील एक सरदार दिसत होता. एक कोणीतरी सेल्समन होता व तिसरा बहुधा मोटर मॅकॅनिकल होता. पिंपरी एव्हाना मागे पडली होती. टॅक्सीने आता झकास वेग पकडला होता. बाहेर पाऊस चांगलाच लागला होता. आत पाऊस येऊ नये म्हणून गाडीच्या काचा बंद केल्या होत्या. ड्रायव्हरने त्याच्या कॅसेटवर जुन्या सिनेमातील संगीत लावले होते. रस्त्यावर रहदारीही रविवार असल्याने फारशी दिसत नव्हती. मोठ्या आल्हाददायक वातावरणात प्रवास सुरू झाला होता. पावसाळ्यात प्रवास करायला मला नेहेमीच आवडते. धुळीचा त्रास बिलकूल होत नाही. उकाड्याचा त्रास नाही व गारवाही बेताचा आलेला असतो. गाडी नवी दिसत होती. कोणत्या तरी बँकेच्या सौजन्याने घेतली होती. मोठी गम्मत आहे नाही. हे बँकवाले व्याज चांगले चापून घेतात. त्यांच्या साऱ्या शर्ती पुऱ्या करायला लावतात. लोकांचाच पैसा कर्जाऊ देतात. पैसा घेणाऱ्याने खूप श्रम करावेत, जिवाचा आटापीटा करावा आणि पैसा कमवून बँकेला द्यावा. बँकवाल्यांनी मात्र त्यांच्याशी ताठ्यानेच वागावे. एअर कंडीशन्ड ऑफिसात बसावे. छोट्यामोठ्या चुकीखातर वेळोवेळी डाफरावे आणि पैसे घेणाऱ्या या बिलकूल छोट्या टॅक्सीवाल्याने मात्र अमूक तमूक बँकेच्या सौजन्याने अशी पाटी लावावी. माझ्या मनात विचार येतो. या टॅक्सीवाल्यांसारखे हजारो–लाखो लोक पैसे कर्जाऊ घेतात, पैसे कमावतात. नवीन पैसा उत्पन्न करतात. बँकेला भरपूर व्याज देतात. तसं पाहिलं तर हे लोक काम करतात म्हणून बँकेला त्यांच्या कर्मचाऱ्यांचा पगार तरी देता येतो, मोठमोठ्या इमारती बांधता येतात, वातानुकूलित करता येतात. पण ज्यांच्या जिवावर हे बँकवाले जगतात, त्यांना वागणूक मात्र तिऱ्हाइतासारखी एखाद्या गुन्हेगारासारखी देतात, असे का? जाऊ द्या झालं. नाहीतरी हे जग अनेक विसंगतींनी भरले आहे. तुम्ही कितीही प्रयत्न केलात तरी शोषण करणारा आणि शोषला जाणारा समाज नष्ट करू शकत नाही. मग तो समाजवाद असो की कम्युनिझम असो की आणखी काही असो.

टॅक्सीने आता देहूरोड मागे टाकले होते. पाऊस अजूनही धूमधार पडत होता. टॅक्सीच्या वेगाला आता एक लय आली होती. सुरेल संगीत चालू होते. वेगाच्या लयीने मीही डुलकत होतो आणि एकाएकी मागच्या सीटवर काहीतरी भांडण चालू झाले. मी दचकून जागा झालो.

'साला, वाहर बारीश गिरती है. सारी शिशी बंद है और तुम बिडी पिता है.' सरदारजी तावातावाने मोटारमेकॅनिकवर डाफरत होता. मेकॅनिक दिसत होता लहानखोराच; पण तोंडात दम होता दारासिंगाचा.

'×××× गाली देता है. टॅक्सी क्या तेरे बापकी है? टॅक्सीमे जाता है और दिमाख दिखाता है रोल्सरॉईसके मालिकका.' मेकॅनिकसुद्धा कुछ कम नही था. त्याच्या रसवंतीने एवढा जाडजूड सरदारजी पण त्याचाही दम उखडलेला दिसला. जरा वेळ ताणताण करून शेवटी त्यानं अमोघ बाण काढला.

'देखो भाय, सरदारजीके सामने कोईभी बिडी नही पी सकता. अगर आपको बिडी पिना है तो गाडीसे उतार दुंगा. आखीर ये बात तो हमारे धरमकी है. कोई नही रोक सकता हमें. क्यू ड्रायव्हरसाव?'

शेवटी त्याने ड्रायव्हरलाही बीचमे ओढायचा प्रयत्न केला. ड्रायव्हर आपला मख्खपणे गाडी चालवत होता. मजेत शिट्टी वाजवत होता. त्याला कोणाही एकाची बाजू घेऊन चालणार नव्हते. शेवटी त्यालाही त्याची बिडी ओढायची होती. प्रथम त्याने दुर्लक्षच केले आणि नंतर त्याने त्या दोघांना आपसात मिटवायला सांगितले. पण त्या सिन्नर विडीच्या भयंकर वासाने साऱ्यांचेच डोके भणभणायला लागले होते. आता तो सेल्समन मध्ये पडला आणि त्याने त्याच्या गोड भाषेत मेकॅनिकला समजावला. त्याच्या गोड भाषेचा परिणाम म्हणून म्हणा किंवा त्याच्या साहेबी पोषाखाचा परिणाम म्हणून म्हणा, मेकॅनिकसाहेबांनी त्यांची विडी फेकून दिली.

नि:शब्द प्रवास पुन्हा चालू झाला. सुरेल संगीत आणि त्याच्याबरोबर टायर्सचा फर्र आवाज; याशिवाय सारेच शांत होते. एक डौलदार वळण घेऊन गाडी कामशेटच्या छोटचा घाटीवरून खाली उतरली आणि सरदारजी ओरडला, 'ड्रायव्हर, गाडी रोको.'

साऱ्यांचेच चेहरे प्रश्नचिन्हांकित झाले. भांडण तर मघाशीच मिटले होते. आता काय झाले. माझ्या डोळ्यांसमोर माझी कलकत्ता मेल दिसू लागली. मी मागे वळून सरदारजीला विचारले,

'क्या हुवा सरदारजी. क्या तकलीफ है.'

'तकलीप कुछ नही साब, पेशाब करनी है !' सरदारजी उत्तरला. सहज मेकॅनिककडे पाहिले त्याचा चेहेरा आता उजळून निघाला होता. सरसावून बसला तो आणि म्हणाला.

'ड्रायव्हर गाडी बीचमे नही रूकेगी. वैसा कानून है' आता ड्रायव्हरलाही चाल समजली तो मजेत संगीतावर ठेका धरून गाडी चालवू लागला.

'अबे पेशाब करनेका है भाई. रोक दीजीये' सरदारजी म्हणाला.

'देखो ड्रायव्हर, गाडी खोपोलीसे पहिले नही रूक सकती. पेशाव-बिशाब करना है वो खोपोलीमे चाहे इतना कर लिजीये मेकॅनिक म्हणाला.

मोठी मजा येऊन राहिली होती. सरदारजीच्या तोंडावरील भाव पहाण्यासारखे दिसू लागले. बिचाऱ्याच्या चेहेऱ्यावर अगतिकता आली होती. पण करतो काय ? दोन्ही मांडचांच्या मध्ये हात ठेवून मुकाटचाने बिचारा बसून राहिला.

अशीच पाच मिनीटें गेली. गाडीचा वेग ड्रायव्हरने खूपच कमी केला होता. लोणावळा अजून दूरच राहिले होते. आता मात्र सरदारजीला धीर निघेना.

'अबे बेवकूफ तुझे जितना बिडी पिना है उतना पी लो लेकीन गाडी रोको.' सरदारजीचा अजून पीळ शिल्लक होता.

'गाली देता है फीर. ड्रायव्हर गाडी मत रोकना' मेकॅनिक म्हणाला.

ड्रायव्हरला आता चांगलेच हसू फुटले होते. मलाही मजा वाटत होती. लोणावळा आता दृष्टिपथात आले होते. परिस्थिती आता सरदारजीच्या हाताबाहेर जाऊ पहात होती.

'अरे भाईसाब माफ करना. तुझे हाथ जोडता हूँ लेकीन गाडी रोको.'

गाडी अतिशय धीमेपणाने रस्त्याच्या बाजूला उभी राहिली, सरदारजी धावत धावत बाजूला गेला. आम्हा साऱ्यानांच हसू फुटले. आता सरदारजी परत येऊन आपल्या जागी स्थानापन्न झाला. मेकॅनिकने त्याची खाकी पुन्हा शिलगावली. गाडी पुन्हा सुरू झाली पण सरदारजीचा धर्माचा अभिमान केव्हाच गळून गेला होता. टॅक्सी ड्रायव्हर गाडीवर फडके वगैरे मारण्यात गुंतला होता. मागची सीट उनवाला शेठने तीनही सीटांचे पैसे भरून घेतली होती. हा पार्शी टॅक्सीचा नियमीत प्रवासी दिसत होता. मुंबईहून निघाल्याबरोबर पाच दहा टॅक्सीवाल्यासंबंधी त्यांच्या धंद्यासंबंधी वगैरे चौकशी त्याने आवर्जून केली होती. ठाण्याच्या पुढे आल्यानंतर 'लयी ज्योरात नको चालवू हा–तुझे बालबच्चे समदा तुझी वाट बघत असेल' असा प्रेमळ सल्लाही त्याने ड्रायव्हरला दिला. दोघेही एकमेकाला नावाने ओळखत होते. माझेही नाव, गाव, धंदा सारे काही त्याने माहित करून घेतले. मुंबईच्या कुठल्यातरी advertising agency चा मॅनेजर होता तो. adverting manager ला शोभेल असाच गुलजार माणूस होता. गोरापान, किंचीतसा स्थूल आणि वैशिष्टचपूर्ण गुबगुबीत पारशी नाक. शहरातील सुखवस्तु राहणीची एक तुस्ती त्याच्या चेहेऱ्यावर विलसत होती. वैशाखाचे ऊन आणि मार्गशीर्षाची थंडी त्याने कधी अंगावर घेतली नव्हती. सरकारी S. T. आणि तिसऱ्या वर्गाचा प्रवासही त्याने कधी अनुभवला नव्हता. पण गप्पा मारायला मोठा झकास माणूस. टॅक्सी सुटल्यापासून त्याच्या तोंडाची टकळी चालू होती. त्याचे पाश्यीळलेले मराठी ऐकायला मोठी मजा येऊन राहीली होती. मी स्वत: एवढा प्रवास केला होता पण अशी व्यक्ती अजून भेटली नव्हती. प्रत्येक नावाच्यामागे न चुकता सहजपणे 'साला' लागत होते.

'तो साला शानबाग, साला काय राईटअप लिहीते. शानबागच्या राइट अप आला की साला पब्लिक advertise मेंट वाचल्याबगर पुढे ज्याणारच नाय'

'मुंबईतली तद्दन हॉटेल साला भिकार. लंचटाईमला कुठे जेवायला गेलं तर साला पाठीमागून पब्लिक डोका घालून बघते जेवण संपवला का नाय. साला मिनीस्टरचा माथा फीरून जात असेल. ते साला बोंबलून सांगते फॅमिली प्लॅनींग करा म्हणून तर पब्लिक साला फॅमिली प्लॅंटिंग करते.'

'तुझ्या ते साला फायनान्स मिनिस्टरला सांगून दे ना ते सिगारेटची किमत साला दहा रुपाया करून टाक. पण बीडीच्या नको वाढवू हा. गरीब लोक काय करेल बिचारा. बीडी आणि ताडीची किमत नको वाढवू हा. गरीबाला नको मारू हा. माझ्या तुझ्या खर्चा थोडा वाढला तर काय फीकीर नाय. पण गरीबाला नको मारू हा.'

वेगवेगळचा विषयावर थोडक्यात बोलत होता पण मोठा मार्मिक होता. माझा खरा कशाशीही संबंध नव्हता पण मला तो मिनिस्टरपासून पार झाडूवाल्यापर्यंत साऱ्यांचा प्रतिनिधी समजत होता. कधी मी मिनीस्टरचा खाजगी कारभारी होत होतो तर कधी विरोधी पक्षाचा आमदार कधी भांडवलशहा तर कधी कामगार पुढारी. माझ्या नकळत तो मला संवादात ओढत होता. माझ्याकडून आर्ग्युमेंट्स् करवून घेत होता. माझे मुद्दे खोडून काढत होता, मोठी मजा येवून राहिली होती. सुखवस्तु समाजाचे प्रतिनिधित्व जरी तो करत होता तरी झोपडपट्टीत रहाणाऱ्या गरीबगुरीब लोकांबद्दलचा कळवळा त्याच्या एकंदरच वकबकीतून बाहेर येत होता.

'गेल्या वर्षी साला पाऊस पडला तो माझे बाजूच्या झोपडचामंदी पार बोंब झ्याला. साला समद्या म्हाताऱ्या लोकला आणि त्यांच्या

पृष्ठ ३१ वर

**मोफत ! मोफत ! मोफत !**

# पांढरे डाग

आमचे औषधाचा प्रभाव केवळ तीन दिवसातच पांढरे डागावर दिसू लागून त्याचा रंग बदलू लागतो. आमचे औषध अतिप्रभावी असून त्याचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. प्रचाराकरता, एक औषधाची कुपी ट्रायलकरता मोफत दिली जाते. रोगाचे सविस्तर वर्णनासहित संपर्क साधून त्वरित औषध मागवा.

**जवाहर चिकित्सा केन्द्र १०५**
**पोष्ट : कतरीसराय (गया)**

गुजरातेतून । चंद्रशेखर

# काँग्रेसला स्वच्छतेचे आश्वासन कोणी द्यायला लावले ?

गुजरात राज्यात आजमितीस साडेबारा लाख लोक दुष्काळी कामावर काम करीत आहेत. पंचमहाल (१ लाख ७९ हजार), राजकोट (१ लाख ५५ हजार), कच्छ (१ लाख ६ हजार),जामनगर (१ लाख ६हजार), जुनागड (१ लाख २ हजार) हे जिल्हे सगळ्यात जास्त दुष्काळग्रस्त आहेत. सबंध राज्यात ६५०२ दुष्काळी कामे चालू आहेत. आठ जून व अकरा जून रोजी राज्यात जेव्हा निवडणुका होतील तेव्हाही हे साडेबारा लाख लोक दुष्काळी कामावर, भर उन्हात राबत असतील. यांना कसले स्वातंत्र्य आहे ? कोणाच्या राजवटीत आपण दुष्काळी कामावर काम करावयाचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे ! यांना कसली समान संधी आहे ? कोणत्याही राजवटीत दुष्काळी काम करण्याची 'समान' संधी आहे !

गुजरातमध्ये जानेवारी ७४ पासून राष्ट्रपती राजवट लागू झाल्यापासून येथील राजकारणी मंडळी बेकार झाली होती. यांना काही तरी काम हवे म्हणून काढलेले दुष्काळी काम म्हणजे जूनमधील निवडणुका ! हे दुष्काळी काम इतर कामासारखे स्वस्त नसते. फार मोठे द्रव्यबळ व मनुष्यबळ या कामाला लागते. कुबेरासारखा खर्च केल्याशिवाय लोकशाहीची मौज लुटण्यास मिळत नाही. सत्तेच्या दुष्काळाने हैराण झालेले राजकारणी निवडणुकीच्या कामात हपापल्याप्रमाणे रममाण झाल्याचे दृश्य गेले काही दिवस दिसत आहे. जाहीरनामे प्रसिद्ध होत आहेत, उमेदवारांची फोडाफोडी जारीने सुरू आहे. चौरंगी, पंचरंगी सामन्यांचे अंदाज वर्तविले जात आहेत. सर्व चुकांचे खापर एकमेकांवर फोडले जात आहे.

साडेबारा लाख लोक खडी फोडत आहेत !

किमान कार्यक्रम, उमेदवार ठरविणे, उमेदवारी भरणे, मागे घेणे हे सारे निवडणूकपूर्व सोपस्कार पुरे होऊन आता प्रचाराचे पडघम वाजू लागले आहेत.

आगामी निवडणुकीसाठी १६६३ लोकांनी उमेदवारीअर्ज दाखल केले होते. त्यांपैकी ७९० जणांनी त्यांचे अर्ज मागे घेतले व २२ जणांचे अर्ज फेटाळण्यात आले. आता ८५१ उमेदवार रिंगणात शिल्लक आहेत. काँग्रेस १८२, संस्था काँग्रेस १०३, किसान मजदूर लोकपक्ष (१२८), जनसंघ (४०), भारतीय लोकदल (११), राष्ट्रीय मजदूर पक्ष (६), कम्युनिस्ट (४), मार्क्सवादी कम्युनिस्ट (३), समाजवादी (३) व अपक्ष (३७२) अशी वर्गवारी आहे.

एकूण १८२ जागांपैकी केवळ ४ जागांसाठी सरळ लढत आहे. बाकी सगळीकडे पंचरंगी वा अनेकरंगी सामने आहेत. सगळ्यात जास्त स्पर्धक म्हणजे अकरा हे जमालपूर जागेसाठी आहेत.

उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपेपर्यंत फारच गोंधळाची स्थिती होती. जनता आघाडीने आपले २१ उमेदवार बदलले. जनता आघाडी व काँग्रेस या दोहोंतील काही उमेदवार चिमणभाईंच्या पक्षात गेले. चिमणभाईंनी त्यांचे मन:पूर्वक स्वागत केले. जनता आघाडीने ज्यांना तिकिटे नाकारली त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरले. काही ठिकाणी उमेदवारांना तिकीट दिले पण ते स्वत:च निवडणूक लढविण्यास तयार नव्हते. असे बरेच चमत्कारिक प्रकार झाले. कोणाला यशाचे कितपत चान्सेस आहेत हे वर्तविणे नेहमीच अवघड असते. पण येथील निरीक्षकांच्या मताच्या आधारे काही अंदाज बांधणे शक्य आहे. शहरी भागात काँग्रेसपेक्षा जनता आघाडीला जास्त पाठिंबा आहे. चुकीच्या उमेदवारांची निवड, पक्षांतर्गत गटबाजी, स्थानिक विशिष्ट परिस्थिती यामुळे काँग्रेसला काही भागात निवडणुका जड जाणार आहेत. त्यांपैकी बडोदा जिल्हा हा एक. येथील १३ जागांपैकी ३ किंवा ४ जागाच काँग्रेसला मिळतील. चिमणभाई पटेल या जिल्ह्यातील पेर्वाजेटपूर येथून निवडणूक लढवीत आहेत. त्यांच्याविरुद्ध प्रबळ उमेदवार उभा करण्याचे काँग्रेसने जाणूनबुजून टाळले. सयाजीगंज मतदारसंघातून समाजवादी नेते व मजूर पुढारी जी. जी. पराडकर हे निवडणूक लढवीत आहेत. त्यांना सर्व प्रमुख मजूर संघटनांचा पाठिंबा आहे. काँग्रेसचे येथील उमेदवार ठाकारेभाई व्ही. पटेल यांचा ते पराभव करतील अशी अपेक्षा आहे. भडोच, जंबुसार, अंकलेश्वर या भागात संस्था काँग्रेसचे वर्चस्व असून तेथे या पक्षाची परिस्थिती आणखी सुधारेल असे वाटते. राजकोट भागात काँग्रेसच्या कार्यकर्त्यांपैकीच काही जण बंडखोरीची भाषा करीत असून त्यामुळे काँग्रेसपक्षास तेथे अडचणी निर्माण झाल्या आहेत. सुरतमधील काँग्रेसजनही तिकीटवाटपाबाबत नाराज असून बाहेरील उमेदवार लादल्याबद्दल प्रमुख कार्यकर्ते उघडउघड टीका करीत आहेत.

काँग्रेसने आपला ३२ कलमी निवडणूक जाहीरनामा रविवारी १८ मेला प्रसिद्ध केला. धर्मनिरपेक्ष समाजवादी लोकशाही व लोकशाहीविरोधी हुकूमशाहीमध्ये आपणास काय हवे हे मतदारांनी ठरवायचे आहे,असा इशारा या जाहीरनाम्यात दिला आहे. स्थैर्य हवे की अराजक हवे, असा मोठा नाटयमय सवाल या जाहीरनाम्यात आहे.

देशाच्या अडचणींचा संकुचित व पक्षीय दृष्टिकोणातून फायदा उठवण्यासाठी विरोधकांनी तत्त्वहीन युक्ती केली आहे असा आरोप करून 'सत्ता' हाच विरोधकांचा प्रधान हेतू आहे असे बजावले आहे.

या घटकेस काँग्रेस पक्षच देशाचे ऐक्य व स्थैर्य कायम ठेवू शकेल असाही विश्वास जाहीरनाम्यात व्यक्त झाला आहे. या जाहीरनाम्यातील काही आश्वासने अशी: १) शेतकरी व शेतीतज्ज्ञ यांचे एक लँड कमिशन नेमून जमीन सुधारणेच्या कार्यक्रमास गती देण्यात येईल. २) नर्मदा-पाणीवादात गुजरातला न्याय मिळावा यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात

येतील. ३) आणखी ३००० खेड्यांत वीज पुरवण्यात येईल व १ लाख विहिरी खोदण्यात येतील. ४) शेतमजुरांस आर्थिक न्याय देण्यात येईल. सरकारी व संपादित भूमी त्यांच्यात वाटण्यात येईल. ५) सार्वजनिक क्षेत्रात अधिक उद्योग काढण्यात येतील. ६) तेल व नैसर्गिक वायू यांच्यावरील रॉयल्टीत वाढ करून घेण्यासाठी कसून प्रयत्न करण्यात येतील.

काँग्रेस उमेदवारांनी आपल्या मिळकतीचा तपशील पक्षाकडे द्यावा असेही ठरविण्यात आले आहे.

जनता आघाडीची पहिली प्रचारसभा कांकरिया फूटबॉल मैदानावर रविवार दि. १८ मे रोजी झाली. लाखाच्यावर जमाव होता. मिळणाऱ्या प्रतिसादावरून हा जमाव काँग्रेसविरुद्ध होता हे उघड होते. जेव्हा जेव्हा कोणी वक्ता जयप्रकाश नारायण यांचा उल्लेख करी (व बहुतेक वक्त्यांनी हा उल्लेख केला) तेव्हा तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होई. अशोक मेहता, लालकृष्ण अडवाणी, मधू दंडवते, राजनारायण, पिलू मोदी, मावळंकर, कृपलानी यांची भाषणे झाली. मोरारजी देसाई यांच्या भाषणाच्या वेळी सर्व लोक उठून जाऊ लागले. वाजपेयींचे नाव जाहीर करूनही ते न आल्याने जमावाची झालेली निराशा स्पष्ट दिसत होती. बहुतेक वक्त्यांनी नवनिर्माण, गुजरातचे महत्त्वाचे नेतृत्व, इंदिरा गांधींचे हेलिकॉप्टर यांवरच भर दिला. गुजरात निवडणूक म्हणजे जनता व सरकार यांतील लढाई आहे असा काहीसा चमत्कारिक थिसिस अडवाणी यांनी मांडला. जनता आघाडी ही पूर्वीच्या ग्रँड अलायन्स-पेक्षा निराळी आहे, हे पुन्हा पुन्हा ठसविण्याचे कष्ट बहुतेक वक्ते घेत होते. एकंदर भाषणे एकसुरी व कंठाळी झाली. आपण खरोखर सत्तेवर येऊ असा आत्मविश्वास कोणत्याच नेत्याच्या भाषणात दिसत नव्हता. विविध पक्षांचे नेते एका व्यासपीठावर आले याचा आनंद वक्त्यांनी व्यक्त केला व जनतेच्या दडपणामुळे आम्ही नाइलाजाने एकत्र आलो, असे (कारण नसता) त्यांनी स्पष्टपणे सांगितले. विरोधी पक्षीयांच्या सर्वसाधारण बेताच्या सभांपेक्षा ही सभा भरगच्च व जोरदार झाली एवढेच म्हणता येईल.

जयप्रकाश नारायण यांची भूमिका गुजरात निवडणुकांबाबत (नेहमीप्रमाणे) धरसोडीची आहे. त्यांना जनता आघाडी आहे त्या स्वरूपात मान्य नाही. मोरारजींच्या नेतृत्वाबाबतही ते नाराज आहेत. म्हणून निवडणूक प्रचारास मी जाणार नाही, असे त्यांनी जाहीर केले. मोरारजींनीही आपण जयप्रकाश यांना प्रचारासाठी बोलावणार नाही असे जोरात जाहीर केले. पण प्रचारासाठी खुद्द इंदिरा गांधी गुजरातेत एकूण अकरा दिवस येणार हे पाहून जनता आघाडीचे धाबे दणाणले. आता जे. पी. गुजरातेत निवडणूक प्रचारासाठी येणार आहेत, असे समजते. अहमदाबाद शहरात अद्याप प्रचारफलक, घोषणा वगैरे दिसत नाहीत. जनता आघाडीने शहरात कोठेही पोस्टर्स चिकटवायची नाहीत वा घोषणा लिहावयाच्या नाहीत, असा निर्णय घेतला आहे. एलीस ब्रिज या श्रीमंती भागात पंचवटी ॲपार्टमेंट्सजवळ एक भलेमोठे होर्डींग लक्ष वेधून घेते. किसान मजदूर लोकपक्षाचे हे होर्डींग आहे. 'क्यां सुधी दिल्लीना पग पकडवा ?' (कोठवर दिल्लीचे पाय पकडायचे ?) असा प्रश्न करून या होर्डींगमध्ये राज्याचे प्रश्न राज्यातच सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. मला वाटते, चिमणभाईंची ही प्रचाराची दिशा बरोबर आहे. गुजरातमध्ये प्रादेशिक अस्मिता चांगलीच प्रखर आहे. दुकानात व इतर सार्वजनिक ठिकाणी 'गुजरातीत बोला' असे जरा जोरातच सांगितले जाते. नवनिर्माण आंदोलनाने आपण देशाला नवी दिशा दिली असाही ठाम समज येथे आहे. तेव्हा या प्रादेशिक भावनेस हात घालून चिमणभाई पुरेशी आमदार-संख्या हस्तगत करतील व त्या जोरावर राज्याचे राजकारण ताब्यात ठेवतील, ही शक्यता नाकारता येत नाही.

आगामी निवडणुकांतून स्थिर सरकार येईल, यावर मात्र कोणाचाच विश्वास नाही.

बडोदा येथील गुजरात सर्वोदय मंडळाने 'जनतेचा' म्हणून एक निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला असून, त्यात उमेदवार व मतदार या दोहोंच्या सदसद्विवेकबुद्धीस आवाहन केले आहे. विधानसभेकडे सामूहिकरीत्या निर्णयशक्ती खऱ्याखुऱ्या अर्थाने राहावी व काही मूठभरांच्या हातात राहू नये अशी मागणी या मंडळाने केली आहे. उठल्यासुटल्या दिल्लीला पळण्याच्या वृत्तीवर आक्षेप घेण्यात आला असून राज्याच्या स्वायत्ततेवर भर देण्यात आला आहे. दहा आमदार वा खासदार यांनी एखाद्या मंत्र्यावर आरोप केल्यास त्याची ताबडतोब चौकशी करावी असे मंडळाचे म्हणणे आहे. एखाद्या बिनराजकीय मंडळाने आता निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध करावा हे विशेष वाटते.

मधू मेहता यांच्या हिंदुस्थानी मूव्हमेंटने स्थापन केलेल्या लोकजागृती समितीचे संमेलन रविवार १८ मे ला अहमदाबाद येथे झाले. या समितीने जास्तीत जास्त मतदान कसे होईल या दृष्टीने मोहीम काढण्याचा निर्णय घेतला आहे. इंदिरा गांधी, मोरारजी देसाई व चिमणभाई पटेल यांनी एका व्यासपीठावर येऊन जनतेच्या शंकांना उत्तरे द्यावीत, असे आवाहन मधू मेहतांनी केले आहे.

अनेक प्रकारच्या, रंगाच्या छोट्या संस्था, समित्या यांचा राजकीय वा नैतिक दबाव हे गुजरातमधील राजकीय परिस्थितीचे एक वैशिष्टच वाटते. 'सेल्फ ॲपॉईंटेड' असे ज्यांचे वर्णन करता येईल असे 'जनतेचे आवाज' येथे बरेच आढळतात.

निवडणुकीचे सारे डावपेच व रंग येथेही दिसत असले तरी एक गोष्ट निश्चित जाणवते की, निवडणुका स्वच्छ झाल्या पाहिजेत याची जाणीव तीनही प्रमुख पक्षांत दिसून येते. नवनिर्माण व जनतेचे सामर्थ्य यांचे अदृश्य दडपण वातावरणात जाणवल्याखेरीज राहत नाही. याचे एक मनोरंजक गमक काँग्रेसच्या जाहीरनाम्यात पाहावयास मिळते. हा इतका कोडगा व आत्मसंतुष्ट पक्ष असूनही जाहीरनाम्यात असे (बहुधा देशामध्ये पहिल्यांदाच) स्पष्टपणे म्हणतो की, पूर्वी आमच्यात बदमाष लोक होते; पण ते गेल्याने काँग्रेस आता स्वच्छ झाली आहे. (स्टँड्स क्लिन्सड) नैतिक व कारभारविषयक स्वच्छतेचे आश्वासन हा या निवडणुकीत महत्त्वाचा 'सेलिंग पॉइंट' आहे !

□ □

# काहीच समजेनासं झालंय !

निळू दामले

एखादा दिवस असा भयानक उजाडतो.

२३ एप्रिल.

बिहारमधले आरा हे शहर.

बिहारचे माजी मंत्री केदार पांडे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

बिहार-आंदोलन चालूच आहे.

बिहारच्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या काँग्रेस प्रतिनिधींवर विश्वास नाही.

कारण

बिहारचा एक मंत्री स्मगलिंग करतो,

दुसरा मंत्री गुंड आहे,

तिसरा मंत्री काळा बाजारू आहे.

चौथ्याने आपल्या मुलाचे मार्क भरमसाट वाढवून त्याला पास केले आहे.

पाचव्याच्या नावावर हत्येची नोंद आहे.

सहाव्याने दलितांना लुटलंय.

सातवा तसाच.

सर्वच एका माळेचे मणी.

एखादा काचेचा मणी.

एखादा रुद्राक्षाचा

माळ मात्र बदमाषीची.

केदार पांडे त्यातलाच एक मणी.

छात्र संघर्ष समितीने निदर्शनाचा निर्णय घेतला.

२३ एप्रिलची सकाळ.

युवक काँग्रेस नामक गुंडवाहिनी सक्रीय झालीय.

एक राजनाथसिंह.

बिहार युवक काँग्रसचा संघटनमंत्री.

सूरजनाथ चौबे या आमदाराच्या मुलाच्या खुनाचा आरोप त्याच्यावर.

२० वर्षांची शिक्षा झालीय.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण आहे.

पापक्षालनासाठी राजनाथ आरात आलाय.

असे अनेक राजनाथ जमलेले दिसतात.

चाकू-सुरे, भाला-बरछ्या, पिस्तूल-बंदुका अशा हत्यारांनिशी गावातून मिरवणूक झाली.

छात्र संघर्ष समिती शांत आहे, पण निदर्शनाचा निर्धार मात्र कायम आहे.

संध्याकाळी सभा सुरू झाली.

केदार पांडे चले जावची घोषणा झाली.

आणि

चाकू-सुऱ्यांचे वार सपासप सुरू झाले.

हृदयांचा वेध घेत भाले पुढे सरकले.

बरगड्या फाकवत परशू परजले,

बंदुकांचे दस्ते धपाधप वाजू लागले.

रक्ताच्या चिळकांड्या उडत राहिल्या.

लोकशाहीचे रक्षणकर्ते केदार पांडे शांतपणे सर्व प्रकार पहात आहेत.

पोलीस शांत आहेत.

'हमला चाहे जैसा होगा, हाथ हमारा नही उठेगा' चिरकणारा आवाज कुठल्या तरी रक्ताळलेल्या तोंडातून निर्धारानं वाट काढत होता.

एक पत्र रमाकांत ठाकूरच्या जखमांचं वर्णन करत माझ्या टेबलावर पडलंय्.

माझ्या बिहार भटकंतीत मी आरा शहरात दोन दिवस थांबून रमाकांत ठाकूरशी गप्पा मारल्या होत्या. उंचापुरा, देखणा रमाकांत दाढीमुळे रुबाबदार दिसायचा. केस पिंजारलेले, डोळे तारवटलेले, सतत भटकून आपले घरदार, शिक्षण सोडून रमाकांतने बिहार आंदोलनात उडी घेतली. पायी वणवण फिरत, उपाशीतापाशी रमाकांत आंदोलनासाठी राबत होता. षमहीनाचा तुरुंगवासही त्याने सोसला.

बाबू जगजीवनराम यांचे शिक्षण आरातच झाले.

दलितांना लुटले गेले. आरा शहरात काँग्रेसकडून हिंदू-मुसलमान तणाव निर्माण करून मतांचा फायदाही आरा शहरात घेतला गेला काँग्रेसकडून.

दलित सवर्ण आणि हिंदू-मुसलमान हे अनैसर्गिक भेद रमाकांतनेच आंदोलनाच्या काळात मिटवले.

रवि दीक्षितच्या घरी त्याच्याबरोबर गप्पा मारल्या. आराच्या गल्लीबोळात रात्रीअपरात्री त्याच्याबरोबर हिंडलो. रमाकांतच्या कामाची कृतज्ञ जाणीव लोकांना होती.

माझ्या डायरीत एका विलक्षण व्यक्तिमत्त्वाची नोंद झाली होती.

माझ्या समोरचं पत्र सांगतंय रमाकांतच्या डोक्यावर सहा इंच लांबीच्या जखमा आहेत. त्याच्या पोटात भाला खुपसण्यात आला आहे. त्याच्या डाव्या हाताची बोटं तोडण्यात आली आहेत.

दोन माणसांना सहज लोळवू शकेल अशा रमाकांतनं प्रतिकार केला नाही.

'हमला चाहे जैसा हो !

हाथ हमारा नहीं उठेगा !'

या जयप्रकाशजींनी शिकवलेल्या घोषणेचा पुनरुच्चार करत करत रमाकांत ठाकूर बेशुद्ध झाला.

इंदिरा गांधी !

यशवंतराव चव्हाण !

श्रीपाद अमृत डांगे;

तुम्ही जागे आहात का ?

श्रीराम राय

बलिया जिल्ह्यातला.

एका शाळेत शिक्षक.

नुकतंच लग्न झालेलं.

शाळा सोडून आंदोलनात,

या श्रीरामबरोबर आरा, शहापूर, भोजपूर, सिमरी, नगवा या गावांत मी पायी फिरलो होतो, त्याची धुंदी, क्रांतीचे वेड पाहून चक्रावून गेलो होतो.

पत्र सांगतंय

श्रीराम रायच्या मानेवर परशूचे अनेक घाव बसले आहेत.

राम कुमार राय.

एक दलित विद्यार्थी. बाबू जगजीवनराम यांच्याच जातीचा. पिट्कला. त्याची निरागसता वेड लावून गेली होती. आरात या पोराशी झटकन दोस्ती जमून गेली होती.

पत्र सांगतंय

राम कुमार रायच्या पाठीवर सहा वार आहेत. सुऱ्याचे.

राम इस्पितळात जीवनमरणाच्या सीमारेषेवर तडफडतो आहे.

बाबू जगजीवनराम,

तुम्ही तरी जागे आहात काय ?

काहीच समजेनासं झालय. □

गरीब आदिवासींना कायद्याची मदत देण्याकरिता म्हणून लेखिका सातपुड्याच्या या दुर्गम भागात गेले कित्येक दिवस जाऊन राहिलेली आहे.

# असा हा अक्कलकुव्याचा 'पट'

डॉ. वसुधा धागमवार

अक्कलकुवा. धुळे जिल्ह्यातला एक लहान तालुका. त्याचे नावही कुणी फारसे ऐकलेले नाही. तिथे ९५ टक्के लोक भिल्ल आहेत हे ठीक आहे; पण धुळे जिल्ह्यात बरेच आदिवासी आहेत हे आपल्याला आता पाठ झाले आहे. तेव्हा अक्कलकुव्यात वेगळे ते काय असणार? वेगळे काही तरी आहे आणि ते चांगल्या अर्थाने वेगळे नाही हे मात्र तितकेच खरे.

हे थोडे समजावून घ्यायला हवे.

पहिली गोष्ट म्हणजे अक्कलकुवा तालुक्याचा बहुतेक भाग सहा चिफ्टेन लोकांच्या हातात होता. हे चिफ्टनही भिल्लच होते. ब्रिटिश राजवट ह्या तालुक्यावर जवळपास नव्हतीच. पश्चिम खानदेशास लागू होणारे कायदे इथे लागू होत नव्हते. त्यासाठी गव्हर्नरला वेगळे फर्मान काढावे लागे. गंभीर स्वरूपाचे गुन्हे झाले तर गुन्हेगाराला धुळ्याच्या कोर्टापुढे नेले जाई. एरवी राज्य चिफ्टन सरकारांचे. शेतसारा त्यांनीच ठरवायचा, त्यांनीच वसूल करायचा.

ही परिस्थिती १९५० पर्यंत टिकली. १९५० साली गव्हर्नरसाहेबांनी आपले विशेषाधिकार वापरून मेवासी इस्टेट रेग्युलेशन केले. प. खानदेशासाठी केलेले सर्व कायदे, ह्या रेग्युलेशनच्या अन्वये अक्कलकुव्यास लागू होऊ लागले. लँड रेव्हन्यू कोड आणि बॉम्बे टेनन्सी अँड अॅग्रिकल्चरल लँन्डस अॅक्ट ( BTAL Act ) हे दोन्ही कायदेही यामुळे अक्कलकुव्यास लागू झाले. आतापर्यंत सरकारच्या भूमिकेत शेतसारा वसूल करणारे चिफ्टन—( ह्यांना अजूनही अक्कलकुव्याचे रहिवासी, काठीचे सरकार, गंगयाचे सरकार, असे म्हणतात. ) आता एकदम जमीनदार झाले नि शेतसारा भरणारा जमिनीचा मालक कूळ ठरला. अशिक्षित भिल्ल शेतकऱ्यांनी व्यापलेला हा तालुका—त्यांना ह्या उलथापालथीचा पत्ताही लागला नाही. शेतसारा भरण्याचे काम चालूच राहिले. तो सारा आता महाराष्ट्र सरकार गोळा करी एवढाच काय तो फरक. गंमत म्हणजे १९५७ पर्यंत शेतसारा गोळा करून महाराष्ट्र सरकार ही रक्कम चिफ्टन सरकारांनाच देत राहिले!

१९५६ साली BTAL Act मध्ये सुधारणा करण्यात आली. ( Amendment Act of 1955. ) ह्या कायद्याचा महत्त्वाचा भाग म्हणजे १-४-१९५७ या दिवसाला कृषक-दिन म्हणून ठरविण्यात आले आणि त्या दिवशी जमीन कसणाराला तिचा खरेदीदार—deemed purchaser—ठरविण्यात येऊन त्याला मूळ मालकापासून जमीन विकत घेण्याचा हक्क प्राप्त झाला.

जमिनीची किंमत ठरविण्यासाठी प्रथम कुळाचे दोन वर्ग करण्यात आले. कायम कूळ व साधारण कूळ. कायम कुळाने जमिनीची भरायची किंमत शेतसाऱ्याच्या ३-६ पट व साधारण कुळाने भरायची किंमत २०-२०० पट ठरविण्यात आली. जमिनीच्या किंमती ठरविण्याचे काम चालविण्यासाठी शेतजमीन—न्यायाधिकरण ह्या पदाची निर्मिती करण्यात आली. हे अधिकारी टेनन्सी मामलेदार म्हणूनही ओळखले जातात आणि ह्यांना सिव्हिल कोर्टाचे काही हक्क व jurisdiction असते.

ही सर्व यंत्रणा अक्कलकुवा तालुक्यास लागू झाली, पण किंमती मात्र लागू झाल्या नाहीत. अक्कलकुवा हा Scheduled area असल्याने त्याच्या हितासाठी खास कायदे करण्याचा अधिकार गव्हर्नरसाहेबांना होता नि आहे. त्या अधिकाराखाली १९५७ साली हुकूम काढून गव्हर्नर ह्यांनी अक्कलकुव्याच्या कुळांना किंमती ठरवून दिल्या. कायम कुळांना ३-६ पट, व साधारण कुळास शेतसाऱ्याच्या २०-८० पट. ह्याला अक्कलकुव्यास 'पट भरणे' असे सुटसुटीत नाव आहे. ह्या amending act खाली इतरत्र कुळांना जमिनी देण्यात आल्या; पण अक्कलकुव्यात मात्र काही काम झाले नाही.

१९६१-६२साली महाराष्ट्र शासनाला—बहुधा!—साक्षात्कार झाला की, २०-४० पट भरणेही ह्या गरीब आदिवासींना कठीण आहे. म्हणून शासनाने दोन कायदे केले. गव्हर्नरांनी एक नोटिफिकेशन काढून चिफ्टनना त्यांच्या जमिनी परत केल्या. हा कायदा retrospective असून १-४-१९५६ सालापासून लागू होत होता. म्हणजे कृषकदिनाच्या आधीपासून! दुसरा कायदा—रेग्युलेशन महाराष्ट्र विधिमंडळाने पास केला. त्याच्याप्रमाणे १९१२ साली जमिनी शेतकऱ्यांना देण्यात आल्या व चिफ्टनना मिळणारा मोबदला ठरविण्यात आला. कायम कूळ नि साधारण कूळ ह्यांच्या जोडीस कनिष्ठ धारक नि कायम कुळाचा पोटकूळ हे जमीनधारकवर्ग निर्माण करण्यात आले. त्यांपैकी कनिष्ठ धारक हा वंशपरंपरागत जमीन कशीत असल्याने त्याला जमीन एक पैसाही न भरता मिळाली. कायम कुळाला साऱ्याच्या ३ पट व इतरांना ६ पट किंमत भरायची होती. ह्या कायद्याप्रमाणे ६४-६५ साली शेतकऱ्यांना शेतजमीन न्यायाधिकरणांनी किंमती ठरवून दिल्या. त्या भरून शेतकरी (पुन्हा एकदा!) Land Record मध्ये मालक म्हणून नोंदले गेले. १९६२ साली चिफ्टन काठी ह्यांनी ह्या दोन कायद्यांविरुद्ध हायकोर्टात what petition केली की, हे कायदे संविधानाच्या विरुद्ध असल्याने अवैध आहेत. १९६८ साली ह्या केसचा निकाल चिफ्टनच्या बाजूने लागला. महाराष्ट्र सरकारने १९६९ साली त्याच्याविरुद्ध रीतसर अपीलही केले. त्याची सुनावणी अजून व्हायची आहे.

दरम्यान महाराष्ट्र शासनाने तिथे १५ टेनन्सी मामलेदार नेमून धडाडीने दुसऱ्यांदा जमिनींची किंमत ठरविण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

—एकीकडे १९६२ सालचे कायदे बरोबर आहेत म्हणून अपील ठोकायचे व दुसरीकडे त्या अपिलाची सुनावणी व्हायची वाट न पाहता १९५७ सालचा कायदा लागू करण्यासाठी धावपळ सुरू करायची! सरकारचा स्वतःवरच विश्वास नाही, असे आदिवासींना वाटले तर त्यात नवल कसले!

हे चौदा–पंधरा अधिकारी सरकारने अक्कलकुव्यास नेऊन सोडले. त्यांचे काम खरे तर न्यायाधिकरणाचे म्हणजे न्यायाधिशाचे आहे. त्यांना कोर्टाच्या काही पॉवर्सदेखील आहेत. न्यायाधिशाच्या निरपेक्ष भूमिकेतून ह्या अधिकाऱ्यांनी कामाचा निवाडा करायला हवा. समोर असलेला आदिवासी पट भरण्यास कबूल आहे की नाही, तो साधारण कूळ आहे की कायम कूळ, त्याला जमिनीची किंमत किती हप्त्यांनी भरणे सोयीचे होईल, जमीन कुठल्या प्रतीची आहे इ. सर्व गोष्टी लक्षात घेऊन, दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून मगच न्यायाधिकरणाने निवाडा द्यायचा असतो; पण अक्कलकुवा येथल्या टेनन्सी मामलेदारांना ह्या गोष्टींची चाड दिसत नाही. चिफ्टन लोकांच्या घरांतून राहणे, त्यांची वाहने वापरणे, त्यांच्याकडे ऊठबस, जेवणखाण करणे इत्यादी तर फार सामान्य गोष्टी झाल्या. त्यांच्या जोडीस शेतकऱ्यांना, विशेषत: गरीब, अशिक्षित शेतकऱ्यांना दमदाटी, शिव्यागाळी करणे, तारखांच्या बाबतीत अडवणूक करणे, चिफ्टनला मात्र हवी तेव्हा, हवी ती तारीख ताबडतोब मिळते ! हेही नित्याचे आहे. पट भरण्यास शेतकरी कबूल नसला–अनेक शेतकरी असे म्हणू इच्छितात की, आम्ही मालकच आहोत. पट भरण्याचा प्रश्नच येत नाही–व त्याने तसा लेखी जबाब हजर केला तर तो फाडून टाकण्यापर्यंत काही न्यायाधिकरणांची मजल गेलेली आहे. खरे तर जमिनीची मालकी ठरविण्याचा अधिकार ह्या न्यायाधिकरणांना नसल्याने असा लेखी जबाब येताच न्यायाधिकरणाचे काम संपुष्टात येते. दिवाणी कोर्टात चिफ्टनचा दावा सिद्ध झाला तर पुढे गाडी जाणार. असे असताना जबाब फाडणे, निदान त्याच्याकडे दुर्लक्ष करणे हे न्यायाधिकरणांना सोयिस्कर वाटते, हे स्वाभाविकच आहे. मी म्हणतो तसा जबाब कर, नपेक्षा तुला गैरहजर मांडून तुझ्या केसमध्ये एकतर्फी निकाल लावीन आणि तुला पोलिसात देईन, अशा धमक्यादेखील देण्यात येतात.

कुठलाही प्रश्न न विचारता, शेतसाऱ्याची रक्कम तेवढी बघून 'तुझ्या शेताची किंमत इतकी आहे. किती हप्त्यांत भरतोस?' एवढ्या एका प्रश्नासरशी केस निकालात काढणारे, आपल्या मर्जीने हप्ते ठरवणारे मामलेदारही दिसून येतात.

टेनन्सी मामलेदारांचा उपद्रव कमी पडू लागला म्हणून की काय, तगाई देणाऱ्या सहकारी शेतकी विकास सोसायट्या व सहकारी बँका ह्यांनीही तिथे त्रास द्यायला सुरुवात केली आहे. शेतकरी, मग तो कूळ असो वा मालक, पेरणीच्या वेळी तो ज्या सहकारी सोसायटीचा सदस्य असेल त्या सोसायटीकडून कर्ज घेऊ शकतो. हे कर्ज ती सोसायटी बँकेमार्फत देते. यंदा हे कर्ज आमच्या संमतीशिवाय देऊ नये असा आदेश, हो आदेशच ! चिफ्टन लोकांनी धुळ्यांच्या सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेस दिला. कर्ज-मंजुरीच्या याद्या तयार होऊन चेक तयार झाले की, ते चेक बँक इन्स्पेक्टरकडून घ्यायचे नि वटवायचे अशी पद्धत आहे. असे मंजूर झालेले, अक्कलकुवा शेती विकास सहकारी सोसायटीचे अध्यक्ष व सचिव ह्यांच्या सह्या असलेले चेक अक्कलकुवा येथल्या Dhulia Dist. Central Co-operative Bank चे इन्स्पेक्टर ह्यांनी अडवून ठेवले. चिफ्टनची संमती आधी आणा असे सांगितले गेले. ती कशी मिळवायची ? तर नेहमीच्या (रेग्युलर) मामलेदारासमोर alffidavit करायचे की, मी पट भरण्यास कबूल आहे, हा जबाब चिफ्टनला देऊन त्याची संमती आणायची? बँकेच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला प्रांजळपणे कबूल केले, की त्यांच्या वकिलाने त्यांना दिलेल्या सल्ल्याप्रमाणे शेतकऱ्यांचे चेक अडवणे बेकायदेशीर होते. असे असूनही त्यांनी हे चेक अडवले होते !

एक चेक अशी संमती न मिळवता बँकेने 'चुकून' एका शेतकऱ्याला दिला. पण तो नंतर वटविण्याचे नाकारले. कारण काय असे विचाराल तर सोसायटीचे खाते बंद झाले हे होय !

त्याचप्रमाणे अक्कलकुवा डांबर-रस्त्यासाठी सरकारने ती जमीन १० वर्षांपूर्वी संपादित (acqire) केली. तिची कथा ! जमीन घेताना ती शेतकऱ्याकडून घेतली. चिफ्टनला एका शब्दानेही विचारले नाही. मध्यंतरी काही शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदलाही मिळाला. पण यंदा, पटीचे काम सुरू झाल्यापासून इथेही आदिवासींची कोंडी करण्यात आली आहे. 'पैसे घेऊन जा' ही रीतसर नोटीस तयार केल्यावर विशेष भूमि संपादन अधिकारी, धुळे, ह्यांनी त्याला पुस्ती जोडली 'कूळ कायद्याचा निकाल झाला असल्यास ते कागद घेऊन यावेत, नाही तर मोबदला मिळणार नाही' ही पुस्ती संपूर्णपणे बेकायदेशीर आहे. ज्याच्याकडून जमीन घेतली त्यालाच आणि फक्त त्यालाच पैसे देण्याचा अधिकार नि कर्तव्य सरकारकडे येते. प्रत्यक्ष भेटीत तर भूमि संपादन अधिकाऱ्यांनी सांगितले की पट भरल्याची पावती आणा, नाहीतर आम्हीच त्या संपादन केलेल्या जमिनीची पट किती भरते ते पाहू व तेवढी रक्कम चिफ्टनला देऊन मगच तुम्हाला उरलेली रक्कम देऊ. 'पण तुमच्या नोटिशीत हे कुठे आहे ?' असे विचारता दात विचकत साहेब बोलते झाले 'वा, वा, प्रत्येक गोष्ट लिहायलाच पाहिजे वाटते?' हा सर्व कारभार बेकायदेशीर असूनही इतक्या निर्लज्ज, नि:शंक ? मनाने उघड उघड चालतो ह्याचे कारण एकच. शेतकऱ्यांची दाद-फिर्याद घेणारे कोणी नाही याची पक्की खात्री. शिवाय, नाक दावले की तोंड उघडते. प्रत्येक शेतकरी निदान दहा-पाच रुपये भूमी संपादन अधिकाऱ्याला खूष करण्यासाठी देऊ लागला तरी ती रक्कम चार आकड्यांत जाते. हे अधिकारी चाळीस हजार रुपये रोकड वाटप करण्यासाठी धुळ्याहून घेऊन आले होते. पट भरण्याची अट किती उशीरा 'सुचली' असेल ह्याची यावरून कल्पना यावी ! चिफ्टनने नुसती कोरडी तक्रार केल्याबरोबर शेतकऱ्यांचे पैसे अडविण्याइतका अधिकारीवर्ग खुळा नाही मग ते बँकेत आले की भूमि संपादनात असो. त्यांचे हात ओले केले जातात हे तर खरेच. पण शिवाय शेतकऱ्याला अडवले तर तो देखील थोडाफार खर्च करील ही एक आशा असते.

ह्यातही एक गोष्ट आहे. ह्या पधरा न्यायाधिकरणांपैकी तीन व्यक्ती अक्कलकुवा तालुक्यात अव्वल कारकून किंवा रेग्युलर मामलेदार म्हणून वास्तव्य करून गेलेल्या आहेत. जुनी माणसे असल्याने त्यांच्या ओळखी जास्त नि कुणाला किती नि काय मागावे ह्याचे आडाखे पक्के ! त्यांची अरेरावी. पैसे खाण्याची धमक भर कोर्टात चिफ्टनला केलेला पक्षपात इ. गोष्टी शहरातल्या माणसाला पाहूनच उमजतात. आपण त्याची कल्पनाच करू शकत नाही.

पंधरा टेनन्सी मामलेदारांपुढे उभे राहायला खेडुतांना पंधरा वकील हवेत. सरकारने म्हणे Legal aid देण्याचे कबूल केले आहे. त्याला दोन महिने झाले. ही मदत अजून अक्कलकुव्यास पोचायचीच आहे. आदिवासींशी हे लोक कसे वागतात हे वर दिलेच आहे. त्यांची पाठ राखणारा कुणी असला तरच हा निरक्षर भयभीत गरीब आदिवासी कोर्टात काही बोलू धजतो. तो सहसा पट नाकारीत नाही. कारण तसे केल्यास मामलेदार चिडतो, हे त्या शेतकऱ्याला ठाऊक आहे. आणि वस्तुस्थिती अशी आहे की, ह्या शेतकऱ्यांना मामलेदारापेक्षा वाघदेखील जास्त मायाळू वाटतो. मामलेदार म्हणेल तिथे अंगठा देऊन पळ काढणे हेच त्याचे ध्येय असते. सर्व धैर्य एकवटून तो जर काही बोललाच तर त्याची न्यायासनावर बसलेले हे अधिकारी जी ससेहोलपट करतात ती अगदी बघण्यासारखी आहे. म्हणजेच न बघवणारी !

असा हा अक्कलकुवा. 'अक्कलकुवा ? मग विहीर भरलेली आहे की रिकामी ?' अशी कोटी केल्याशिवाय राहवणे कठीण ! ह्याचे उत्तर वाचकांनीच ठरवावे ! □

# सोलकढी

## □ चिंतुराया आणि ( पडद्यामागची ) ' चानी '

मराठी चित्रपटव्यवसायात एक सुवर्णकाळ असा होता की ज्या वेळी खांडेकर,अत्रे, काणेकर, ना. ह. आपटे (यांना कोणी कोणी ' ह. ना. आपटे ' असेही म्हणतात ) प्रभृती लेखक म्हणून स्वतंत्रपणे प्रसिद्धीला आलेली मंडळी चित्रपटकथा वगैरे लिहायची. नंतरच्या एका विस्तीर्ण कालखंडात, गजानन दिगंबर माडगूळकर या एकाच बहुढंगाळ माणसाने, आपल्याला जणु दहा अकरा हात आहेत अशा लाघवाने, पटकथालेखन केले. माडगूळकर पटकथा लिहीत असताना दुसऱ्या कोणाला पटकथा लिहायचे सुचण्यासारखे नव्हते. अलीकडे माडगूळकरांनी हात आवरले, आणि मराठी चित्रपटांची उपासमार झाली. आता पुन्हा एकदा, लेखक म्हणून स्वतंत्रपणे प्रसिद्धीला आलेली मंडळी चित्रपटकथा वगैरे लिहू पाहतील की काय, असे वाटू लागले आहे. आमचे विजय तेंडुलकर या पटकथाकीर्तनात बऱ्यापैकी रंगलेले दिसतात. तेंडुलकरांच्या पाठोपाठ खानोलकरांचा चितामणी या फंदात बेहिशेब गुलालबुक्का उधळणार, अशी चिन्हे आहेत.

चिंतामणी खानोलकर हा मराठीतला एक ग्रेट्टा मोठ्ठा लेखक आहे, असे शंकर सारडा-माधव आचवलांसारख्या किती एक जाणकारांप्रमाणे माझेही मत आहे. कारणे कदाचित वेगळी असतील; पण मत एकच. खानोलकरांची पुस्तके ' मौज प्रकाशना'तर्फे प्रसिद्ध होतात म्हणून मी त्यांना मोठ्ठा मानतो, असे आपल्यापैकी काही जणांना वाटले तर ते योग्य, उचित आणि स्वाभाविकच होय; पण त्यापलीकडे जाऊन खानोलकरांनी केवढेच्याकेवढे लिहिले आहे ते आठवा. तथापी, तेवढे लिहूनसुद्धा आम्ही ज्यांना मोठे मानत नाही असे काही लेखक मराठीत आहेत ब रे. आम्ही खानोलकरांना एवढे मोठ्ठे मानतो याचे कारण त्यांच्यापाशी असलेली, सर्वांना चाट करणारी, अचाट अस्मिता. आता मराठीतला लेखक म्हटला म्हणजे त्याच्यापाशी बचकभर अस्मिता ही असायलाच हवी; पण खानोलकरी अस्मितेची बचक आणि इयत्ताच वेगळी. तपकीर ओढताना आणि नंतर शिंका देतानासुद्धा आपली कलावंती अस्मिता न विसरणारे हे चितामणी खानोलकर मोठेच असले पाहिजेत, हे स्वयंस्पष्टच आहे.

कतावंत खानोलकर देवाचे लाडके आहेत. त्यांनी बेछूटपणे, मन मानेल तसे वागडावे, यासाठीच देवाने हे जग निर्माण केले आहे. आपल्याला त्यांचे कोडकौतुक पाहायला मिळते हे आपले केवढे मोठे भाग्य. खानोलकरांना काचेमधून दिसत नाही; घोंड्यामधून व्यवस्थित दिसते. त्यामुळे घोटाळे होतात. खानोलकर बिचारे सहज कलावंतासारखे वागतात; भोवतालची माणसे सहज माणसांसारखी वागतात. त्यांना खानोलकरांचे काही समजत नाही. ते आपल्या बिनहाडाच्या, वाजक्या अ-पडजिभेने चिंतामणी खानोलकर या देवदूताच्या नावाने शिमगा करतात. (शेमलेस लेकाचे.)

सोदाहरण सांगायचे तर त्याचे असे झाले :

चिंतामणी खानोलकरांनी पाच वर्षांपूर्वी ' चानी ' ही दीर्घ कथा लिहिली. ( काही साक्षेपी समीक्षकांना ' चानी ' ही लघु कादंबरी आहे, असे वाटते. दीर्घ कथा आणि लघु कादंबरी या, जलद चालणे आणि हळू धावणे यांच्याप्रमाणे, दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत, कळ्ळें मू ? (कळ्ळें मूं ? ) ' गणुराया ' आणि ' चानी ' या पुस्तकात (मौज प्रकाशन : १८३) ती प्रसिद्ध झाली. ती त्यांनी ' मित्र माधव आचवल यांस ' अर्पण केली. (वाचकांना कदाचित हा तपशील अनावश्यक वाटेल; पण अनावश्यक तपशिलाने कित्येकदा आवश्यक तो कार्यभाग साधला जातो, हे त्यांनी लक्षात घ्यावे. ) ती दीर्घलघु कथाकादंबरी तेव्हा फारशी कोणी वाचली नाही. चित्रपटनिर्माणेच्छूंचा एक वेगळा वाचकवर्ग नव्याने तयार होतो आहे. त्यांनी अलीकडे ' चानी ' वाचली. त्यातल्या गोविंद निहलानी नावाच्या माणसाला ती आवडली. चित्रपटाला अनुरूप वाटली. चित्रपट काढायला ढीगभर पैसे लागतात, असे मी ऐकले आहे. गोविंद निहलानीजवळ ढीगभर किंवा अढीगभर-पैसेच नव्हते. तेव्हा त्याने चित्रपट अर्थसाहाय्य महामंडळाकडे अर्थसाहाय्याची याचना केली. हे मंडळ अर्थसाहाय्य करण्यासाठी टपलेलेच असते, असे मी ऐकले आहे. शिवाय, केलेले अर्थसाहाय्य परत मिळावे असे काही या मंडळाला वाटत नाही, असेही मी ऐकले आहे. असो. याचना केल्याबरोबर गोविंद निहलानीला अर्थसाहाय्य मिळाले. ' चानी ' या चित्रपटाची पूर्वतयारी त्याने पुरी केली. विसार देऊन चितामणी खानोलकरांकडून कथेचे हक्क त्याने आधीच मिळवलेले होते. एक गोष्ट सोडून, सगळे कसे जसे व्हायला हवे होते तसे झाले होते. ती गोष्ट म्हणजे चिंतामणी खानोलकरांनी मधेच ' चानी ' हीच कथा दुसऱ्या कोणाला तरी विकून टाकली नव्हती. देवाच्या लाडक्या चितामणीचा तो एक कलात्मक छंद आहे. वसंत कानेटकर चार नाटके चार संस्थांना देतात; खानोलकरांचा हा चिंतामणी एकच नाटक एकाच वेळी पाच-सात संस्थांना एकमेकांच्या नकळत देतो. हा खराच चिंता-मणी. गोविंद निहलानीला तो लाभत नाही, असे सर्वांना वाटू लागले होते.

पण कसचे काय नि कसचे काय-मोराचे पाय नि हाय हाय. चिंता-मणी खानोलकरांनी एका कलाछांदिष्ट उबळीसरशी ' चानी ' हीच कथा ' राजकमल'च्या ' पिंजरा'फेम व्ही. शांतारामना ×+×+×+×+ हजारांना विकून टाकली. कारण गोविंद निहलानीकडे ती कथा दीर्घ काळ कुजत पडली होती. वर त्या चित्रपटाच्या संकल्पित नायिकेने देवलाडक्या खानोलकरांचा असा पाणउतारा केला होता की खानोलकरांनी ती नकोनायिका झाली होती. इतकेच नव्हे तर आपण ' चानी'च्या नावाखाली ' कोंडुरा'च शांतारामना विकली अशीही वावडी या मालवणी मण्याने सोडली. यथाकाल या गोष्टी कुमुदबेन मेहतांच्या नेढ्यातून थेट गोविंद निहलानीपर्यंत पोचल्या. त्याने आपल्याच गालफडात (हळुच) दोन मारून घेऊन चितुराया आणि ' चानी ' हा विषय डबाबंद केला. चितुरायाने गोविंदला दिलेला शब्द मोडला, परस्पर विश्वास पायदळी तुडवला, म्हणून काही तत्त्वनिष्ठ मंडळींनी त्याची ( म्हणजे चितुरायाची ) तडक तारेने शेमशेम केली.

( त्या सुमारास चितुरायांना भेटल्यावर कोणी ‘ कसे काय ? ’ विचारल्यास, ‘ क्षेम आहे ’ असे उत्तर देण्याऐवजी ते ‘ शेम आहे ’ असे उत्तर द्यायचे, अशी वदंता आहे. ) स्वतः चितुराया मात्र चानीच्या भूमिकेत ‘ संध्या ’ किती जसबाती दिसेल, याचे नवरंगीन चित्र पाहात खुशाल झाले.

हे सगळे इथेच थिजून राहिले असते. पण थिजलेले तापवून भुर्भुरकले नाही तर पत्रकारांना खाकमांजरी होते. म्हणून प्रथम सर्वाधिक खपाच्या ‘ नवशक्ती ’ने आणि नंतर सर्वाधिक खपाच्या ‘ लोकसत्ते ’ने, चितुरायाने केले ते योग्य, उचित आणि स्वाभाविकच होय, असा निर्वाळा देऊन शेम शेम करणाऱ्या शहाजोगांची चांगली हजेरी घेतली. खानोलकरांचे देवलाडकेपण ओळखणारे माझ्यासारखे आणखीही साक्षात्कारी सज्जन या महाराष्ट्र देशात आहेत, हे पाहून मला अतीव संतोष झाला. एका हाताने टाळी वाजवण्यात माझा हात या महाराष्ट्र देशात कोणी धरू शकणार नाही. अशा टाळ्या वाजवाजवून माझा हात मुष्टियोद्धयाच्या मोजा चढवलेल्या हातासारखा टरारला; पण मी पर्वा केली नाही. कलावंताचे कौतुक मी नेहमीच सढळ हाताने करतो.

इतक्यात माझ्या तीक्ष्ण कानांवर एक अमंगळ वार्ता आली; गोविंद निहलानीने ‘ लोकसत्ते ’ला कायदेशीर ताकीद दिली होती. त्याच्या मते, रविवार दिनांक ६ एप्रिल १९७५ च्या ‘ लोकसत्ते ’तल्या ‘ शेमफुल शेम शेम ’ या अग्रलेखातला मजकूर चुकीचा आणि संबंधित व्यक्तींना बदनामकारक होता. तेव्हा ‘ लोकसत्ते ’ने एक तर माफी मागावी किंवा माफी न मागता कायदेशीर इलाजाला तोंड द्यायला सिद्ध व्हावे. हे ऐकून मी खिन्नविषण्णविमनस्क झालो. वाटले, काय चालले आहे हे ? कला–कलावंताच्या कैवाऱ्याला कायद्याचा काच अं ? अरे अरे अरे अरेरे अरेरे ! लगेच ‘ लोकसत्ते ’चा लख्ख लौकिक आठवला आणि मनाला पुन्हा उभारी आली. ‘ लोकसत्ता ’ हे माझ्यासारख्या लाखो वाचकांच्या आदराला पात्र होत्साते सर्वाधिक खपाचे वर्तमानपत्र झाले आहे. त्यातला मजकूर इतर वर्तमानपत्रांतल्यासारखा नुसताच खुसखुशीत खमंग नसतो, तर तो खरासुद्धा असतो अशी आमची श्रद्धा. विशेषतः त्यातले अग्रलेख. त्यात देखील रविवारचे अग्रलेख, सत्य–सभ्यता–समतोल–सर्वसाक्षित्व–समाजहितेच्छा–सारासार विवेक – सद्भिरुचिसंपन्नता – या त्यातल्या दुर्मिळ गुणांमुळे एका वेगळ्याच कोटीतले ठरले आहेत. ( त्यांना ‘ वेगळ्याच कोटीतले ’ म्हणून त्यातला कोटीबाजपणा आम्ही ज्या ख़ुबीदारपणे सूचित केला त्याला वाचकांनी दाद द्यावी, अशी आग्रहाची विनंती आहे. ) त्यातल्या दुभाषितांनी ( संस्कृत आणि उर्दू या दोन भाषांतल्या भाषितांनी, असा अर्थ ) तर अख्ख्या महाराष्ट्र देशाला उल्लू केले आहे. तेव्हा ‘ लोकसत्ता ’वाले गोविंद निहलानीचा यथास्थित गोविंदा करतील आणि चितुरायांची दहीहंडी सलामत राखतील, अशी आमची ठाम खात्री होती.

पण कसचे काय नि कसचे काय–मोराचे पाय नि हायहाय. रविवार दिनांक २७ एप्रिल १९७५ रोजीचा ‘ लोकसत्ता ’ हाती पडला. आम्ही तो अधाशीपणे चाळू लागलो. चाळताना ‘ दिलगीर आहोत ’ या शीर्षकाची एक अभद्र, काळी चौकट आमच्या चाळत्या डोळ्यांना दिसली आणि आम्हाला वाटत असलेल्या ठाम खात्रीचे फसकफदफदे झाले. चौकटीत चक्क छापले होते : “ रविवार दि. ६ एप्रिल १९७५ रोजी ‘ रविवारच्या लोकसत्ते ’मध्ये आम्ही लिहिलेला ‘ शेमफुल शेम शेम ’ या शीर्षकाचा अग्रलेख वाचकांच्या स्मरणात असेल. ( काही वाचकांच्या सरणात असला तरी आमच्या मात्र स्मरणात होता हो होता. ) श्री. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या ‘ चानी ’ कादंबरीवर आधारित चित्रपटाच्या चित्रीकरण–हक्कावरून उद्भवलेल्या वादावरील या लेखाचा पाया पूर्णतः ( अं ? ) चुकीच्या व एकतर्फी माहितीवर आधारलेला होता असे आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. ( कोण तो निदर्शक ?–जें न देखे कवि ते देखे ‘ रवि ’ ? ) या संपादकीयातील काही एकतर्फी विधानांमुळे श्री. गोविंद निहलानी आणि लेखात निर्देशिलेल्या संबंधित व्यक्तींना जो मनस्ताप झाला असेल, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. श्री. निहलानी व संबंधित व्यक्तींच्या वैयक्तिक आणि धंदेवाईक प्रतिमेस जर धक्का बसला असेल तर त्याबद्दल आम्ही खेद व्यक्त करतो–” ( अवतरणचिन्हातल्या या मजकूर–ए–दिलगिरीमध्ये भेटणारे कंस तेवढे ‘ अनंतरावां ’चे आहेत. )

आता पुढे काय होईल अशी दचकशंका वाचकांना पडली असेल. त्यांच्या समाधानासाठी सांगतो की, मागे जसे झाले तसेच पुढे होईल. मागे एक आणि पुढे दुसरे, असा दुटप्पीपणा मराठी माणसात नसतो. यापुढे देखील ‘ लोकसत्ता ’वाले तसेच अग्रलेख लिहितील, तशीच दिलगिरी मागतील; वाचक दोन्ही गोष्टी समजूतदारपणे वाचतील. यापुढे देखील चितुराया खानोलकर चित्रपटकथा लिहितील; एक कथा अनेकात उधळून आपल्यातला देवलाडका कलावंत जगवतील; यापुढे देखील चितुरायांचे कलाकौतुक करण्यासाठी एका हाताने टाळी वाजवायचा कार्यक्रम ‘ अनंतराव ’ रसिकतेने करतील.

–अनंतराव



# अन्योक्ती पंचक

अनिरुद्ध कुलकर्णी

१

हे गरुडा, तुझी जागा आहे दुर्लक्षित म्युझिअममध्ये
क्रूर सवय सोड तू तुझी उंच सुळक्यांवरून खडबडीत
वळवळत्या आकारांकडे सोसाट्याने झेपावण्याची.
फडर्चा पिसांमध्ये आकाशाची पुण्याई साठविण्याची.

तू प्रतिगामी आहेस तुला उंचीची आवड आहे.
तू आहेस पौराणिक, कोणा क्वचितच दिसतोस.
तरीही दर चार वर्षांनी तुलाही एक मत मिळेल.
वंशावळ तुझी तिच्यापर्यंत हाच निरोप पोहोचव.

सूर्यबिंबाला शिवण्याच्या वेडात जळालेत तुझे पंख.
त्याचेच निमित्त करून तुला इस्पितळात ठेवतील.
राष्ट्रध्वजावर कीर्ती कोरू पाहशील तर तोच फाडतील.
तुला कुठे गाता येते तीन मिनिटांचे लोकप्रिय भावगीत !

तुला ध्रुवताऱ्याची विलक्षण स्थिरता उमजली आहे.
त्यातील शाश्वताची कठीणता पचवता आली आहे.
ही घटनाच झाकण्यासाठी येथे बटबटीत निऑन साइन्स
वाहत्या रस्त्यांवर, उंच लावण्यात येत आहेत.

तुझ्या चोचीला मात्र तू मेल्यावर खूपच किंमत येईल.
नागिणीसारखे अवघड दुखणे ती दूर करते.
तुझ्या सावलीला मात्र राजधानीत गौरविण्यात येईल.
संकटकाळी तिच्या गारव्याने धीर येतो म्हणून.

२

कोल्होबा, कोल्होबा, सत्तेचे राजकारण आता पालटले आहे !
फसलास ना तू ? गावठी कुत्तरड्याला बहीण देऊन ?
तुझ्या मिचमिचत्या घाऱ्या डोळ्यांनी आता तू कर
इतिहास लिहिण्याच्या निमित्ताने दीर्घ आत्मपरीक्षण.

गुरूची विद्या गुरूला दिली जातेय्, तू आला फिरून
बँकॉक हाँगकाँग ते थोर लंडन...बिडन...
तुझ्या विलायती आयाळीला, अपटुडेट नखऱ्याला.
कोणीच नाही बघत, फिरला काळ कृतान्तच.

शिरू नकोस परमार्थात झालाय् घातक उशीर
काकड्याच खाव्या लागणार, फार तर लाव तिखट-मीठ.
जिवंत समाधी घेण्याची नाही तुझी कुवत.
व्यवहार कणीक तिंब थोडी उडून जाईल हातचे पीठ.

मित्रमैत्रिणींची थांबव तुझ्यासाठी चाललेली कोल्हेकुई
उसाच्या शेतात घुसाल तर बसतील सहकारी इक्षुदण्ड पाठीत.
आकर्षक झालात तरी तुमची एकमेकांची जाहिरात
कोंबडीचे पिल्लूही ओळखते आता पहिली-दुसरीत.

ते बघ कोल्होबा ! आकाशातील शुभ्र नवीन ढग.
त्या बघ क्षितिजावर डोंगरांच्या निळ्या स्मितरेषा.
तो बघ मळा ! ती बघ सीडलेस् अन् अनावेशाही.
पण घाल खिशात हात अन् काढ स्वतःचे पैशाचे पाकीट.

३

मुंग्यांनो, हे काय नाटक लावले आहेत तुम्ही
न बडबडता प्रचंड वारूळ निर्माण करायचं ?
अतिसूक्ष्म नेत्यांनी भविष्याचा मर्मभेद करून,
वर्तमान कष्टवून; तजवीज भक्कम उद्याची करण्याचं ?

कुणी घालून दिली तुम्हाला ही आधुनिक शिस्त
स्वतःला विसरून नियमांना शरण जाण्याची ?
तुमचा लाल रंग कुठल्या पोथीतला दिसत नाही.
तुम्हाला रक्त आहे की नाही हेच समजत नाही.

मुंग्यांनो, तुम्हाला वर्गसंघर्षाची कल्पनाच नसावी.
तुम्ही साऱ्याच साखरकण वेचताना दिसता आहात.
नुकताच मोठा सर्पराज तुम्ही कणूनकणून खाल्लात
त्याचे पारंपारिक विष तुमच्यात भिनलेले असावे.

एरवी तुम्ही संप केलेच असतेत. आवाज भरडून
आम्हाला ऐकू येतीलश्या ‘ बंद ’च्या किंकाळ्या दिल्याच असत्या.
कामाचे तास कमी करून, प्रजा वाढविली असती
होत्याचे नव्हते करण्याची हातोटी हस्तगत केली असती.

आमच्या व्यक्तिपूजनाला तुम्ही कडकडून चावता.
तुम्हाला रॉकेल ओतून जीवेच मारले पाहिजे.
तुमच्या अणुवत् संकुचित मेंदूमेंदूत
विश्वाची भव्यता जीवनाची अर्थशून्यता कोंबलीच पाहिजे !

४

विठू पोपटा ! तुझा रंग पोपटी चोंचुली लाल
त्यामुळेच पडतेय तुला लाल क्रांतीचे हिरवेगार स्वप्न.
आता तर तू झाला आहेस अभिनंदनास पात्र
आणखी एक नवी भाषा 'सशास्त्र' शिकलास म्हणून.

ती पहा पूर्वीप्रमाणेच बागडणारी मूर्ख कबुतरे
अन् स्वतःची घरटी बांधणाऱ्या कावळे-चिमण्या.
त्या नादानांना कधीच उमजणार नाही
तुझ्या महान कल्पना-पिंजऱ्याचे प्रायोगिक मूल्य !

वाटते त्यांना अजून तुला कच्चे पेरूच आवडतात.
भिजलेली डाळ नी हिरव्या मिरच्या मानवतात.
बेअक्कल भगवी कुठची त्यांना काय कळणार
अलीकडे पाहातो आहेस तू अति डावीकडे.

विठू; तुझी 'शीळ' सखी राघू देखील वापरतो
परदेशातील बागेत तुझी फळझाडे लकडली आहेत
याचाच गवगवा करीत हा उथळ झरा
बांबूच्या वनाशेजारी कृत्रिम गाणी गातो.

काय हा उन्हाचा कडाका, एप्रिलच्या सुरुवातीलाच
अजून तर सारा मे आहे रखरखीत उलटायचा.

तू हाक दे ! तुझ्या घामामधून...तुझ्या व्याख्यानातून,
उद्या पेटणार आहे शिल्लक असलेलं रान !

५

गिधाडांनो, तुमचा त्रिवार जयजयकार असो !
हंस, गरुड, कोकिळ, मोर आणि पोपटांवर देखील
तुमच्या वाढत्या टोळीने मात केली आहे.
पहा पेंग्विनांनी देखील माना खाली घातल्या आहेत.

खुद्द वास्तवसुद्धा आता तुम्हाला टरकते.
बदनाम होण्याची त्याला भीति वाटत असावी.
तुमच्या वाडवडिलांनी मटकावली जरी पशुमाणसांची प्रेते
तुम्ही चोचून फाडून खाता तरुणांची लुसलुशीत मने.

सारेच मूर्ख आहेत नी फक्त तुम्हीच शहाणे आहात
कुठल्याही अनुभवावर फक्त तुमचीच पकड आहे;
हे कटु सत्य हळूहळू सर्वत्र मान्य होत आहे.
स्थितिप्रिय समाजात नाविन्याचा स्वीकार असाच होतो.

तुमची केसाळ पिले तर तुमच्याहीपेक्षा सवाई
ही तर शुद्ध असणार नियतीची गहनगूढ कारवाई.
टरकावून देतील ते पावसांचे ढग, झकास
फक्त मद्यार्कांवर वाढतील करून पाण्याचा त्याग.

तुमच्या उंच मानांभोवती विचित्र रुद्राक्षमाळा
तुमच्या नेत्रांवर विराजमान विलक्षण गॉगलस.
...महाराजच आले !! महाराजांचा जयजयकार असो !
महाराज चिरायू होवोत ! तुमचाहि जयजयकार असो !!


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये
सहामाही : वीस रुपये
परदेश : (जलमार्गे)
पंचावन्न रुपये



# पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर

अनुवाद : रवींद्र गुर्जर

त्या कोठडीत खूपच अंधार होता, तथापि माझ्या कानांवर लोकांचे आवाज मात्र येत होते.

पुढील हालचाली जलद झाल्या. तीन वाजता कोठडीतून बाहेर काढून आमच्या हातात बेड्या ठोकण्यात आल्या. पुन्हा एक चौकशी. गव्हर्नर, डे. गव्हर्नर, मुख्य वॉर्डर आणि देगा. तो अर्थातच आमची स्टेटमेंट्स घ्यायला बसला होता.

'शॅरियर आणि कारबोनेरी, मुख्य वॉर्डरचा तुमच्याविषयीचा अहवाल ऐका!' तो थोडक्यात असा होता : आम्ही दोघांनी इमारत विभागातील वस्तूंची चोरी करून त्याचा गैरवापर केला. बोर्सेट, नेरिक आणि केनियर या तिघांनी त्याला हातभार लावला. मुख्य म्हणजे मी आणि कारबोनेरीनं थडगं उकरण्याचं दुष्कृत्य करून त्यात तराफा लपवला.

'यावर तुझं काय म्हणणं आहे ?' गव्हर्नरनं विचारलं.

'पहिली गोष्ट–कारबोनेरीचा यात काहीही संबंध नाही. तराफा फक्त माझ्या एकट्यासाठी बनवण्यात आलेला आहे. मी त्याला मदत करण्यास भाग पाडलं इतकंच. कारण एकट्याला ते काम अशक्य होतं. त्यामुळे कारबोनेरीवर चोरी आणि गैरवापराचे आरोप ठेवता येणार नाहीत–सुटकेशी तर त्याचा काहीच संबंध नाही. शिवाय प्रत्यक्षात सुटका झालेली नाहीच. बोर्सेटचाही बिचाऱ्याचा काही दोष नाही. मी सांगेन तसं न वागल्यास त्याचा खून करण्याची मी धमकी दिली होती. नेरिक आणि केनियर या दोघांना तर मी अजीबात ओळखत नाही. त्यांचा झाल्या प्रकाराशी काडीचाही संबंध नाही.'

'पण आम्हाला खबर वेगळीच मिळाली आहे.' एक पहारेकरी म्हणाला.

'तुम्ही सेलियरविषयीच म्हणता आहात ना ? तो दुसऱ्या माणसांना यात गोवून निष्कारण बदला घेतो आहे. त्याच्या बोलण्यावर तुम्ही कसा विश्वास ठेवता ?'

'थोडक्यात सांगायचं तर तुझ्यावर चोरी, मालमत्तेचा गैरवापर आणि सुटकेचा प्रयत्न करणे असे तीन आरोप ठेवण्यात आलेले आहेत. तुला ते मान्यही आहेत. तेव्हा आता तशा दाखल्यावर सही करशील तर ठीक होईल.' गव्हर्नर म्हणाला.

'कारबोनेरी, बोर्सेट, नेरिक–केनियर यांच्याविषयी मी सांगितलेल्या गोष्टी त्यात घातल्या नाहीत तर मी अजीबात सही करणार नाही.'

'ठीक आहे, तसा उल्लेख करा.' त्यानं देगाला सांगितलं.

त्यानंतर मी सही केली. अखेरच्या क्षणी आलेल्या अपयशामुळे माझ्या मनाची स्थिती काय झाली होती, ते सांगताच येत नाही. कोठडीत माझं डोकं ठिकाणावर नव्हतं. काहीही न खातापिता फक्त धूम्रपान करीत होतो. चालणंही बंद. फक्त रोज सकाळी एक तास बाहेर व्यायामासाठी काढण्यात येई, तेवढीच हालचाल.

एकदा गव्हर्नर मला भेटून गेला. सुटका यशस्वी झाली असती तर सर्वांत जास्त त्रास त्याला झाला असता, तरीही तो अजीबात चिडला नव्हता. युक्तिप्रयुक्तीनं त्यानं कारबोनेरीला गुंतवण्याचा प्रयत्न केला; परंतु मी दाद लागू दिली नाही. बोर्सेटनं तर लेखी धमक्याच दाखवल्या. मी गव्हर्नरला विचारलं, 'चोरीबद्दल किती शिक्षा मिळू शकेल ?' त्यानं सांगितलं की, फार तर अठरा महिने.

हळूहळू मी पूर्वस्थितीला येऊ लागलो. एवढ्यात चेतलकडून चिठ्ठी आली. सेलियरला हॉस्पिटलमध्ये त्याच्या देखरेखीखाली ठेवलं होतं. बिचाऱ्याला संरक्षणाची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे डॉक्टरांनी लिव्हरचा कुठला तरी अज्ञात विकार त्याला चिकटवला होता. थोड्याच दिवसांत त्याला दुसऱ्या बेटावर रवाना करणार होते.

माझी किंवा कोठडीची तपासणी होत नसल्यामुळे एक चाकू

पॅपिलॉननं भंगीकाम स्वीकारल्यामुळे सवलत म्हणून त्याला रोज समुद्रावर जाता येई. गव्हर्नरला दिलेल्या वचनाप्रमाणे तो सुटकेच्या तयारीला लागला नव्हता. नवा गव्हर्नर येण्यापूर्वी त्याच्या ताब्यात एक उत्कृष्ट होकायंत्र आलं. तयारीला सुरुवात झाली. ज्युलिएटच्या ओळखीमुळे सवलतीमध्ये आणखी वाढ झाली. बोर्सेट नावाच्या सुतारकाम जाणणाऱ्या कैद्याशी संधान बांधून तराफा तयार होण्यास सुरुवात झाली. एकएक भाग तयार झाला की बागेत लपवण्याचं काम कारबोनेरी करू लागला. अडीच-तीन महिन्यांत काम पूर्ण होत आलं. गुपचुप चाललेल्या कामावर एका इसमाची पाळत असावी असा संशय त्यांना आला. खबरदारीचा उपाय म्हणून त्याचा काटा काढावा असं सर्वांनी सुचवलं, पण केवळ संशयावरून एखाद्याचा खून करावा हे पॅपिलॉनला पटत नव्हतं. तराफा तयार झाला. आता उद्या समुद्रात घुसायचं, एवढ्यांत सर्व काही उघडकीस आलं. पॅपिलॉनला पुन्हा अंधारकोठडीत टाकण्यात आलं . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

# प्रकरण एकोणीस : एकांतवासाची दुसरी फेरी

मागवून घेतला. बेरिक, केनियर यांना निरोप पाठवला की, त्यांनी अशी मागणी करावी : सर्व प्रकारांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी सेलियर, मी आणि त्यांनी समोरासमोर यावं, खुलासे–प्रतिखुलासे करावेत. त्यानंतर योग्य तो निर्णय घ्यावा.

गव्हर्नरनं मला मान्यता दिली. उद्या सकाळी दहा वाजता सर्वांना समोरासमोर आणण्यात येणार. मुख्य वॉर्डर जातीनं लक्ष देणार होता. सर्व रात्रभर मी विचार करीत होतो. सेलियरला ठार करावं किंवा नाही. नकारात्मक निर्णयापाशी मी पोचूच शकलो नाही. त्याला सोडता कामा नये. इथून दुसऱ्या बेटावर तो गेल्यास सुटका करून घेण्याची शक्यता. म्हणजे एकाची सुटका रोखून ठेवल्याबद्दल दुसऱ्याला सुटकेची संधी मिळण्यासारखंच. पण खून केला तर पूर्वनियोजित म्हणून मृत्युदंड मिळेल त्याचं काय? काय वाट्टेल ते होवो. अपेक्षा, आनंद, पकडले जाण्याची भीती, हुरहूर यांत चार महिने गेले होते आणि सर्व काही सुरळीत पार पडल्यावर एका माणसाच्या जिभेमुळे स्वप्नांचे तुकडे तुकडे व्हावेत ! कोणतीही शिक्षा भोगावी लागली तरी मी उद्या सेलियरला ठार करणार, निदान तसा प्रयत्न तरी नक्कीच करणार !

त्याला आधी चाकू काढण्यास प्रवृत्त केलं तर मान वाचण्याची शक्यता होती. त्यासाठी माझा चाकू उघडा करून त्याला–फक्त त्यालाच–दाखवणं आवश्यक होत. चौकशीच्या थोडं आधी किंवा संपताक्षणीच कार्यभाग उरकायला पाहिजे. इतर वेळी पहारेकऱ्यांच्या गोळ्या खाव्या लागतील. वॉर्डर लोकांच्या निष्काळजीपणावर आपण विसंबून राहावं. सेलियरला शिक्षा ही मिळालीच पाहिजे. आयुष्यात काही काही गोष्टींना क्षमा करता येत नाही. कायदा हातात घेणं योग्य नाही, हे जरी खरं असलं तरी ते वेगळ्या समाजासाठी लागू आहे. अक्षम्य गुन्ह्याविषयी शिक्षा देण्याचा विचार न करणं बुद्धीला पटत नाही. त्या इसमाला मी उभ्या आयुष्यात कोणताही त्रास दिला नव्हता, तो मला ओळखतसुद्धा नव्हता. मला जिवंत खड्ड्यात लोटून तो दिमाखात जगणार होता. अशक्य ! दया दाखवणं अशक्य ! पण तुला मृत्युदंड मिळाला तर? अशा हलकटापायी तू ठार व्हावंस, हे कितपत योग्य आहे ? शेवटी मी असं ठरवलं की, त्यानं जर चाकू बाहेर काढला नाही तर त्याला ठार करू नये.

त्या रात्री क्षणभरही झोप लागली नाही. सतत धूम्रपान. सहा वाजता कॉफी आली तेव्हा फक्त दोनच सिगारेट बाकी होत्या. मी आणखी मागवून घेतल्या.

पावणेदहा वाजता मला बाहेर काढण्यात आलं. मुख्य खोलीत जाण्यासाठी मी उतावीळ झालो होतो. माझे चारही साथीदार हजर होतेच. तेवढ्यात एक अरब आणि सेलियर येताना दिसले. मला पाहून सेलियर थबकला. पहारेकरी त्याला म्हणाला, ' घाबरू नकोस. त्यांच्यापासून दूर राहा. कोणताही गैरप्रकार चालणार नाही ! '

आम्ही समोरासमोर आलो. अंतर दोन यार्डांहूनही कमी होतं. पुन्हा सूचना मिळाली, ' दोन्ही पक्षांत अजीबात चर्चा नको ! '

कारबोनेरी एका कॉर्सिकन रक्षकाबरोबर मातृभाषेत एकसारखा बोलत राहिला. तो रक्षक दोन्ही बाजूंकडे लक्ष ठेवून होता. बुटाची लेस बांधण्यासाठी तो खाली वाकला. त्या संधीचा फायदा घेऊन मी जरा पुढे सरकलो. सेलियरकडे तुच्छतेनं पाहून कारबोनेरी थुंकला आणि पुन्हा रक्षकाला बोलण्यात गुंतवलं. माझी हालचाल त्याच्या लक्षात आलीच नाही. हाताला चिकटवून मी चाकू उभा धरला. चाकू फक्त सेलियरलाच दिसू शकत होता.

–आणि अनपेक्षित वेगानं तो माझ्यावर तुटून पडला. माझ्या उजव्या हाताच्या दंडात त्याचा चाकू खोलवर घुसला. मी डावखोरा आहे. क्षणाचाही विलंब न लावता माझा चाकू मी त्याच्या छातीत खुपसला. अगदी मुठीपर्यंत आत–पूर्ण शक्तीनिशी. एक प्रचंड किंकाळी आणि तो खाली कोसळला.

पिस्तुल माझ्यावर रोखून अँन्टार्टग्लिआ (रक्षक) म्हणाला, 'मागे हो. पुन्हा त्याला जमिनीवर भोसकशील तर नाइलाजास्तव मला गोळी घालावी लागेल आणि तसं करायला मला मुळीच आवडणार नाही!'

सेलियरजवळ जाऊन कारबोनेरीनं त्याच्या डोक्यात लाथ घातली. कॉर्सिकन भाषेत तो दोन शब्द पुटपुटला. मला त्याचा अर्थ समजला. खलास झाला!

वॉर्डर म्हणाला, 'बच्चू, तुझा चाकू दे पाहू.'

मी देऊन टाकला. त्यानं स्ट्रेचर मागवून घेतलं. 'हा मुडदा इथून न्या!'

'कोण ठार झालं?' एकानं विचारलं.

'बेबर्ट सेलियर.'

'ओह्! मला वाटलं, पॅपिलॉन की काय?'

त्यांनी आम्हाला पुन्हा अंधारकोठडीत टाकलं. समोरासमोरच्या चौकशीचं प्रयोजन संपलं होतं. जाता जाता कारबोनेरी म्हणाला, 'बिचारा पपी. या वेळी तुला बराच त्रास होणार आहे.'

'चालेल, पण मी जिवंत आहे आणि तो ठार झालाय्!'

थोड्या वेळानं पहारेकरी एकटाच परत आला. कोठडीचं दार उघडून मला हलक्या आवाजात म्हणाला, 'दार ठोठावून ओरड की जखमी झालाय्स. आधी त्यानं हल्ला केला हे मी बघितलंय्.' तोच फार अस्वस्थ झाला होता.

हे कॉर्सिकन मोठे मनस्वी असतात. आडदांडही तितकेच. एक तर पूर्णपणे वाईट किंवा पूर्णपणे चांगले. दारावर धक्के मारून मी मोठ्याने ओरडलो, 'मी जखमी आहे. मला रुग्णालयात न्या!'

तो पुन्हा मुख्य वॉर्डरला घेऊन आला. 'तुला काय झालंय्? ही आरडाओरडी कशासाठी?'

'मला मोठी जखम झालीय्.'

'अरेच्या, तू जखमी आहेस? मला वाटलं त्याला संधीच मिळाली नाही.'

'माझ्या उजव्या दंडाचे तुकडे तुकडे झालेत.'

'दार उघडा!' प्रमुख म्हणाला.

दरवाजा उघडला. मी बाहेर आलो. दंडाला खरोखर मोठी दुखापत झाली होती.

'याच्या हातात बेड्या ठोका आणि रुग्णालयात जा! कोणत्याही परिस्थितीत त्याला उपचार झाल्यावर तिथे ठेवू नका, परत आणा!'

रुग्णालयात पोचल्यावर चेतलनं डॉक्टरला बोलावलं. भूल न देता दंडाला टाके घालण्यात आले. ते काम पुरं होईपर्यंत मी गप्प बसलो. आठ टाके पडले. नंतर तो म्हणाला, 'माफ कर, पण दंड बधिर करण्यासाठी इंजेक्शन शिल्लक नव्हतं.' डॉक्टर पुढे म्हणाले, 'हे तुझं कृत्य बरोबर झालं नाही, पॅपिल'

'हूं, काहीही केलं तरी तो जास्त जगणार नव्हताच, नाही का डॉक्टर? लिव्हरच्या विकारामुळे त्याचे दिवस भरलेच होते.' या अनपेक्षित उत्तरामुळे डॉक्टर माझ्याकडे आ वासून पाहू लागले.

चौकशी-सत्र पुन्हा सुरू झालं. बोर्सेटवरील आरोप काढून घेण्यात आला. भीतीपोटी त्यानं मला मदत केली हा मुद्दा मान्य झाला. तशी समजूत करून देण्यासाठी मी सर्व ते प्रयत्न केले. पुराव्याअभावी नेरिक आणि केनियर यांनाही सोडून देण्यात आलं. राहिलो कारबोनेरी आणि मी. चोरी आणि गैरवापराचे त्याच्यावरील आरोप काढून घेण्यात आले. प्रश्न उरला फक्त सुटकेच्या तयारीचा. माझ्याबाबत प्रश्न गुंतागुंतीचा होता. स्वसंरक्षणासाठी मी हल्ला केला हे त्यांना पटत नव्हतं. पण देगाच्या म्हणण्यानुसार मी जखमी झाल्यामुळे मृत्यूची शिक्षा मिळणं अशक्य होतं. माझ्याविरुद्ध फक्त एकच गोष्ट होती. दोन अरबांनी मला आधी चाकू काढताना पाहिलं होतं. तशी साक्ष त्यांनी दिली होती.

चौकशी पूर्ण झाली. कोर्ट मार्शलसाठी सेंट लॉरेंटला जावं लागणार होतं. मी नुसतं धूम्रपान करीत होतो. त्यांनी दुपारी जादा एक तास बाहेर व्यायामाची परवानगी दिली. विशेष गोष्ट अशी की गव्हर्नरपासून सर्वांनी मला चांगली वागणूक दिली. लागेल तितकी तंबाखू मिळत होती. सर्वजण माझ्याशी सहानुभूतीनं बोलत असत.

शुक्रवारी निघावं लागणार होतं. आज मंगळवार. गव्हर्नरचा बुधवारी सकाळी दहा वाजता निरोप आला, 'माझ्याबरोबर चल.' तो म्हणाला. मी त्याच्या मागोमाग चालू लागलो. त्यांच्या घराकडेच आम्ही जात होतो. 'तू जाण्यापूर्वी माझ्या पत्नीला तुला भेटायचंय्. तिला वाईट वाटू नये म्हणून मी हत्यारी वॉर्डरला बरोबर घेतलेलं नाही. माझी खात्री आहे की तू चांगला वागशील.'

'होय, गव्हर्नरसाहेब.'

आम्ही त्याच्या घरात शिरलो. 'ज्युलिएट, मी वचन दिल्याप्रमाणे तुझ्या मित्राला आणलेलं आहे. बारापूर्वी त्याला परत न्यावं लागेल, हे तुला ठाऊकच आहे. तुम्हाला तासभर बोलता येईल.' आणि आम्हाला तिथेच सोडून तो निघून गेला.

ज्युलिएट जवळ आली आणि माझ्या खांद्यावर हात ठेवून माझ्याकडे एकटक पाहू लागली. तिचे डोळे पाणावले होते. अश्रू तिनं कसेबसे रोखले होते. 'मला तुझा राग आलाय्, पॅपिलॉन. तुला जायचंच होतं तर मला आधी का बोलला नाहीस? माझा तुला उपयोग झाला असता. आता यजमानांच्या हातातही काही राहिलं नाही. तुला बोलावून घ्यायचं पहिलं कारण—मला तुझी स्थिती पाहायची होती. तुझी हिंमत दांडगी आहे, त्याबद्दल तुझं मनःपूर्वक अभिनंदन. दुसरी गोष्ट—इतके दिवस उदारपणे मला रोज मासे दिल्याबद्दल फूल ना फुलाची पाकळी तुला द्यायची आहे. हे एक हजार फ्रॅंक्स् घे! इतकेच मी जमवू शकले. ते अगदी थोडे आहेत याची मला जाणीव आहे.'

'मॅडम, प्लीज. मला पैशाची जरूरी नाही. मला ते घेता येणार नाहीत आणि त्यामुळे आपल्या मैत्रीत बाध येईल हे तुम्ही कसं लक्षात घेत नाही?' असं म्हणून मी तिचा हात मागे सारला. 'प्लीज, मला तसा आग्रह करू नका!'

'जशी तुझी इच्छा,' ती म्हणाली, 'थोडंसं मद्य तरी घेशील ना?' असं म्हणून नंतर तासभर ती गोड बाई माझ्याशी मोकळेपणानं बोलत राहिली. मला फार तर दीड ते दोन वर्षं शिक्षा मिळेल असं तिला वाटत होतं. सेलियरला मी योग्य ती शिक्षा दिली असं तिचं मत पडलं.

निघताना तिनं माझे दोन्ही हात हातात घेऊन दीर्घकाळ दाबून धरले. ती म्हणाली, 'पुन्हा भेटू, गुडलक!' आणि स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

गव्हर्नरसह मी परतलो. मार्गात मी त्याला म्हणालो, ' गव्हर्नर, तुम्हाला जगातील एक उत्तम स्त्री पत्नी म्हणून मिळाली आहे. '

' तुझं म्हणणं खरं आहे. इथलं आयुष्य तिच्या दृष्टीनं फार वाईट आहे. तिच्यावर तो अन्यायच आहे; पण मी तरी काय करू ? अजून चार वर्षं इथे काढली की मी निवृत्त होईन ! '

' गव्हर्नरसाहेब, तुमच्या पुढील अडचणींची पर्वा न करता तुम्ही मला शक्य तेवढी चांगली वागणूक दिलीत याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद ! '

' होय, तुझ्यामुळे माझी डोकेदुखी सुरू होणार होती, पण खरं सांगू–तुला यश मिळायला हवं होतं, तुझी तशी लायकीच आहे. ' कोठडीच्या दारापाशी गेल्यावर तो म्हणाला, ' गुडबाय, पॅपिलॉन. ईश्वर तुझं रक्षण करो ! '

' गुडबाय, गव्हर्नर ! '

खरंच, आता मला ईश्वराच्या साहाय्याची जरूरी होती, कारण कोर्टमार्शल चालवणारा मेजर अत्यंत निर्दय म्हणून प्रसिद्ध होता. चोरी, सामानाचा गैरवापर आणि थडग्याचा वापर यासाठी तीन वर्षं; अर्थात सुटकेचा प्रयत्नही. सेलियरच्या खुनाबद्दल पाच वर्षं. आठ वर्षं एकांतवास ! मी जखमी झालो नसतो तर मृत्युदंड ठरलेलाच होता.

**सेंट जोसेफ**

अशा रीतीनं मला आठ वर्षं एकांतवास मिळाला. त्यांनी मला सेंट लॉरेंटवर निष्कारण अडकवून ठेवलं नाही. सोमवारी आम्ही तिथे पोचलो, गुरुवारी कोर्टमार्शल आणि शुक्रवारी सकाळी आम्हाला बोटीवरून पुन्हा बेटांकडे रवाना केलं.

होतो एकूण सोळा जण–पैकी बारा एकांतवास मिळालेले. समुद्र अशांत होता. नेहेमीपेक्षा उसळलेली मोठी लाट डेक भिजवून टाकत होती. दारुण निराशेमुळे ' ओल्ड टब ' बुडून गेली तर बरं; इथपर्यंत विचारांची मजल पोचत होती. कोणाशीही न बोलता मी अंतर्मुख झालो होतो. हॅट हवेबरोबर उडून गेली तरी मी स्वस्थ बसून राहिलो. पुढील आठ वर्षांत तिची जरूरीच काय होती ? वाऱ्याच्या दिशेला तोंड करून इतक्या जोरात श्वास आत घेतला की अखेर ठसका लागला. ' शार्क माशांनी सेलियरला केव्हाच फस्त केलं असेल. तू आता तीस वर्षांचा आहेस, आणि तुला आठ वर्षं एकांतवास भोगायचाय् ! ' काय नरभक्षक आठ वर्षं काढू देईल ?

अनुभव तर ' अशक्य ' असंच सांगत होते. सहनशक्तीची मर्यादा फार तर चार-पाच वर्षांपर्यंत टिकेल. सेलियरला मारलं नसतं तर तीनच मिळाली असती. कदाचित दोनसुद्धा. पण खुनामुळे सुटका-प्रकरण गंभीर बनलं. त्याला ठार करायला नको होतं. मनुष्य म्हणून जगताना कायदा हातात घेणं बरोबर नाही; पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुटका करून घ्यायची म्हणजे जिवंत तर राहायला हवं ना ? तरीही ती चूकच झाली. मी काय किंवा तो काय, कोणीही आयुष्य गमावणं योग्य नव्हतं. जगणे, जगा, जगू द्या ! हाच माझा धर्म असायला हवा.

बोटीवरील एका वॉर्डरला मी ओळखत होतो. त्याचं नाव ठाऊक नव्हतं, पण त्याला एक प्रश्न विचारावा असं सारखं वाटत होतं. ' साहेब, एक प्रश्न विचारू का ? '

चमकून तो जवळ आला. ' काय ? '

' एकांतवास आठ वर्षं मिळाला आणि तो भोगून माणूस जिवंत, चांगल्या स्थितीत बाहेर आला असं एखादं उदाहरण तुमच्या आठवणीत आहे का ? '

विचार करून तो म्हणाला, ' नाही. पण पाच वर्षं काढणारी खूप माणसं मला ठाऊक आहेत. हो, आता आठवलं. सहा वर्षांनंतरही धडधाकटपणे आणि डोकं ठिकाणावर राहिलेला एकजण होता. त्या वेळी मी तिथेच होतो. '

' थँक्स्. '

' ठीक आहे. मला वाटतं तुला आठ वर्षं मिळालीत नाही का ? '

' एस्, चीफ. '

' मध्ये एकही शिक्षा मिळाली नाही तरच एवढा काळ टिकाव धरता येईल. '

हा महत्त्वाचा मुद्दा होता. शिक्षा मिळाली नाही तरच मला जिवंतपणी बाहेर येता येईल. कारण शिक्षेचा मुख्य भर तात्पुरतं अन्न तोडणे हाच असतो. त्यानंतर पुन्हा पहिल्यासारखं जेवण मिळू लागलं तरी गमावलेली शक्ती पुन्हा प्राप्त होणं शक्यच नाही, गंभीर शिक्षा मिळाली तर विचारायलाच नको छे ! मी सिगारेट्स किंवा खोबरं स्वीकारणार नाही. चिठ्ठ्याचपाट्या सुद्धा अजीबात बंद !

राहिलेल्या सफरीत हाच निर्णय मी पक्का केला. कोणाचीही आपल्यावर मेहेरबानी नकोच मुळी. फक्त एक करावं, तेही जमलं तरच. सूप घेऊन येणाऱ्या माणसाला पैसे देऊन ज्यात मासाचे त्यातल्या त्यात मोठे तुकडे असतील असं भांडं दुपारच्या वेळी पदरात पाडून घ्यावं. ते फारसं कठीण नव्हतं. या विचारामुळं थोडी हुशारी आली. हे जर जमलं तर उपाशी राहण्याचा प्रश्नच येणार नाही. नंतरचं आपल्या हातात आहे. सारं जग विसरून जाऊन स्वप्नात दंग होणं. चांगल्या विचारात मन गुंतवून ठेवून वेड लागण्यापासून बचाव करणं. बस्स्, ठरलं !

दुपारी तीन वाजता मुक्कामाला पोचलो. दुरूनच ज्युलिएटचा पिवळा पोशाख दिसला. तिच्या शेजारीच गव्हर्नर उभा होता. तो घाईघाईनं जवळ आला. रांग लागायच्या आत त्यानं विचारलं, ' किती ? '

' आठ वर्षं ! '

परत जाऊन तो बायकोशी बोलला. ती एकदम खालीच बसली. तिला फार वाईट वाटलेलं दिसलं. माझ्याकडे तिनं दुःखी दृष्टिक्षेप टाकला. गव्हर्नरनं तिला हात धरून उठवलं आणि मागे न पाहता ते दोघं जड अंतःकरणानं दूर निघून गेले.

' पॅपिलॉन, ' देगा म्हणाला, ' किती दिवस ? '

' आठ वर्षं एकांतवास ! ' तो काहीच बोलला नाही. माझ्याकडे बघायचंही त्यानं टाळलं. गाल्गानी जवळ आल्यावर मी म्हणालो, ' मला काहीही पाठवू नका : लिहूसुद्धा नका ! एवढ्या शिक्षेमध्ये आणखी भर पडायला नको ! '

' लक्षात आलं. '

हळू आवाजात मी त्यांना म्हणालो, ' फक्त दोन्ही वेळेला शक्य तेवढं जास्तीत जास्त अन्न मिळेल अशी व्यवस्था करा. ते जर

तुम्हाला जमलं तरच एक दिवस कदाचित पुन्हा आपण भेटू शकू. गुडबाय् !'

मुद्दामच मी सेंट जोसेफकडे रवाना होणाऱ्या पहिल्या होडीत जाऊन बसलो. थडग्याकडे चाललेल्या शवपेटीकडे पाहावं त्याप्रमाणे सर्वजण माझ्याकडे बघत होते. कोणीही बोलत नव्हतं. वाटेत मी गालगानीला दिलेली सूचना चापारजवळही दिली.

'ते शक्य आहे. धीर सोडू नकोस, पपी !' तो म्हणाला, 'पण कारब्रोनेरीचं काय झालं ?'

'सांगायचं विसरलोच, मला माफ कर. अधिक चौकशीसाठी त्याच्याबाबत निर्णय तूर्त स्थगित केलेला आहे. हे चांगलं का वाईट ?'

'मला वाटतं चांगलं.'

टेकडीवरून तुरुंगाकडे जाताना मी पहिल्या ओळीत होतो. मी जलद चालत होतो. विचित्र वाटेल, पण केव्हा एकदा कोठडीत जाऊन पडेन असं झालं होतं. एक पहारेकरी म्हणाला, 'तुला एवढी कसली घाई झाली आहे, पॅपिलॉन ? एखाद्याला वाटेल तू खुशीतच आहेस !'

पोचलो !

'कपडे काढा. गव्हर्नरसाहेब येत आहेत, हुश्शार !'

'तू परत आलेला पाहून मला खूप वाईट वाटतं, पॅपिलॉन !' गव्हर्नर म्हणाला. त्यानंतर त्यानं नेहमीचंच एक भाषण ठोकलं.

'ब्लॉक ए, कोठडी १२७. ती चांगली आहे. पॅपिलॉन, तुला तिथे थोडा प्रकाश मिळेल. कारण समोरच व्हरांडा आहे. हवेचाही तुटवडा पडणार नाही. तुझी वागणूक चांगली राहील अशी मला आशा आहे. आठ वर्षं म्हणजे फारच होतात. पण कोणी सांगावं, चांगल्या वर्तणुकीमुळे एक-दोन वर्षं सूटही मिळू शकेल. तशी आशा करू या. तू शूर आहेसच !'

आणि मी १२७ क्रमांकाच्या कोठडीत आलो. संध्याकाळचे सहा वाजले होते तरीही दिसू शकत होतं. या खोलीत आधीच्यासारखा कुजल्याचा वास वगैरे येत नव्हता. माझी उमेद जरा वाढली. 'मित्रा-पपी, या चार भिंती तुला आठ वर्षं सांभाळणार आहेत. महिने आणि तास मोजून आता काही उपयोग नाही. फार तर सहा-सहा महिन्यांचा हिशेब कर ! सहा महिने सोळा वेळा झाले की तू मुक्त होशील. इथे मृत्यू दिवसा आला तर निदान प्रकाश तरी असेल, ते काय थोडं ? आजारी पडलास तर डॉक्टरला तुझा चेहेरा दिसू शकेल. आता सुटकेच्या प्रयत्नाबद्दल किंवा सेलियरच्या खुनाबद्दल स्वतःला दोष देत बसू नकोस. पुढे कसे दिवस येतील काय सांगावं ! कदाचित ते दया दाखवतील, युद्ध वा भूकंप होईल, किंवा प्रचंड वादळात हे ठिकाण तरी नष्ट होईल ? का होणार नाही ? किंवा एखादा भला माणूस एकांतवासाच्या शिक्षेविरुद्ध आपली आवाज उठवून साऱ्या फ्रान्सला हलवून सोडेल. कदाचित एखादा डॉक्टर किंवा धर्मगुरू ते काम करील. पण काहीही असलं तरी शार्क माशांनी सेलियरला केव्हाच पचवून टाकलेलं आहे. मी जर अशीच हिंमत राखली तर स्वतःच्या पायांनी बाहेर जाईन, अगदी खात्रीपूर्वक!'

एक, दोन, तीन, चार, पाच, अबाउट टर्न; एक, दोन, तीन, चार, पाच. चालायला सुरुवात झाली. लंबकासारखी हालचाल. योग्य स्थिती; डोकं किंचित झुकलेलं, हात मागे, पावलं सारखी. तूर्त सकाळी आणि दुपारी दोन दोन तास चालत राहावं. एकदा जेवण किती मिळतं याचा अंदाज घेऊन त्यात बदल करावा. आजपासूनच निष्कारण शक्ती का वाया घालवा ?

खरंच, अगदी अखेरच्या क्षणी अपयश पदरी पडलं हे आपलं दुर्दैव. तरी तो सुटकेचा पहिला भाग झाला. तराफ्यावरून नव्वद मैलांचा पहिला प्रवास तितकाच धोक्याचा होता. आणि एकदा 'मेनलॅंड'च्या किनाऱ्याला लागलं की तिसरा जीवघेणा टप्पा सुरू. पुन्हा नवी तयारी, नव्या योजना. ठरल्याप्रमाणे समुद्रात शिरलो असतो तर अंदाजे सहा मैल ताशी वेगानं बारा ते पंधरा तासांत मेनलॅंडला पोचणार होतो. म्हणजे दिवसा पाऊस पडत असता तरच. मला आठवलं की, अंधारकोठडीत टाकल्याच्या दुसऱ्या दिवशी पाऊस पडला होता. आपल्या चुका काय काय झाल्या ! तराफा भक्कम व्हावा म्हणून आम्ही आवश्यकतेपेक्षा जास्तच काळजी घेतली. चौकट काय, नारळ काय आणि काय काय, किती भाग बनवावे लागले आणि धोका वाढवून घेतला. छे !

दुसरी अधिक गंभीर चूक म्हणजे पहिल्यांदा संशय येताक्षणीच सेलियरला निष्कारण जीवदान दिलं. त्याला त्याच रात्री ठार करायला हवं होतं. तसं झालं असतं तर आज मी कुठे पोचलो असतो ? अगदी पकडलो गेलो असतो तरी तीनच वर्षं शिक्षा मिळाली असती. सगळं सुरळीतपणे पार पडलं असतं तर त्रिनिदादमध्ये बोव्हेन कुटुंबाशी बोलत असतो किंवा क्युराकाओमधील बिशपच्या आसऱ्याला पोचलो असतो. एखाद्या देशात आम्हाला आश्रय देण्याचा शब्द मिळाला असता तरच आम्ही क्युराकाओ सोडलं असतं. नाही तर छोट्या होडीतून सरळ गोआजिरा वस्तीतल्या माझ्या टोळीमध्ये

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठीं
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

सामील होणं हिताचं ठरणार होतं.

खूप उशीरापर्यंत माझे विचार चालू राहिले. आरामात पडून होतो. ही पहिली रात्र फारशी खंत करण्यात गेली नाही. प्रत्येक वेळी मी निराशेला पिटाळून लावत होतो. ' जोवर जीवन चालू आहे तोवर तुला जगण्याचा त्रिवार अधिकार आहे, अखंड आशा आहे. तुला जगलंच पाहिजे !

एक आठवडा निघून गेला. कालपासून अन्नात झालेला बदल लक्षात आला. दुपारी शिजवलेल्या मासाचा मोठा तुकडा आणि रात्री मग भरून लेन्टिल्स–त्यात पाणी अजीबात नाही. लहान मुलासारखं मी म्हणालो, ' लेन्टिलमध्ये लोह खूप असतं, प्रकृतीला ते चांगलं. '

असंच जर नियमित मिळत राहिलं तर रोज दहा ते बारा तास चालायला काहीच हरकत नाही. त्यामुळे आलेल्या थकव्यामुळे स्वप्नांच्या दुनियेत प्रवेश करणं सोपं. पण माझं मन भरकटत मात्र नव्हतं; माझे पाय जमिनीपासून सुटले नव्हते, भक्कमपणे उभे होते,

प्रत्येक कैद्याची एकएक स्वतंत्र कथा होती, त्यांचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ. मी त्या आठवू लागलो. इतरही वार्ता आणि अफवा भरपूर होत्या. इथून सुटून मी जर पुन्हा तिथे परत गेलो तर त्यातली एक मात्र स्वतः पडताळून पाहणार होतो–ती होती ' घंटानादा 'ची कहाणी.

मागेच मी सांगितलं होतं की, कैदी मेल्यावर त्याला पुरण्यात येत नसे, तर सेंट जोसेफ आणि रॉयेल यांच्यामध्ये समुद्रात फेकण्यात येई. तिथे मोठमोठ्या शार्क माशांचा सुळसुळाट होता. मेलेल्या माणसाच्या पायाला दगड बांधून पोत्यात घालण्यात यायचं. ठराविक ठिकाणी आल्यावर होडीतील सहा वल्ही थांबायची. एकजण प्रेत पाण्यात भिरकावून द्यायचा. पृष्ठभागावर ते पोचण्याचा अवकाश, शार्क मासे त्यावर तुटून पडत. प्रेत पाण्याखाली जायची कधी वेळच यायची नाही. वरच्यावरच त्याचा फन्ना उडायचा. मासे उसळी मारून शरीराचे लचके तोडतायत आणि त्यांच्यात भांडणवजा चढाओढ चालली आहे, हे दृश्य म्हणे फार ' विलोभनीय ' असतं. एकदा पाहिलंच पाहिजे.

इथपर्यंत ठीक आहे, पण एका गोष्टीविषयी मला कुतूहल आहे. सर्व कैदी असं सांगत की, कोणी एक मरण पावला की तिथल्या चर्चमध्ये वाजणाऱ्या घंटेच्या आवाजाचं शार्क माशांना अतिशय आकर्षण होतं. घंटा वाजायचा अवकाश, माशांचे थवेच्या थवे पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन उड्या मारू लागत–भक्ष्याची वाट पाहत. इतर वेळी तुम्हाला एकही शार्क दिसणार नाही. याचा अर्थच, घंटेच्या आवाजामुळे त्यांना ' वर्दी ' मिळत असणार. माझ्यावर मात्र तशी पाळी कधीही येऊ नये; समुद्रातून पळ काढताना त्यांनी फडशा पाडणंही वाईटच; पण निदान स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात तसा मृत्यू आला असं तरी म्हणता येईल. पण कुठल्या तरी रोगानं कोठडीत आपण मरता कामा नये; एवढीच अपेक्षा आहे.

मला पुरेसं अन्न मिळू लागलं होतं आणि शक्ती पहिल्यासारखीच टिकून होती. ही सारी प्रिय मित्रांचीच कृपा. सकाळी सात ते सायकाळी सहा चालण्याचा कार्यक्रम चालू होता. त्यामुळे येणारा थकवा उपयुक्त वाटत होता. खाल्लेल्या अन्नाचं नीट पचन होत होतं. गतकाळातील ठळक आठवणी आल्या की मी त्यांच्यात पुरता सामावून जात असे. आई, मावशी, बाग, शाळा, शिकवणाऱ्या बाई; साऱ्या पंधरा वर्षांतील आठवणी. फक्त कोठडीतच त्या इतक्या तीव्रपणे येणं शक्य आहे. बाहेरच्या गोंगाटात इतक्या सूक्ष्म तपशिलासह त्या समोर कदापि येणार नाहीत. प्रशांत स्तब्धता.

हळुवार आठवणीमुळं मला मिळणारं सुख हिरावून घेणं इथे कोणालाच शक्य नव्हतं. माझ्या जखमी हृदयाला मिळणारा दिलासा बहुमोल होता. लोकांच्या दृष्टीनं काय, मी अनेक कोठड्यांतल्या एकीत बंदिस्त होऊन पडलो होतो. माझ्या जगाची त्यांना काय कल्पना येणार !

पहिले सहा महिने पार पडले. सहा-सहा महिन्यांचा हिशेब करायचं मी ठरवलं होतं ना. त्यातील पहिला भाग संपला. आजच सकाळी सोळाचा आकडा पंधरावर आला. आता फक्त पंधरा सहामाही राहिल्या.

बघू या काय काय घडतं ते. सहा महिन्यांत तरी वैयक्तिक विशेष घटना काहीच घडली नाही. रोज तेच अन्न, पण पुरेसं; इतकं की माझ्या प्रकृतीवर कोणताच वाईट परिणाम झाला नव्हता. आसपास बऱ्याच आत्महत्या आणि वेड लागण्याचे प्रसंग घडले. त्यांना लगेच हलवण्यात आलं हे उपकारच. कोणाचं ओरडणं, रडणं किंवा कण्हणं ऐकलं की पोटात खड्डाच पडतो. त्यामुळे मी साबणाचे दोन बारीक तुकडे कानात खुपसून ठेवले होते. त्या विचित्र किंचाळ्या ऐकायला नकोत. साबणाचा मात्र खूपच त्रास झाला आणि माझे कान वाहू लागले; पण त्या आवाजापासून मिळणाऱ्या सुटकेचा आनंद अवर्णनीय असाच होता.

वळवळणाऱ्या गोमांमुळे मला चांगलं शिक्षण मिळत होतं. गल्या सहा महिन्यांत फक्त एकदाच मला गोम चावली. उघड्या शरीरावरून त्या शांतपणे फिरत आणि ते सहन करायला मी आता शिकलो होतो. संधी मिळाली की, मी त्या चिरडून टाकीत असे. तुम्हाला कोणत्याही गोष्टीची सवय होऊ शकते, फक्त स्वतःवर चांगला ताबा पाहिजे. नावडती गोष्ट झिडकारायला लागलात, तिचा निषेध करू लागलात की सगळं संपलं. अस्वस्थता तुमची पाठ सोडणार नाही. त्यापेक्षा ती आपण होऊन स्वीकारून नाहीशी होण्याची वाट पाहणे इष्ट. [ क्रमशः ]

---

आरोग्य चौकशी कमिटीचे सभासद माझ्यापर्यंत येऊन पोचलेही. गव्हर्नर म्हणाला, ' या माणसाला सर्वांत जास्त म्हणजे आठ वर्षांची शिक्षा मिळाली आहे. '

' तुझं नाव ? '

' शॅरियर. '

' शिक्षा पुरी किती झाली ? '

' अठरा महिने. '

' त्याची वागणूक कशी काय आहे ? '

' समाधानकारक , ' गव्हर्नर म्हणाला.

' प्रकृती ? '

' चांगली. ' डॉक्टर म्हणाला.

' तुझं काय म्हणणं आहे ? '

' एवढंच की, फ्रान्ससारख्या सुसंस्कृत देशाला ही एकांतवासाची अमानुष शिक्षा शोभत नाही. '

# सेंट जोसेफवर बंड

**पुढील अंकी**

पुस्तके

# आदर्शवाद आणि वस्तुस्थिती यांमधील अंतर

उत्तम कुदे

प्रस्तुत पुस्तकात लेखकाने साम्यवादी देशांतील मार्क्सवादाची सध्याची अवस्था व भवितव्य यांवर प्रकाश टाकला असून मार्क्सवादाचे भवितव्य अधिक उज्ज्वल कसे करता येईल, याची चर्चा केली आहे. लेखकाच्या दृष्टीने रशियन ऑक्टोबर-क्रांतीनंतर रशियात व तसेच इतर सर्व साम्यवादी राष्ट्रांत (युगोस्लाव्हियासकट) मार्क्सवादास विकृत वळण लागले असून मार्क्सवादाचा विकास कुंठित झाला आहे. कुंठित मार्क्सवाद म्हणजेच समाजवाद असे मानण्याची प्रवृत्ती लेखकाला अधिक भयानक वाटते. या प्रवृत्तीमुळे वस्तुस्थिती समजावून घेऊ पाहणाऱ्या विचारवंत मार्क्सवाद्यांची कुचंबणा होत असून त्यांपैकी काहींना स्वातंत्र्यरक्षणार्थ भांडवलशाही राष्ट्रांत आश्रय घ्यावा लागला आहे, असे लेखकाचे मत आहे. स्टॅलिनने कामगार व इतर क्रांतिकारकवर्गातील क्रांतिकारक दुर्दम्य इच्छाशक्ती दुबळी करून टाकली, असा लेखकाचा आरोप आहे. (पान ५) मार्क्सवादापासून स्फूर्ती घेतली पाहिजे; परंतु त्यातून विवेकशून्य आंधळी पोथीनिष्ठा निर्माण होता कामा नये, असा इशारा लेखकाने दिला आहे. रशियात व इतर कम्युनिस्ट राष्ट्रांत अशी पोथीनिष्ठा वाढली आहे, असे लेखकाचे स्पष्ट मत आहे. लेखकाच्या मते मार्क्सने अंशिक क्रांतीचा केव्हाच पुरस्कार केला नाही. मानवी व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास झाला पाहिजे, नसता मानवी व्यक्तिमत्त्व दुभंगले जाऊन दुबळे होईल व त्याची प्रगती कुंठित होईल.

लेखकाच्या दृष्टीने सर्वच समाजवादी राष्ट्रांत मार्क्सवादाला संधिसाधु राजकारणाचे स्वरूप येत आहे व याबाबतीत स्टॅलिनचा रशिया अग्रभागी होता व आहे असे लेखकाला वाटते. स्टॅलिनने समाजवादी लोकशाही व उमरावशाही (oligarchy) निर्माण केली असा लेखकाचा आक्षेप आहे. स्वातंत्र्य, न्याय, समता या मूल्यांशिवाय सार्वत्रिक व प्रत्यक्ष लोकशाही निर्माण होत नसते. सार्वत्रिक लोकशाही (Universal Democracy) हाच समाजवादी लोकशाहीचा खरा आधार असतो. समाजवादी लोकशाहीमध्ये कामगारांना संपाचा हक्क असला पाहिजे असे सांगून, ज्या समाजवादी राष्ट्रांत कामगारांवर संपावर जाण्याची वेळ येते ते समाजवादी राज्य कसले? असाही प्रश्न लेखकाने विचारला आहे. (पान १४४)

कार्ल कौटस्की, मॅक्स अॅडलर, रुडॉल्फ हिल्डर्फडिंग इत्यादींना मार्क्स हा नैतिक मूल्यांना महत्त्व देत नाही असे वाटते. या उलट बर्स्टेन, मॅक्सिमिलन रुबेल, कॉर्ल पॉपर वगैरेंना मार्क्स नैतिक मूल्यांना महत्त्व देतो असे वाटते. प्रस्तुत लेखकाने दोन्ही विचारांची चर्चा केली असून मार्क्सला नैतिक मूल्ये मान्य होती, असे मत व्यक्त केले आहे. नैतिकता माणसाला कृतिशून्य बनवते. (Impotence in action) हे मार्क्सचे मत लेखकाला मान्य असले तरी मार्क्सने हे उद्गार भांडवलशाही समाजातील नैतिक कल्पनांविषयी काढले आहेत असे लेखकाला वाटते.

मार्क्सचा नैतिक दृष्टिकोण क्रांतिकारक आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक परिस्थिती असेल तरच समाजाचा विकास होऊ शकेल; परंतु त्यासाठी नागवा स्वार्थ, जुलूम, मानवाचे अधःपतन करण्यासाठी संपत्तीचा वापर, अमानुष पिळवणूक, गुलामी इ. दोषांचे व विकारांचे उच्चाटन समाजातून झाले पाहिजे असे मार्क्सला वाटते. ('कॅपिटल' प्रकरण ४, ६, २३, खंड १.) भांडवलशाही समाजव्यवस्थेत सद्गुण, प्रेम, ज्ञान, न्याय, सदसद्विवेकबुद्धी इ. मूल्यांचा व्यापार केला जातो व त्यातूनच भ्रष्ट समाज निर्माण होतो. (The Poverty of Philosophy) मार्क्सचा नैतिक मूल्यांचा दृष्टिकोण लेखकाने अधिक विस्तृत स्वरूपात पुढे मांडला आहे. मानवाची आत्मभ्रंशातून मुक्तता करणे, (De-alienation), स्वातंत्र्य, सामाजिक व आर्थिक समता व न्याय, पिळवणुकीतून मुक्तता, वर्गविहीन, राज्यविहीन शोषणमुक्त समाज व समाजाचे स्वनियंत्रण (Self Control) इ. मूल्ये नैतिक मूल्ये नाहीत काय? असे लेखक विचारतो. समाजवादी समाजरचनेला पोषक अशी नैतिक मूल्ये मार्क्सने निर्माण केली आहेत. प्रत्येक माणसातील सुप्त शक्तींचा विकास व्हावा; परंतु त्यामुळे व्यक्तीची सामाजिक जाणीव हरवता कामा नये असे मार्क्सला वाटते. साध्याच्या पूर्तीसाठी जर वाईट साधनांचा (Foul Means) जर वापर करण्यात आला तर ते साध्य चांगले आहे असे मार्क्सला वाटत नाही. (पा. १७९) परंतु स्टॅलिनने मार्क्सवाद व मार्क्सवादातील नैतिक मूल्ये यांना संपूर्णपणे विकृत स्वरूप दिले तर संधिसाधु मार्क्सवाद्यांनी त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले व परिणामतः मार्क्सवादाचे अवमूल्यन केले असा लेखकाचा आरोप आहे.

आंतरराष्ट्रीयत्व, साम्यवादी राष्ट्रांची एकता या नावाखाली जगातील साम्यवादी चळवळ एका राष्ट्राच्या (रशिया) प्रभुत्वाखाली कशी येईल याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे इतर राष्ट्रांतील साम्यवादी चळवळ स्वतंत्रपणे विकसित होऊ शकली नाही. (चीनचा अपवाद?) स्वतंत्रपणे विकसित होऊ बघणाऱ्या चळवळीला स्वातंत्र्य नाकारण्यात आले. त्यामुळे मानवसमाजाची आत्मभ्रंशापासून मुक्तता करू इच्छिणारी चळवळच शेवटी आत्मभ्रंशाची शिकार बनली. एक पाय मुक्त असावा व एक पाय साखळदंडाने जखडलेला असावा अशी अवस्था साम्यवादी चळवळीची झाली. पक्षसदस्याने पक्षाची प्रामाणिकपणे व एक-

निष्ठेने सेवा करावी अशी अपेक्षा करण्यात येते; परंतु पक्षापेक्षाही क्रांतिकारक तत्त्वज्ञानावरील निष्ठा अधिक महत्त्वाची मानण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण क्रांतिकारक मार्क्सवादाला 'मुक्तमानव' (Free man) अपेक्षित आहे.

आजच्या असंस्कृत मार्क्सवादाकडून सुसंस्कृत व परिपूर्ण (Mature) मार्क्सवादाकडे कसे जाता येईल असा प्रश्न शेवटी उपस्थित करून त्याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

लेखकाच्या मते आरंभीच्या काळातील क्रांतिकारक उत्साह कायमचा टिकत नसतो. आजचा मार्क्सवाद जबरदस्तीने लादण्याच्या प्रयत्नामुळे नवे संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. उत्पादनातील घट, श्रमप्रतिष्ठेबद्दलची उदासीनता, नैतिकतेची उणीव जर हिंसेच्या सहाय्याने भरून काढण्याचा प्रयत्न केला तर एक दिवस समाज बंड करून उठल्याशिवाय राहाणार नाही. काही प्रसंगी बळाचा वापर आवश्यक असला तरी बळाचा व हिंसेचा अतिरेक होता कामा नये. बळाचा वापर करणारे व ज्याविरुद्ध बळ वापरले जाते त्या सर्वांच्या प्रवृत्ति समान असतात हे लक्षात घ्यावे. आजच्या समाजवादात व्यक्ति आपले व्यक्तित्व गमावून बसली आहे. त्यामुळे अनेक विचारवंत मार्क्सवादापासून दूर जात आहेत. कारण अपरिपूर्ण व अविकसित मार्क्सवाद जसाच्या तसा स्वीकारणे किंवा मार्क्सवादापासून संपूर्ण फारकत घेणे हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर आहेत. त्यामुळे ते निराश व निष्क्रिय होऊन भूतकालीन साधनांना सामोरे जातात. बदलत्या काळाच्या संदर्भात मार्क्सवादाची अधिक विकसित कल्पना निर्माण होण्याची गरज आहे.

समाजवादी समाजव्यवस्थेत प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे वाटप करताना अन्याय व विषमता निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. त्यासाठी व्यक्तीची उत्पादनक्षमता व तिच्या भोवतालची एकंदर परिस्थिती विचारात घेतली पाहिजे. (सध्या ती घेतली जात नाही असे लेखकाला वाटते.) समाजवादी राष्ट्रात देखील समान व्यक्तींना असमान व असमान व्यक्तींना समान वागणूक दिली जाण्याची शक्यता आहे. कार्यक्षम व अकार्यक्षम, कामचुकार व काम करणारे या सर्वांना एकाच मापाने कसे मोजता येईल असा लेखकाचा प्रश्न आहे. म्हणून लेखकाला 'गरजेप्रमाणे दाम' ऐवजी 'कामाप्रमाणे दाम' हे तत्त्व अमलात आणावेसे वाटते. व्यक्तीला काही तरी प्रलोभन (Inducement) दिले जावे असे लेखकाला वाटते, दिले जाणारे प्रलोभन (Inducement) भौतिक स्वरूपातच असावे असा लेखकाचा आग्रह आहे. व्यक्तीची उत्पादनक्षमता व गरज यांचा समन्वय साधण्यात यावा असे लेखकाला वाटते; परंतु त्यासाठी सर्वांना समान कामासाठी समान वेतन मिळण्याची समान संधी प्राप्त झाली पाहिजे. त्याबरोबरच सामाजिक व आर्थिक विकासासाठी जाणीवपूर्वक नियोजन आणि स्वनियंत्रण करू इच्छिणाऱ्या परिपूर्ण सामाजिक घटकांची नितांत आवश्यकता आहे. (पा. २१७)

प्रस्तुत पुस्तकात स्टॅलिनवर अधिक टीका करण्यात आली असून जागतिक कीर्तीच्या इतर कम्युनिस्ट नेत्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी, लेनिनने केलेल्या 'नव्या आर्थिक धोरणाच्या (N. E. P.) प्रयोगाकडेही दुर्लक्ष झाले आहे असे वाटते. परंतु साम्यवादी समाजव्यवस्थेतील दोषांचे, संकुचित दृष्टीचे यथार्थ दर्शन लेखकाने घडविले आहे. स्वतःस मार्क्सवादी म्हणविणाऱ्या विचारवंतांनी अवश्य वाचावे असेच हे पुस्तक आहे हे मान्य करावे लागेल.

---

'Between Ideals and Reality.'–लेखक–Svetozar stosanroisc-भाषांतरित –Gersons. sher, Oxford University Press, Londen, 1973. ¤

## 'कैदी नं. ३१४६७'

वि. भा. देशपांडे

रत्नागिरी जिल्ह्यातील राई गावचे नारायण महाडीक. एक साधा सरळ माणूस. सुरुवातीला साधे सरळ आयुष्य. शिकारीची आवड असलेला, गणपतीच्या मूर्ती करणारा, नाटकाचे पडदे रंगवणारा, नाटकात उत्तम कामे करणारा. अशा गुणी कलावंत माणसाच्या




आयुष्यात तीन स्त्रिया आल्या. त्यातल्या दोघींशी लग्ने लावली. तिसरीशी निर्व्याज प्रेम केले. सामान्य जीवन जगता जगता एक दिवस खुनाचा आळ आला. प्रत्यक्ष खून दुसऱ्याने केला. त्याच्या बरोबर असल्यामुळे शिक्षा भोगावी लागली–जन्मठेपेची ! पुणे, बेळगाव, अहमदाबाद इत्यादी तुरुंगांचा सहवास घडला. तुरुंगातल्या नरकवासाचे अनुभव घेत असतानाच कलावंताचे मन आणि हात स्वस्थ बसू देईनात. तिथेही नानाविध कारागिरीची कामे मिळू लागली. कैदी जीवनाला एक वेगळा पैलू मिळाला. कैदी असूनही माणूस म्हणून जगता आले. चांगल्या वर्तणुकीमुळे शिक्षा सौम्य तर झालीच पण शिक्षेची वर्षेही कमी झाली. अशातच १९४८ साली गांधीवधाच्या आरोपावरून संशयित म्हणून सावरकरांना तुरुंगवास लाभला. सावरकरांची देखभाल आणि सेवा करण्याचे भाग्य महाडिकांना मिळाले. आता तुरुंगाधिकाऱ्यांनी एक सरकारी नोकरी दिली आहे. त्या नोकरीच्या आधाराने आणि स्वतंत्रपणाने अनेकांना जीवनाधार निर्माण करण्याचे कार्य ते करतात. तुरुंगातून सुटून आलेला माणूस पुन्हा समाजात आर्थिक–लौकिकदृष्ट्या प्रतिष्ठित कसा होईल यासाठी उरलेले आयुष्य खर्ची घालण्याचा त्यांचा मानस आहे. अशा या एके काळी कैदी असलेल्या नारायण महाडिकांची ही आत्मकथा.

या आत्मकथेचे स्थूल मानाने तीन भाग पडतात. पहिला म्हणजे शिक्षापूर्व असलेले सर्वसामान्य जीवन. दोन–शिक्षा झाल्यावर तुरुंगातील जीवन आणि तिसरा–शिक्षा भोगून झाल्यावर लोकोपयोगी झालेले जीवन. या तीनही स्तरांवरील जीवनात दर्शनी साधेपण–एकेरीपण असले तरी त्याचा पापुद्रा हळुवार उघडून पाहिला तर विलक्षण पातळीवरचे आगळेपण आहे असे जाणवते. पोहणे, शिकार करणे, मूर्ती घडवणे, नाटके करणे इत्यादींमध्ये मुक्तपणे वावरणारे मन गुन्हेगारीपासून अलग होते. मित्रांच्या साथीने एका खुनाचे किटाळ आले. नको ते जिणे भोगणे नशिबी आले. पण आपल्याला विनाकारण शिक्षा भोगावी लागते आहे तर आपण आता अट्टल गुन्हेगारच होऊ या, अशा विचाराने आयुष्याचा सूड घेतलेला नाही. शिक्षेच्या अनुभवातून माणूसपणाचे दर्शन घडत गेले. मनही तसेच तयार होत गेले. सूडाची जागा आत्मोन्नतीने घेतली. हा बदल लक्षवेधी आहे.

ही आत्मकथा सरळपणाने निवेदित केली आहे. साधे, सरळ निवेदन आणि प्रामाणिक आत्मकथन ही या आत्मकथेची सर्वांत महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. आत्मकथन करताना जीवनभाष्याचा मोह महाडिकांनी टाळला आहे. क्वचित काही ठिकाणी निवेदन भाबडेपणाच्या जवळ जाते; पण अशा जागा अपवादात्मकच आहेत. कलात्मक आत्मकथनाला लेखकाजवळ एकाच वेळी जी जीवनविषयक तदारूपता आणि तटस्थता अभिप्रेत असते ती या आत्मकथेत निश्चितच आहे. किंबहुना त्याचमुळे या आत्मकथेचे कलामोल दुणावले आहे. परिणामी ही आत्मकथा केवळ वाचनीयतेच्या पातळीवर न राहता तिच्यामध्ये अंतर्मुख करण्याचे सामर्थ्यही आहे, याचाही आपल्याला प्रत्यय येतो.

अशी ही आत्मकथा 'माणूस'च्या १९७३ च्या दिवाळी अंकात ज्योत्स्ना देवधर यांनी आपल्याला परिचित करून दिल्याचे काहींच्या स्मरणात असेलच. पुस्तकरूपाने ती आता आपल्यासमोर आलेली आहे. नाटककाराला किंवा चित्रपटनिर्मात्याला आवाहन आणि आव्हान देणारी आहे. कारण ती वाचत असताना एका जिवंत मनाचा–माणसाचा चित्रपटच आपल्या नजरेसमोरून हलत जातो. आत्मकथन करणारी व्यक्ती अद्यापही हयात असल्याची याद येते. त्या व्यक्तीचे मन आणि हात अजूनही जिवंतपणाने, तेजदारपणाने कार्य करीत असल्याचे आपल्याला समजते. इतकेच नव्हे तर आता ही व्यक्ती ज्या प्रकारचे समाजकार्य करते आहे ते पाहण्याची उत्कंठा लागते, यातच या पुस्तकाचे सामर्थ्य सामावलेले आहे.

अशा प्रकारच्या आत्मकथांची मराठी साहित्यातील उणीव सतत जाणवणारी आहे. सामान्यतः प्रसिद्धीच्या किंवा प्रकाशाच्या झोतात असणाऱ्या व्यक्तींच्या जीवनाला साहित्यरूप लाभते. कोणी तरी त्यांच्या अनुभवांचे शब्दांकन करते; पण जी व्यक्ती लौकिक अर्थाने प्रसिद्ध नाही तिच्याही जीवनात काही अनुभव ऐकण्यासारखे आहेत, शब्दांकित करण्यासारखे आहेत याचे भान फारच थोड्या साहित्यकारांना असते. एका अर्थाने हंसा वाडकरांची 'सांगत्ये ऐका !' ही आत्मकथा जितकी महत्त्वाची तितकीच नारायण महाडिकांची आत्मकथा महत्त्वाची. आता ललिता पवारांचेही आत्मकथन प्रसिद्ध होणार असल्याचे कळते. अशा काही आत्मकथा मराठी साहित्याची उंची वाढवतात, कक्षा रुंदावतात, त्यापैकीच 'कैदी नंबर ३१४६७' ही एक आत्मकथा ! ◻

'कैदी नं. ३१४६७'
नारायण महाडीक
पॉप्युलर प्रकाशन.
मूल्य दहा रुपये.

◻




# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३१-५-७५ ते ६-६-७५

**इंदिरा गांधींच्या चाणक्यनीतीचा प्रभाव**

हा आठवडा गर्वीगुजरातच्या निवडणूक-वातावरणाने भरून जाणार आहे. प्रत्यक्ष निवडणुका जरी ८ जूनला असल्या तरी शहकाटशह, चाणक्यनीती, राजकारणाचा खेळ हे सारे याच आठवड्यात घडणार आहे. या घडणीत आणि या खेळीत अग्रपूजेचा मान पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्याकडे येणे अगदी अपरिहार्य आहे. गुजरातमध्ये निर्णायक कौल कुणाला मिळेल, याचा पंचनामा नंतर होईल; पण इतिहास मात्र या वेळी घडेल. या आठवड्याचे स्वामित्व रवी, शनी व गुरू-मंगळ यांचे आहे आणि हे सारे ग्रह इंदिराजींना या वेळी तरी अनुकूल आहेत. त्यांची भाषणे, आश्वासने प्रभाव निर्माण करतील यात शंकाच नाही. क्षणभर लोक (गुजरातचे) भारावून जातील. मात्र ज्याला 'सॉलिड' असे बहुमत म्हणतात ते शंकास्पद वाटते. इंदिराजींनंतर प्रभाव राहील तो चिमणभाईंच्या किसानपक्षाचा व त्यातही त्यांचा स्वतःचा. जनता आघाडी व मोरारजी देसाई यांचा अपेक्षाभंग झाला नाही तरच नवल. या निवडणुकीने देखील गुजरातपुढचे प्रश्नचिन्ह संपणे कठीणच वाटते. महाराष्ट्र मंत्रिमंडळात मतभेद होण्याची शक्यता आहे. गृहनिर्माणमंत्री बॅ. अंतुले यांच्याकडे महत्त्वाची कामगिरी येईल.

---

**मेष : धनःस्थितीत सुधारणा**

या आठवड्याची सुरुवात वृषभ लग्नावर होत असून रवी दुसरा तर चंद्र अकरावा असे ग्रहमान आहे. मंगळ मात्र व्ययस्थानी आहे. मंगळ तुमचा राशिस्वामी असल्यामुळे तो तुम्हाला खड्ड्यात पडू देणार नाही. याउलट हे ग्रहमान तुमची आर्थिक बाजू भक्कम व्हायला अत्यंत अनुकूल आहे. तुमच्यापैकी कुणी दलाल, वायदेबाजारवाला, शेअर्सवाला असेल तर त्याच्या परागतीच्या परिस्थितीला एकदम जीवदान मिळणार आहे. व्यापारी असाल अगर जमिनीच्या खरेदीविक्रीत पैसा गुंतून पडला असेल तर त्याची वसुली या आठवड्यात होईल. सोमवार, मंगळवार व गुरुवार लॉटरीत फायदा होण्याची शक्यता आहे. नोकरी-व्यवसायाची परिस्थिती समाधानकारक राहील. तब्येतीतही सुधारणा होईल. शारीरिक थकवा, डोळ्यांची जळजळ कमी होईल. संसारातील अडचणींवर सहज मात करू शकाल. महिलांनी चार पैसे शिल्लक टाकावेत, अशी परिस्थिती सुधारेल. शुभराशी ५-७-११:

**वृषभ : उत्कर्षाची सुरुवात**

हा आठवडा आपणास उत्कर्षाचा आणि आनंदाचा ठरणार आहे. रवीसारखा ग्रहांचा सम्राट चंद्राच्या सहवासात आहे व मंगळासारखा सेनापती अकरावा आहे. आता तुम्हाला काय कमी आहे? हाती मृत्तिकाकण घेतले तरी त्यांचे सुवर्णकण होतील. तुम्ही बरेच दिवस जागेच्या शोधात आहात, तुम्हाला बंगला वा फ्लॅट घेण्याची इच्छा आहे, ती या वेळी पुरी होईल. व्यवसायाच्या क्षेत्रातील तुमची स्वप्ने पुरी होण्याचा योग या वेळी आहे. व्यापारातील तुमचे सारे आडाखे व अंदाज या वेळी अचूक ठरतील. नोकरीच्या दृष्टीने हा काळ फार छान आहे. कामात बदल करावयाचा असेल तर तो या वेळी करा. कोणत्याही क्षेत्रातील बेकार असो, त्याला नोकरीपेक्षा स्वतःचा धंदा काढावयाला अनुकूलता आहे. तरुण-तरुणींनी प्रेमात सावधगिरी बाळगावी. महिलांना माहेरहून व पतिराजांकडून सौंदर्यप्रसाधने, दागदागिने मिळतील. शुभराशी ६-८-९.

**मिथुन : नव्या पर्वाची सुरुवात**

बौद्धिक सामर्थ्याला उत्तेजन मिळणारा असा हा आठवडा तुमच्या जीवनात नव्या पर्वाची सुरुवात करून देणारा आहे. अपेक्षाभंग, अपयश, त्रास इत्यादी प्रकारांनी तुम्ही हृतबल झाला होता; पण ही हतबलता आता इतिहासजमा झाली आहे. कामधंदा मिळवण्यासाठी तुमच्यापैकी अनेकांनी भारी वणवण केली असेल; पण त्याचे फळ आता तुमच्या पदरात पडणार आहे. कथा, कादंबरी, नाटक, काव्य असे काही साहित्य तुमच्या हातून लिहून होऊ शकेल. कीर्ती व पैसा मिळून तुमचे नाव गाजत राहील. शनीचे सामर्थ्य तुमच्या ठायी निर्माण होणार आहे. सोमवार व शुक्रवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरावेत. तुमची वरिष्ठ जागेवर बदली होईल किंवा तुम्ही मालक बनाल. आर्थिक परिस्थितीत चढउतार राहतील. महिलांनी आपल्या खर्चिक वृत्तीला आळा घालावा. शुभराशी ९-१०-१२.

**कर्क : समाधान देणारी घटना**

गुरू-मंगळांनी तुमचे भाग्य भरभराटीने रेखायचे ठरवले आहे. या वेळी तुम्ही नसते विचार डोक्यात घेऊन बसू नका. मन पाण्यासारखे निर्मळ ठेवा व समोर येणाऱ्या संधीचा भरपूर उपयोग करून घ्या. या वेळची ग्रह-परिस्थिती इतकी आशादायक आहे की, गेल्या कित्येक वर्षांत असे काही घडले नव्हते. लवकरच शनी-गुरूचा त्रिकोणयोग होणार आहे. त्या वेळेपासून तुमच्या साऱ्या अडचणी पार नाहीशा होतील. नोकरीच्या क्षेत्रात अशी एखादी घटना घडेल की त्यामुळे तुमच्या व्यावसायिक जीवनाला एकदम कलाटणी मिळेल. पगारवाढ, अधिकारवाढ, कामात बदल असे काहीतरी घडेल. औषधी कारखाने, खते, रासायनिक औषधे, इंजिनीअरिंग उद्योग यांतील अधिकाऱ्यांना प्रमोशनवर वरची जागा मिळेल. घरात सुख आणि शांती नांदेल. मुलांचे सुख मिळेल. सोमवारी उपासकांना साक्षात्काराचा प्रत्यय येईल. महिलांना हौसेसारखे कपडे व दागदागिने मिळतील. शुभराशी २-८-९.

**सिंह : स्थावराचा प्रश्न सुटेल.**

तुम्हाला साडेसाती सुरू व्हायला आता फार थोडे दिवस राहिले आहेत. साडेसातीचा तुम्हाला काही लगेच धक्का बसेल असे नव्हे. पण ज्योतिष हे मार्गदर्शक असल्यामुळे तुम्ही तुमच्या अनेक कल्पना व योजना याच आठवड्यात कार्यान्वित करा. तुम्हाला पत्नीच्या माहेरची स्थावर मिळकत मिळावयाची असेल वा तुमच्या पत्नीला सासरची स्थावर मिळकत मिळायची असेल तर या वेळी ती विशेष त्रासाशिवाय तुमच्या पदरात पडणार आहे.

तुम्ही जर रेस खेळणारे असाल तर तुम्ही या वेळी खरे श्रीमंत होणार आहात. महाशय, लॉटरीचे तिकीट तर अवश्य काढा. नोकरीची परिस्थिती या वेळी साधारण समाधानाची राहील. वरिष्ठ दूर फिरतीवर जातील किंवा रजेवर जातील, त्यामुळे मोकळेपणाने तुम्हाला काम करता येईल. बेकारांना त्यांच्या मनासारखी जरी नोकरी मिळाली नाही तरी अनुभव घेण्यासाठी त्यांना तात्पुरती नोकरी मिळेल. स्वतंत्र उद्योग पुढे ढकला. विवाहाचा बेत तडीस जाईल.

### कन्या : अनुकूल-प्रतिकूल धक्के

सातव्या गुरूची कारकीर्द सुरू झाली तेव्हापासूनच खरे म्हणजे सात्त्विक वातावरणाची सावली तुमच्या जीवनावर व संसारावर पडायला सुरुवात झालीच आहे.

---


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**


---

पण मंगळाची उग्र छाया सध्या तुम्हाला सतावीत आहे. संयमाने वागलात तर हेही दिवस तुम्ही निभावून नेऊ शकाल यात मला तरी शंका वाटत नाही. वडचाचे तेल वांग्यावर या न्यायाने तुम्ही पत्नीवर अगर मुलांवर राग काढण्यात काहीच अर्थ नाही. त्यामुळे घरातील वातावरण बिघडविण्यापेक्षा तुम्ही दुसरे काहीच मिळवू शकणार नाही. एवढी प्रतिकूलता सोडली तर सर्वसामान्यतः हा आठवडा अनुकूल जाईल. नोकरी, लेखनव्यवसायात वाङ्‌मयीन वृत्तीला प्रोत्साहन मिळणाऱ्या घटना घडू शकतील. तुम्हाला एखादी चांगली संधीही मिळू शकेल. नोकरीत प्रत्यक्ष पदरात तसे काही पडले नाही तरी सहानुभूतीने विचारविनिमय होईल. बदली, कामात बदल असे काही तरी होईल. गेले काही दिवस दुय्यम व्यवसायात तुम्हाला बरीच खोट बसत आहे ती अवस्था थांबून प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. तुमच्यापैकी कुणी विवाहाचे असले तर या वेळी विचार होईल. रविवार व गुरुवार कामाचा ताण. महिलांना संसारात प्रसन्न वातावरणाचा लाभ होईल. शुभराशी ४-८-१२.

### तूळ : उद्योगधंद्यात सुधारणा

आजवर तुम्ही मनात भाजलेले मांडे पूर्णतेची फळे घेऊन या आठवड्यात प्रकट होणार आहेत. माघार, अपयश, अपेक्षाभंग असे अवर्णनीय शब्द यापुढे तुमच्या जीवनात कधी येणार नाहीत. व्यावसायिक व नोकरीविषयक नवे युगच आता सुरू होणार आहे. रविवार ते बुधवार हे दिवस पारमार्थिक सफलतेचा आहे. तुमची उपासना फळास येऊन आत्मसमाधानाचा प्रत्यय तुम्हाला येणार आहे. तुमचे सामर्थ्य वाढणार असून तुमच्या व्यक्तिमत्त्वाला आगळी-वेगळी झिलई चढणार आहे. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान अचानक ठेवले जाईल. प्रामुख्याने पाण्यावरचा प्रवास घडू शकेल. शेतीच्या जमिनीत बराच मोठा फायदा तुमच्या पदरात पडणार आहे. गायक, वादक, नट अशा लोकांना पैसा व प्रसिद्धी मिळेल. कापड व्यापार, सौंदर्यप्रसाधनाचा उद्योग व त्या उद्योगात काम करणारे नोकर यांना चांगले दिवस आहेत. नोकरीच्या दृष्टीने फार महत्त्वाचे बदल घडतील असे नाही. चालू कामात थोडेफार बदल होतील. ताण मात्र कमी होणार नाही. या वेळी विरोधकांना मात्र तुम्ही चूपचाप करू शकाल. महिलांनी उष्णता व थंडी, पाण्यापासून जपावयास हवे आहे. नोकरीत शुभवर्तमान शुभराशी ४-५-१०.

### वृश्चिक : नोकरीत वरचष्मा

यावेळी तुम्हाला अनेक ग्रहांचे मोठे पाठबळ लाभले आहे. अनेक दिवसांनी असा छान योग जमून आला आहे की, तुम्ही म्हणाल ती पूर्व व तुम्ही बांधाल ते तोरण असे भाग्य तुमच्या वाट्याला आले आहे. तुम्ही मनात रंगवलेली व गुंफलेली स्वप्ने साकार करणारी प्रसादचिन्हे दिसू लागणार आहेत. आजवर उराशी बाळगलेल्या आशा-आकांक्षा फलद्रूप होण्याचा आनंद तुम्ही उपभोगू शकाल. स्थावराच्या किंवा शेती-उद्योगात रेंगाळत राहिलेली कामे वेग घेऊ लागतील. तुमच्या सासरवाडीकडून तुम्हाला काही तरी 'बक्षीस' मिळणार आहे. शक्यतो या आठवड्यात वादविवाद, कोर्टकचेरी करीत बसू नका. वाद समजुतीने, समझोत्याने मिटवण्यात फायदा होईल. व्यापार हा तुमचा धर्म नाही. त्यामुळे व्यापाऱ्यांनी कोणतेच धाडस करू नये. शनिवार, सोमवार व गुरुवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. चालू कामात महत्त्वाची जबाबदारी तुम्हाला पत्करावी लागणार असून तुमचा दर्जा वाढणार आहे. महिलांना माहेरपणाचे सुख लाभेल. लघुउद्योगात लाभ. शुभराशी–३-५-६.

### धनू : प्रयत्नाचे फळ मिळेल

राहू-मंगळाचा त्रिकोणयोग सुखस्थानातून व व्ययस्थानातून होत आहे, ही काही अनुकूल घटना निश्चितच नव्हे. तुमच्याविरुद्ध कोणतेही डावपेच यशस्वी होण्याची शक्यता नाही, तरी पण अशा प्रकारच्या विरोधकांकडून तुम्हाला या ना त्या प्रकारे त्रास होण्याची शक्यता आहे. मात्र प्रत्यक्षात तुमचे कोणतेच नुकसान होणार नाही. राहत्या जागेच्या बाबतीत अकस्मात एखादी अडचण निर्माण होऊ शकेल. भाडे वा इतर कारणासाठी त्रास असे काही तरी होईल. पण तुम्ही त्यावर मात करू शकाल. सध्या

मंगळ तुमची कसोटी पाहणार असल्यामुळे नवी जागा पाहणे वा ही बदलणे असे काही करू नका. वाद न वाढवता जे जे काही साधता येईल ते साधा. शेतजमिनीच्या बाबतीत सरकारी कामात ताणून न धरणे हिताचे ठरावे. स्त्रियांना अगर मुलांना वारसाहक्काने काही प्रॉपर्टी मिळण्याचा योग आहे. यावेळी शनिवार, सोमवार व मंगळवार मनात नको ते विचार येतील. मन भडकल्यासारखे वाटेल. ताबा ठेवा. नोकरीच्या क्षेत्रात निराशा वाटणारी परिस्थिती आता विरघळून जाऊ शकेल. आजवर चिकाटीने जे काम केले त्याचे फळ यावेळी पदरात पडेल. नवी नोकरी लांबणीवर पडेल. महिलांनी स्वतःचे काम की स्वत: इतकेच लक्षात ठेवावे. उचापती करू नयेत. शुभराशी ६–७–१२.

**मकर :** औद्योगिक विस्तार

तिसरा मंगळ आणि पाचवा रवी, शिवाय तिसरा गुरू ही इतकी उत्तम ग्रहस्थिती आहे की, खरे तर सध्या तुमच्याइतका भाग्यवान तुम्हीच आहात. तुम्हाला जर राजकारणाची हौस असेल वा तुम्ही जर प्रत्यक्ष राजकारणात भाग घेत असाल तर या वेळी लोकांवर तुमचा जबरदस्त प्रभाव पडणार आहे. काहींच्या बाबतीत तर लोक त्यांच्या भजनी लागतील. तुम्ही जर निवणुकीत भाग घेतला असेल तर यश तुमच्या पदरात पडणार आहे. विद्यार्थी, नोकरीविषयक परीक्षा दिलेले नोकर, पितृपदाची आस बाळगणारे लोक या आठवड्यात यशाचे मानकरी ठरतील. पुष्कळ वर्षांनी हा योग तुमच्या वाट्याला आला आहे. विरोधकांना तुम्ही सहज पाणी पाजू शकाल. तुम्ही जर लहान प्रमाणात एखादा उद्योग सुरू करणार असाल तर त्याला अनुकूलता आहे. इंजिनीयर, प्रोफेसर, संशोधक, संख्याशास्त्रज्ञ अशा लोकांना नोकरीत वरचे स्थान मिळणार असून त्यांच्या गुणाचे चीज होणार आहे. चालू नोकरीत प्रमोशनवर बदलीची शक्यता आहे. विवाहेच्छू तरुणतरुणींचे विवाह थोड्याबहुत अडचणीने होतील. खर्च मात्र मात्र फार होणार आहे. घरात पाहुणे येतील. पाहुण्यांच्या बरोबर जवळपासचा प्रवासही होईल. सोमवार, मंगळवार व शुक्रवार कोणतेही काम यशस्वी होईल. महिलांना या आठवड्यात सहलीच्या निमित्ताने प्रवास घडणार आहे. शुभराशी ४–५–१०.

**कुंभ :** परिश्रमाने यश

तुमच्या बाबतीत राजकीय क्षितिजावर जरी शुकशुकाट असला तरी ती उपेक्षा समजू नका. तुमच्या अपेक्षांवर परिश्रमाची जोड द्या व योग्य त्या ठिकाणी शब्द टाका. एक गोष्ट तुम्ही पक्की ध्यानी ठेवा, ती ही की, तुमच्या सध्याच्या प्रतिष्ठेत व दर्जात कोणताही उणेपणा येणार नाही. तुम्ही इंजिनीयर किंवा इंजिनीयरिंग उद्योगाचे कॉन्ट्रॅक्टर असाल तर तुम्हाला समाधान देणाऱ्या घटना या आठवड्यात घडणार आहेत. अनेक प्रकारचे लाभ पदरात पडणार आहेत. सरकारी नोकरीपेक्षा खाजगी नोकरीत बेकारांनी प्रयत्न करावेत. नोकरी चांगली मिळेल. या राशीच्या सरकारी नोकरांना कोणताही त्रास होणार नाही. तुमच्यापैकी कुणी नोकरीत निवृत्तीपर्यंत आला असेल तर त्याला मुदतवाढ मिळणार आहे. मंगळवार, बुधवार व शुक्रवार औद्योगिक शुभारंभाला उत्तम आहेत. पैसा व तंत्रज्ञाची मदत मिळू शकेल. या आठवड्यात तब्बेतीला आराम मिळेल. महिलांना स्वतःचा असा एखादा धंदा सुरू करता येईल. शुभराशी ६–८–९.

**मीन :** अनेक कामांना वेग

गुरू-मंगळाचे सामर्थ्यवान अद्वितीय कवच तुमच्याभोवती आहे. ही ग्रहस्थिती माणसाकडून असामान्य, अलौकिक असे कार्य घडवते. शिवाय गुरू हा तर तुमचा स्वामी आहे. त्यामुळे तुमच्या कर्तृत्वाचा प्रकाश चारी दिशांना दरवळला तर आश्चर्य नाही. तुम्ही जर उपासक व चिंतनशील असाल तर तुम्हाला सद्‌गुरूचे दर्शन घडेल, आत्मसाक्षात्कार होईल. मंगळवार व गुरुवार या दिवशी खास अशी उपासना करा. हा आठवडा तुमच्या अनेक क्षेत्रांतील कामांना वेग आणणारा आहे. तुमचे वाङ्मय जर प्रसिद्ध व्हायचे अनेक दिवस पडून राहिले असेल तर ते या आठवड्यात प्रसिद्ध होईल. लेखक, प्रकाशक, पुस्तक-विक्रेते, नियतकालिकांचे एजन्ट यांना संतुष्ट करणारा हा आठवडा आहे. सरकारी नोकरीत असणाऱ्या भाग्यवंतांना एखादी महत्त्वाची ऑफर येईल. सर्वसामान्य दृष्ट्या आर्थिक बाजू भक्कम राहील. बेकारांना काम मिळेल. तब्येत खणखणीत राहील. महिलांच्या कर्तृत्वाला नोकरीत महत्त्व मिळेल. हपिसरीण होण्याची संधी आहे. शुभराशी ४·६·८.

☐ ☐


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

## यशवन्त दत्त उवाच

मुलखाचा वडबडचा !
' चांगला नट ' याशिवाय एका शब्दात यशवन्त दत्तचं कुणी वर्णन करायला सांगितल्यास याहून अधिक काही बोलता येईलसं वाटत नाही. बरं, स्वत:बद्दल ही माहिती दस्तुरखुद्द यशवन्त दत्तच पहिल्या क्षणात सांगून मोकळे होतात.
' करावं तसं भरावं 'नं या तरुण नायकाला उत्तम संधी दिली आहे. प्रथमपासून अखेर-पर्यन्त नायकाभोवती फिरणारं कथानक, ही हल्ली मराठी नटांच्या वाटयाला दुर्मिळपणे येणारी चीज झाली आहे. यशवन्त दत्तला त्याच्या वाटचालीच्या पहिल्या टप्प्यावरच ही दुर्मिळ संधी गवसली आहे. त्याच्या जवळ हीरोचा चेहरा नाही, हे तर तो स्वत:च कबूल करतो. पण आवाजाचा आणि चेहेऱ्याचा चांगला उपयोग करून घेण्याची हातोटी त्याला साधली आहे. ' काउन्ट ऑफ माँटो क्रिस्टे ' ही अलेक्झांडर ड्युमाची जगद्विख्यात कथा-स्फूर्तिस्थान असलेल्या, आणि लेखक श्री. यशवन्त रांजणकर यांनी कळवळून सांगितल्याप्रमाणे, ' जीवनमृत्यू ' या गाजलेल्या हिंदी सिनेमाशी सुताचासुद्धा संबंध नसलेल्या ' करावं तसं भरावं 'च्या पूर्वार्धानं यशवन्त दत्तला नैसर्गिक अभिनयाला आणि उत्तरार्धानं स्टायलाइझ्ड अभिनयाला वाव दिला आहे,
सिनेमा पाहिला आणि वाटलं, ह्या नटाची जरूर विचारपूस करायला हवी. मुलाखती-साठी वेळ मागून घेतली आणि...' करावं तसं भरावं ' पासून विजया मेहता आणि दिलीपकुमारपर्यन्त यशवन्त दत्तची रसवंती अशी वाहू लागली की विचारू नका. एक खरं : गृहस्थ अस्खलित बोलतो, इंटरेस्टिंग गप्पा मारतो. मुलाखतीच्या नीटस स्वरूपात त्याच्या साभिनय गप्पांचा गोषवारा देणं कठीण आहे. त्यापेक्षा त्याची काही मतं म्हणा, निरीक्षणं म्हणा की प्रतिक्रिया म्हणा, त्याच्याच शब्दांत सांगायचा प्रयत्न करणार आहे.
...विजया मेहतांना मी माझ्या गुरुस्थानां-पैकी एक मानतो. एखादी व्यक्तिरेखा समजावून द्यायची त्यांची हातोटी काही औरच आहे ! त्यांना तुमच्याकडून जे अपेक्षित असतं ते त्या नेमकं काढून घेतात. पण आपण हे करवून घेतोय असं न भासवता ! त्यांच्या नाटकात एखाद्याची भूमिका कमी पडली तर तो दोष खुशाल नटाचा समजावा.
' माता द्रौपदी'तली विजयाबाईंची द्रौपदी पारशी द्रौपदी वाटली; भारतीय वाटली' नाही, हा आरोप मीही ऐकला आहे. त्यांच्या बाकीच्या भूमिकांच्या मानानं द्रौपदी कमी वाटते खरी. पण त्यांच्याइतक्या ताकदीनं ही भूमिका करू शकणारी दुसरी नटी मला तरी ठाऊक नाही. कबूल, त्यांचे शब्दोच्चार इंग्रजी वाटतात. त्यांच्या जिभेला प्रथम-पासून जडलेल्या आंग्ल वळणाचा परिणाम आहे तो. (इथे यशवन्त दत्त, विजयाबाईंचा ' बोल द्रौपदी, बोल ! तुझ्या-माझ्यात फरक काय ' हा संवाद त्यांच्या शैलीत फर्मास उभा करतात.) ते काही असो, बाईंचं नुसतं फूटवर्क ऐतिहासिक आणि पौराणिक नाटयातला फरक एका क्षणात स्पष्ट करून जातं.
□ बाईंचं नाटयशिबिर मी ' अटेण्ड ' केलं, तेव्हा अभिनय कसा करावा यापेक्षा तो कसा करू नये याची जाण मला आली. माझ्या मते ही समज फार फार महत्त्वाची आहे. आपण अभिनय कशाला समजत होतो, आणि वास्तविक अभिनय कशाला मानलं पाहिजे याचं भान मला त्या शिबिरानं दिलं. पूर्वी ज्या प्रसंगांना आणि संवादांना टाळ्या मिळवण्यात धन्यता मानली, ते किती चुकीचं होतं ते शिबिरात शिक्षण घेताना उमजलं. हे उमजतं तेव्हा तुम्ही अभिनयकलेतलं बरंच काही आत्मसात केलेलं असतं.

□ नट या भूमिकेतून अनुभव घेता, लोकांना हसवणं हे त्यांना रडवण्याहून अवघड आहे.

□ सिनेमा-नाटकाच्या धंद्यात निवृत्ती हा प्रकारच संभवत नाही. इथे एकच गोष्ट निश्चित असते. निर्वतणं !

□ सिनेमाच्या प्रीमियरच्या संध्याकाळी तुमच्याभोवती जमणाऱ्या गर्दीची नशा ही वेल्डिंगसारखी असते. वेल्डिंग होत असताना क्षणभर डोळ्यांपुढे काही दिसत नाही. स्टार-डमची नशादेखील अशीच क्षणिक असते.

□ नट ' मोनोटोनस ' वाटतात, कारण दिग्दर्शक कमी ताकदीचे असतात.

□ नाटकात अभिनयाचा जिवंत अनुभव घेता येतो. सिनेमात सेटवर काम करणं आणि स्वत: मोटार चालवताना आजूबाजूच्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेणं यात फारसा फरक नाही.

□ अभिनय कधीच उत्स्फूर्त नसतो. त्याची नसन् नस आखलेली, बेतलेली असते. तो उत्स्फूर्त वाटेल असा परिणाम साधणं हे नटाचं यश.

□ सिनेमात काम करायचं म्हणजे सिनेमाच्या सर्वांगांचं ज्ञान नटाला हवं. सिनेमाच्या टेक्निकशी जुळवून घेत अभिनय करणे ही सामान्य कला नव्हे. दिलीपकुमारनं त्या कलेवर प्रभुत्व मिळवलं आहे. ' सगिना '

मधला पहिलाच शॉट पाहा. सगिना बेशुद्धावस्थेत आहे, इथे टायटल्स सुंदर होतात. टायटल्स संपेपर्यंत सगिना शुद्धीवर आलेला आहे. पण वस्तुस्थितीचं त्याचं भान अंधुक आहे हे त्याच्या नजरेत जाणवतं. ते भान पूर्णपणं येतं आणि दिलीप अर्थपूर्ण हसतो. इथेच शॉट संपतो. हा शॉट टिपताना कॅमेरा लेन्स प्रथम ' आउट फोकस ' होऊन मग ' इन फोकस ' होते. या तंत्राशी जुळवून घेत दिलीपनं आपल्या हालचालींचं टायमिंग जुळवून घेत काय अफलातून शॉट दिला आहे ! प्रत्येक नव्या नटाकरता हा शॉट अभ्यासाचा पाठ ठरेल. ' सगिना ' कोसळला असेल; दिलीपकुमारचा अभिनय बुलंदच होता... ◻

# अमानुष-शक्ती सामन्ता

## वेगळेपणाचा आभास

कलकत्त्यात तब्बल ८३ आठवड्यांचा मुक्काम...मुंबईमधील उत्तम प्रतिसाद... ऐकीव वाचीव वार्तांवरून ' अमानुष ' विषयी फार अपेक्षा होत्या. प्रत्यक्षात पाहिल्यावर.... तोच तो देवदास प्रकृतीचा नायक, चोरीच्या खोट्या आरोपानंतर त्याचा दारुण प्रेमभंग, मग त्याचं बेसुमार मद्यपान, गुंड बनणं, मग परिवर्तन आणि मग सुखान्त. सरसहा हिंदी रजतपटावर दिसणारी ही कथा बंगाली पोशाखात आली आहे, आणि बऱ्याच सौम्य पद्धतीनं सांगितली आहे, इतकंच. जमीनदारी, व्यसनाधीन नायक असून कोठीवरच्या गाण्याची शिक्षा नाही हे काय कमी आहे ? ' आराधना ' पासून शक्ती सामंतनी आपलं वळण बदललं. 'कटी पतंग' चा अपवाद सोडता, कॅबेरे आणि कॉमेडीची मसालेदार फोडणी नसलेले ' स्वच्छ ', साधे सिनेमे ते देऊ लागले. दर्जाने हे सिनेमे फारसे उच्च नसतात; पण किमान चांगल्या अभिरुचीनं काढलेले सिनेमा पाहिल्याचं समाधान ते द्यायचे. शक्ती सामंतची ही परंपरा ' अमानुष ' नं चोख सांभाळली आहे. पण ही ठरीव कथा द्यायला बंगालीतला कुणा नावाजलेल्या कादंबरीकाराचं (शक्तिपद राजगुरू) नाव कशाला हवं ? कुणाही सचिन भौमिक, रंजन बोस वा गुलशन नंदानं या सांकेतिक नाट्याची ' स्टोरी ' शक्तिबाबूंना खचित दिली असती. कमलेश्वरच्या संवादांची तीच गत. असल्या ' दे दणादण ' सिनेमाचे, वरून ओबडधोबड पण अंतःकरणानं लोण्याहून मऊ असलेल्या आणि हल्लीच्या लाडक्या शब्दाप्रमाणे संवेदनक्षम नायकासाठी जोरकस संवाद लिहायला सलीम–जावेदच हवेत. रफ्, सॉलिड कामगार हिरोची भाषा खरोखर जमवावी तर त्यांनी. कमलेश्वरची सौम्य साहित्यिक प्रकृती इथे कमी पडल्यासारखी वाटते.

या सिनेमाबद्दल तथाकथित वेगळेपणाचा आभास निर्माण करणाऱ्या गोष्टी दोन. एक बंगाल प्रांतातल्या सुंदरबनामध्ये केलेलं अत्यंत सुरेख छायाचित्रण. एकाच लोकेशनवर चित्र घेतल्याचा फायदा वातावरण–निर्मितीला मिळाला आहे. दुसरं म्हणजे, शर्मिला टागोर वगळता सगळे चेहेरे कमी ओळखीचे आहेत आणि सगळेच्या सगळे बंगाली आहेत. या एकसंधतेमुळे अस्सल हिंदी सिनेमाचा पूर्वार्ध जापण खपवून घेतो. त्या मानानं उत्तरार्धात ' अमानुष ' चांगली पकड घेतो.

छायालेखक अलोक दासगुप्ताबरोबरच हा चित्रपट प्रेक्षणीय करण्याचं श्रेय घेऊन जाईल उत्पल दत्त. नाटकी बोलण्याची पद्धत, डोळ्यांची धूर्त हालचाल इत्यादी युक्त्या वापरूनच पण जुन्या काळातला लबाड जमीनदार उत्पल दत्तनं अगदी विश्वसनीय वाटावा असा उभा केला आहे. हिंदी सिनेमात खलनायकांकडून इतका सुबुद्ध, इतका सुजाण अभिनय क्वचितच पाहायला मिळतो. साधी ' सरकार ' ही हाक उत्पल दत्त कशी देतो ऐकावं. प्रसंगानुरूप मतलबापुरता आदर तर कधी उपहास आणि कधी जमीनदाराच्या अभिमानातून डोकावणारा राग आणि दुसऱ्याला कमी लेखण्याची वृत्ती–हे सारं त्या एका हाकेतून तो प्रकट करू शकतो, आणि तेही कायिक वा वाचिक अभिनयाचा जराही अतिरेक न करता. ' अमानुष ' नंतर उत्पल दत्तची खलनायक म्हणून मागणी वाढावी, अशी अपेक्षा आहे.

' अमानुष ' उत्तमकुमारकरता शानदार पुनरागमन ठरणार की काय, शंकाच आहे. या सिनेमातला त्याचा सहजसुंदर वावर त्याच्यातल्या जातिवंत नटाची ओळख देऊन जातो. पण उत्तमबाबूंचं बंगाली हिंदी त्यांना दगा देऊन जाणारसं दिसतं. या सिनेमात मद्यपी नायकाचीच भूमिका असल्यामुळं त्याचं अडखळतं हिंदी, जड जीभ ह्या कमजोरी खपून गेल्या. एरवी संवादांचं वर्चस्व असलेल्या हिंदी पडद्यावर उत्तमचं जमणं कठीण आहे. आणि दिलीपकुमार जर ' सगिना ' च्या बंगाली आवृत्तीत बंगाली वळणानं वंगभाषा बोलू शकतो, तर दुसऱ्यांदा हिंदीकडे वळणाऱ्या उत्तमला एवढं जमवायला काय हरकत आहे ?

' अमानुष 'च्या प्रेस-शोनंतर निर्माते-दिग्दर्शक शक्ती सामन्त यांनी पत्रकारांशी बातचीत केली. सिनेमापेक्षा त्याचा प्रोड्युसर अधिक बरा वाटला म्हणायला हरकत नाही. (सिनेमाप्रमाणेच वेगळेपणाचा आभास निर्माण करण्यात शक्ती सामन्त यशस्वी ठरले आहेत खरे.) सलामी अर्थातच सुंदरबनचं चित्रण, त्यासाठी उभारलेली खास छावणी वगैरे संवादानं झाली. बोलता बोलता विषय वाढत गेले. त्यात शक्ती सामन्तांबद्दल आवडाव्या अशा दोनचार गोष्टी नजरेस आल्या. हा माणूस ठणकावून बोलणारा आहे. ' आणि हे ऑफ द रेकॉर्ड हं '... ते फक्त तुमच्या – आमच्यातलं बोलणं हा प्रकार नाही. ' मी कमर्शिअल पिक्चरच काढतो आणि काढत राहाणार ' हे कबूल करायला त्याला कमीपणा वाटत नाही. सब्सिडी प्रकारावर त्याचा विश्वास नाही. ' भगवानने हमें सबकुछ दिया है ' असला डायलॉग मारीत तो ठणकावून सांगतो, सब्सिडीमुळे चांगला सिनेमा बनतो हे खरं नव्हे. तो चांगला ठरतो दिग्दर्शकामुळे. विनोदी सिनेमा हा आपला प्रांत नव्हे याची तो कबुली देतो. जाता जाता एक शंका मात्र आहे. ' भगवानने हमें सबकुछ दिया है ' म्हणून कर्जाऊ मदत नाकारणाऱ्या आणि लाखोवारी रुपयांचा कँप उभारून सुंदरबनचं सुरेख चित्रण करणाऱ्या निर्मात्यानं सहनायिकेला नृत्यप्रसंगी प्लॅस्टिकचं फूल घालायला लावावं हे बरं दिसतं का ? ▪▪

# सहज दिसले, लिहिले : पृष्ठ ६ वरून

डीकरालोकला माझ्या फ्लॅटवर आणला जेवायला खायला दिला घरातला सगळा कापड तेनला दिला तर बाजूच्या तुमच्या तो ×××× मराठी कामगार पुढारी हाय ना तेच्या साला पोटात दुखायला लागला. सगळा घर घाण केला म्हणून त्याच्या बायडी न् तो बोंब मारत होता पण कुणाला चायच्या कप दिला नाय. परवाच्या कॉरपोरेसनच्या इलेक्शनमंधी मला शिव्या द्यायला लागला तर लोकांनी दगड मारून तेच्या डोका फोडला. साला पुढारीच्या धंदा लय वाईट. तेच्यापेक्षा सरळ सरळ फोरासरोडच्या धंदा च्यांगला. साला असला लोक निवडून येल तर गरिबाच्या कसा च्यांगला होणार.'

हळूहळू मीसुद्धा त्याच्या बकवासाला न कळत सरावू लागतो. मी विचार करतो एवीतेवी याचे तोंड काही बंद होत नाही. मग त्याला जरा चावी मारावी. थोडचा फिरक्या घ्याव्यात. वादाला तेवढाच रंग चढेल.

'तुमच म्हणणं बरोबर आहे शेठ. पण राजकारण तर सगळ्याच देशात चालते. सारेच पुढारी नंगे असतात. लोकांनी त्यांची पर्वा तर केलीच पाहिजे. निवडून आल्यावर ते थोडेच लोकांकडे जातात. लोकच त्यांच्याकडे येतात. आता लोक त्यांच्याकडे आपणहून जातात त्याला काय करणार'

'साला तू सर्कस बघतो का नाय. तेच्यामंदी ते पोरीलोक कमीत कमी कपडे घालून कसरत करून दाखविते. पब्लीकच्या डोका फिरते का ? साला कॅबेरे मंदी ते पोरगीलोक सर्कसपेक्षा ज्यादा कपडा घालते पण पब्लीकच्या डोका फीरते का नाय ? साला सर्कस तो सर्कस आन कॅबेरे तो कॅबेरे. हा तुझ्या पुढारी लोक तसा हाय. सर्कसमंदी जायचा तो कॅबेरे करत फीरतो. आज या हॉटेलमदी तो उद्या त्या हॉटेलमंदी. या तुझ्या पुढारीलोकपेक्षा साला माझ्या घाटी बरा' ◻

गाडी आता खंडाळ्याचा घाट चढू लागते. नाही म्हटले तरी गेली पंधरा वर्षे याच घाटातून मी वर खाली केलेले आहे. सदोदीत रम्य वनश्रीने नटलेला हा रस्ता दर वेळी डोळे भरून पाहिला आहे. रस्त्यात इतर कोणत्याही जागी डुलक्या काढल्या आहेत; पण घाटांतील नेत्रसुख मी अद्याप चुकू दिलेलं नाही. महानगरीच्या व तिच्या नाना लीलांच्या, नाना कलांच्या दर्शनाने तापलेले डोळे या गर्द राईत नेहमीच निवतात. हा मोका अद्यापपर्यंत मी सोडलेला नाही. पण गेले वर्षभर या रस्त्यावर एक सूक्ष्म बदल होत गेला. भारतात गरीब अधिक गरीब होत असल्याच्या बातम्या पेपरमध्ये वाचत होतो. पण गेले वर्षभर घाट चढता उतरताना ते जाणवत होते. मला आठवतं, साधारण वर्षापूर्वी घाटात फारच तुरळक भिकारी दिसत होते. लांबून गाडी येताना पाहून एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणे त्यांचे हात हलू लागत. गाडी पुढे गेली की आपोआप बंद होत. देशाची लोकसंख्या वाढत होती. त्याबरोबर येथील भिकारी-संख्याही वाढत होती. आता तर जवळजवळ तीसेक हात खंडाळ्यापासून खोपोलीपर्यंत हालताना दिसत. या लोकांना पैसे कोण टाकते याचे मला बरेच दिवस कोडे होते. मी तर कोणालाही अद्याप पैसे देताना पाहिले नव्हते.

वळणावरील पहिल्याच 'हाताशी' गाडीची गती कमी झाली. सहज मागे वळून पाहिले तर उनवालाशेठ ॲल्युमिनिअमचा डबा उघडून मांडीवर घेऊन बसले होते. डब्यात आठ-आठ आण्यांची बरीच नाणी दिसत होती. ड्रायव्हरला सांगायला लागलेच नाही. कडेच्या भिकाऱ्याच्या जवळून ड्रायव्हरने गाडी घेतली. उनवालाशेठने सराईतपणे एक अधेली हात लांब करून फेकली. गाडी पुन्हा वेगात आली. ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे उनवालाने खैरात केली. म्हणजे जे लंगडे–पांगळे दिसत होते, त्यांना दोन-दोन अधेल्या मिळाल्या. ज्यांनी भीक मागण्याचा धंदा उघडला होता, त्यांना एकेक अधेली मिळून गेली. न बोलता, न टीका करता मी अलिप्तपणे पाहत होतो. त्याच्या उदारतेचे मला कौतुक वाटत नव्हते. नकळत माझ्या कपाळावर एक आठी चढली होती. उनवालासारख्या खुशालचेंडूंमुळे या भिकाऱ्यांना उत्तेजन मिळते, असा माझा ठाम समज होता. याबाबतीत मी कितीतरी वेळा याच रस्त्यावर असाच फ्रंटसीटवर बसून बोललो होतो. प्रत्येक वेळी इतर सहप्रवाशांनी दाद दिली होती. आता मी घाट संपायची वाट पाहू लागलो. हा साला उनवाला मुंबईपासून त्याची तत्त्वे मला पाजीत होता. आता माझी पाळी होती. उनवालाबद्दल मला आकस होता असे नव्हे; पण एकदा तरी त्याला निरुत्तर केल्याचा आनंद भोगणार होतो.

'गेल्या वर्षभरात या भिकाऱ्यांची संख्या फारच वाढलीय नाही ?'

'हा बाबा. ते तिकडे नरिमन पॉइंटवर साला मल्टी स्टोरीड इमारती सरकार बांधते. साला गरिबाचा पैसा काढते अन् तिकडे इमारत बांधते, पैसा कमावते. 'गरीब साला आणखी गरीब होते, भीक मागते.' आता मुंबईच्या नरिमन पॉइंटचा, सरकारचा आणि भिकाऱ्यांचा कसा संबंध लागत होता कुणास ठाऊक ?

'आपण त्यांना भीक नाही घातली पाहिजे. अशाने त्यांना उत्तेजन मिळते. सरकारने आता भिकाऱ्यासाठी नव्या योजना सुरू केल्या आहेत. त्यांच्यासाठी Beggar's Home बांधली आहेत. तिथे हे भिकारी आपण होऊन नाही गेले तर त्यांना पकडून नेले पाहीजे. सरकारची तरी काही जबाबदारी आहे की नाही ?' त्याला निरुत्तर करण्यासाठी मी म्हणालो.

'तुमी लोक साला नुसते शिकते. साला डोका वापरत नाय. महाराष्ट्रात दोन, तीन लाख भिकारी असल. तेंना ठेवायला तुझ्या बेगर होम पुरा पडतो काय ? दोन तीन लाख भिकाऱ्यांना जेवायला द्यायच्या, साला, सहा सात लाख रुपाया रोजच्या लागेल, साला सरकार झ्याला तरी काय ? पैसा काय मच्छी पकडते तसा पकडतो काय ? सरकारला समजत नाय काय ? आता हे बराबर, की काय नको करू ते सरकारला समजतो पण काय करू हे सरकारला नाय समजत. ते त्याला नाय समजत म्हणून आपण आपला काम करायचे. तेंना जमल तेव्हा, जमल तेव्हढा पैसा द्यायचे.'

आता माझं कुतूहल जागे होते. सरकारनी

काय केलं पाहिजे ते सरकारला माहित नाही. मग काय या अनुवालाशेठला माहित आहे की काय ? मी उत्सुकतेने पुढे ऐकू लागतो.

खरा म्हणजे साला बेगरच्या ॲक्टच बदलला पायजे. बेगीग साला लॉफूल केला पायजे. साला पानपट्टीच्या दुकानाला लायसेन्स लागते आन बेगर तसाच भिक मागते.'

'वा वा उनवालाशेठ, लायसेन्स काढायला भिकाऱ्याने वर्गणी कुठून आणायची ?' उनवालाशेठला रॉंगफूटवर पकडल्याचे समाधान मला मिळते पण ते अक्षरशः क्षणभरच.

'या बेगरसाठी लायसेन्स फी बेगरने नाय द्येयाची सरकारने द्यायची. या साला बेगरच्या बालवच्च्या कधी काम नाय करणार साला सुधारणार नाय. तेनला लहानपणापासून हात कप्पाळाला लावायच्यात शिकवलेला. ते तरी काय करनार.'

लहानपणी इंजनाच्यासमोर मोठा लोहचुंबकाचा गोळा ठेवणारा चि. वि. जोशांचा पारशी मला आठवू लागला. आता मला उनवालाच्या डोक्याची सुद्धा खात्री वाटू लागली. भिकाऱ्यांची लायसन्स फीही सरकारने भरायची. वाः वा:

'साला फॅमिली प्लॅनिंग डीपार्टमेंटच्या सर्टिफीकेट बगर लायसन् नाय दीला पायजे. ऑप्रेशन केला की लायसन द्येयच्या. ऑप्रेशन केला की पैसा द्येयचा. आज बेगर लोकांची संख्या वाढते त्याला एकाएकाला आठ आठ पोरे होतात हा पण कारण महत्त्वाचा आहे. एकदम बेगरी तो खल्लास नाय होते हे मला बी समजते. पण हळू हळू ट्राय तो केलाच पाहिजे ना ? साला दहा वर्षांनी नवा बेगर रस्त्यावर येणार नाय असा नाय पण नव्या बेगरची पैदास तो थांबेल की नाय ? साला ऑप्रेशनमध्ये काय पाप बी नाय. साला पेपरमंदी जाहिरात करून सिनेमात जाहिरात करून तुज्या माझ्यासारखा लोक बघते, ऑप्रेसन न करता प्लॅनिंग करते. तो जाहीरातीचा पैसा बचेल तो या लोकला दे. साला नाय म्हणाला तो तुमी तो सक्ती केला पाहिजे. सरकार असा करेल तर आपण आपला जायदाद सरकारला लिहून देल. आज लागलीच तो नाय पण पंचवीस वर्षांने बेगरच्या प्रॉब्लेम खल्लास शय्यूच जुवे.' उनवाला आवेशाने जिद्दीने बोलत होता. मला उत्तर सुचत नव्हते. त्याचा युक्तिवाद बिनतोड होता. माझा पुन्हा पराभव झाला होता. ◻◻

अनंत तात्याबा कऱ्हाडकर. कऱ्हाडातील एक जबरदस्त असामी. पन्नाशी ओलांडलेली. साधारण बुटक्यांतच जमा, वर्णाने काळा, डोळ्यांत कावेबाज भाव, बोलताना एकच भुवई उगाचच उडवण्याची लकब. तोंडात तंबाखूचा तोबरा अव्याहत. डावा तळहात व उजव्या हाताची तर्जनी तंबाखू व चुना मळून मळून पिवळी पडलेली. कऱ्हाडातला कोणीही माणूस अनंतरावांच्या कपड्यांचे वर्णन सांगताच ताबडतोब त्यांना ओळखीत असे. त्यांचा वेषही गेल्या वीस वर्षात बदललेला नव्हता. खादीचे पांढरे शुभ्र धोतर, पांढरा सदरा त्यावर पांढराच कोट व डोक्यावर शुभ्र परीटघडीची कोचदार गांधी टोपी. काही लाखांची ही असामी वेगळ्या वेगळ्या संस्थांची श्रेयनामावली भूषवीत होती. साहेबांच्याबरोबर काढलेले फोटो घराच्या दिवाणखान्यात वेगवेगळ्या ठिकाणी लटकत होते. काही फोटोत दस्तुरखुद्द साहेब गैरहजर होते पण साहेबांचा थेट वरदहस्त आहे, ते दाखविण्यासाठी मागे भिंतीवर अथवा शेजारी खुर्चीवर साहेबांचा मोठा फोटो ठेवून अडचण निभावून नेलेली होती.

अनंत तात्याबा कऱ्हाडकरांचे आतापर्यंतचे आयुष्य म्हणजे एक success story होती. वीस वर्षांपूर्वीची केव्हातरी सरकारी हजेरीत रोजंदारीवर असलेल्या स्टोअरच्या staff ची यादी पाहिलीत तर त्यात अनंत तात्याबा निगोणे हे नाव तुम्हाला पहावयास सापडेल. स्टोअरच्या Records मध्ये व कामगारांच्या हजेरीत हातचलाखी करून झाल्यावर यथावकाश अनंत तात्याबा निगोणे यांनी रोजंदारी संपवली. रोजंदारी संपवल्यावर यथावकाश एका सरकारी राजपत्रात आलेल्या कलमानुसार अनंत तात्याबा निगोणे हे अनंत तात्याबा कऱ्हाडकर झाले. हळूहळू रस्ते बांधण्याची कामे घेऊ लागले. नाव कमावले. माळावर एखाद्या अजगरासारखा सुस्तावलेला रस्ता तयार झाला, की मोठा छान गुळगुळीत दिसे. पण प्रत्यक्षात तयार झालेल्या रस्त्याची जाडी व रस्त्याची रूंदी व बिलाकरता नोदलेली जाडी व रुंदी यांचा मेळ क्वचितच बसत असे. जाडी जवळजवळ दोन इंचाने कमी असे तर रुंदीत साधारणपणे एक इंचापासून एक फुटापर्यंत फरक पडत असे. मैलोगणती रस्ता अनंत तात्याबा कऱ्हाडकर बांधत असत.

कोणी एका अतृप्त आत्म्याने एकदा एका चीफ इंजिनिअरकडे रस्त्याच्या ५६ मैलापासून ५९ मैल फर्लांगापर्यंतच्या तुकड्याबद्दल तक्रार केली. दस्तुरखुद्द चीफ इंजिनीअर तपासणीसाठी येणार म्हणून कळताच रातोरात मैलाच्या दगडावरील खुणा बदलल्या गेल्या व नमुन्यासाठी तयार केलेल्या रस्त्याच्या दोन्ही टोकांना ५६ मैलापासून ६० मैलापर्यंतचे दगड बसले. कसून तपासणी झाली पण अनंतरावांचा रावपणाच सिद्ध झाला.

हातावर पोटे घेऊन काम करणाऱ्या कामगारांना हिशेबात मारणे, फुकट मिळणारे सरकारी डांबर शहरात काम करणाऱ्या इतर कंत्राटदारांना किफायतशीर भावात विकणे, इत्यादी प्रकार अनंत तात्याबा कऱ्हाडकर सहजपणे करत असत. त्यांचा बारदानाही तसाच मोठा होता. कऱ्हाडच्या बाहेर झेंडमाच्या माळावर चांगले वीस पंचवीस खोल्यांचे घर होते. पंधरा वीस नोकर माणसे अन्नावारी घरात राबत होती. दहा पंधरा म्हशी दावणीला बधलेल्या असत. नडीतांची ये जा तर सततच असे पण गावातील प्रतिष्ठीत समजले जाणारे पुढारी सकाळ संध्याकाळ अनंतरावांकडे सलामीसाठी येत. अनंत तात्याबा कऱ्हाडकरांना दोन बायका होत्या. म्हणजे लग्नाच्या. तशी आणखी दोन-चार घरे त्यांची कऱ्हाडात होती हे वेगळे. पण या लग्नाच्या. दोघीही बहिणी बहिणी. अनंतरावांकडे धाकटी रहायची. लग्नाआधीपासून मोठीची धाकटी बहीण म्हणून. सोळा सतरा सालाबरोबर लग्नासाठी म्हणून आली आणि तिची विकेट अनंतरावांनीच उडविली. तस पाहिलं तर मधलीची विकेटसुद्धा अनंतरावांनीच काढली. पण गावात फार बोभाटा होईल म्हणून आपल्याच खालमाने कारकुनाचे लग्न तिच्याशी करून दिले. दुहेरी फायदा. अनंतरावांना दोघेच मुलगे. एक मोठीचा. एक धाकटीचा. दोघेही आता हातातोंडाशी आलेले. हळूहळू दोघेही अनंतरावांच्या तालमीत तयार होत होते. पण एकमेकांशी पटत नव्हते. धाकटीचा जरा जास्त मतलबी. ७२ च्या म्युनिसिपालटीची निवडणूक लढवण्याच्या खटपटीत आतापासूनच होता. वडिलांचा वरदहस्त मागे होता. मोठीचा मुलगा धंदा सांभाळून होता. धंदा कोणावर सोपवावा या विवंचनेत अनंतराव होते.

होता होता ७२ साल उजाडले. पुणे बंगलोर रस्त्याचा कायापालट करण्यासाठी वर्ल्डबँकेचे लोन मंजूर झाले. टेंडरे फुटली आणि पुणे कोल्हापूर रस्त्याचे काम अनंतरावांना मिळाले. अनंतरावांनी काम धडाक्याने सुरू केले. हळूहळू दिवस पालटत होते.

नवा विचार घेऊन नवे बदल घेऊन ७३ साल येत होते. नवा कार्यकारी अभियंता अनंतरावांना चांगलाच ओळखून होता. पैसा जिरवण्याच्या अनंतरावांच्या क्लृप्त्या चालू शकत नव्हत्या. ७३ साल नव्या अडचणी घेऊन आ वासून उभे राहिले. दुष्काळी परिस्थितीमुळे मजूर अतिशय कमी दरात कामे करीत परंतु इतर भाव वाढू लागले. साध्या कुदळी, फावडी, लोखंडी फऱ्यांचा भाव चांगलाच वधारला. शिवाय जोडीला त्रास द्यायला कार्यकारी अभियंता व त्याची भुतावळ होतीच. कोणत्याही आक्रीबाच्या गळाला कार्यकारी अभियंता लागत नव्हता. त्याला फक्त चोख काम हवे होते. त्याची खुषी फक्त तेवढीच होती. साहेबही अनंतरावांच्या अडचणीत कामी येत नव्हते. आलतूफालतू ग्रामसिहाची मात्रा चालत नव्हती. सुरू केलेले काम बंद करता येत नव्हते. दिवसेंदिवस आवक कमी होत गेली. महागाईने आता चांगलेच डोळे वटारले. दिवाळी समोर येऊन उभी होती. अधिक उणे खर्च होत होते. रस्त्याची प्रगती रुटू खुटूच चालू होती. कार्यकारी अभियंता पराणी घेऊन मागे लागला होता. होता होता घर, दार, शेती, म्हशी विकाव्या लागल्या. पुढारी गावात दुसरीकडे राहावयाला गेला. मोठा तोंडे चुकवू लागला. ७४ साल उजाडले पण ७३ साल गेले ते अनंतरावांचा सारा दिमाख, सारी हिम्मत घेऊनच. अनंतरावांकडे रस्ता पुरा करण्यासाठी तर राहूद्याच पण घर चालविण्यासाठीही पैसा राहिला नाही. जमलेल्या मधमाशा मध संपल्यावर उडून गेल्या. घराला अवकळा आली. चेहेऱ्यावरील पुष्टी गेली. परीटघडीचे कपडे दिसेनातच इतकेच नव्हे तर त्यातल्या त्यात मळखाऊ रंग पैदा केले गेले. पूर्वी सलामीसाठी येणारे प्रतिष्ठित आता अनंतरावांना टाळू लागले. जिथे फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचायची पाळी आली.

अनंतरावांच्या अधोगतीने पुणे-कोल्हापूर रस्त्याची तर पारच वाट लागली होती. S. T. वाले, गाडीवाले, ट्रकवाले सरकारला न मोजता शिव्या घालीत होते. अनंतरावांनी रस्त्याचा पार चम्मनगोटा करून ठेवला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खडीचे ढीग पडलेले होते. एकूण रस्त्याला आशीर्वाद तर बरे होते. आता हे आशीर्वाद केव्हा फळाला येतील कोणास ठाऊक. या रस्त्यावर झाडाखाली अनंतराव येऊन उभे होते. अंगावरून धूळ उडवत सारी रहदारी चालू होती. रस्त्याकडे अगदी बघवत नव्हते. आल्या परिस्थितीतून कसे बाहेर पडावे हे सुचत नव्हते. विचार करता करता अनंतरावांनी मनाशी निश्चय केला आणि ते टेकडीच्या रोखाने चालू लागले. जरा चांगलेसे एका बाजूला असलेले झाड त्यांनी निवडले. त्याच्याखालची जागा जरा साफसूफ करून पद्मासन घालून खाली बसले. पद्मासन घालून खाली बसायला चांगलाच त्रास होत होता. गुडघ्यांना रग लागली. फारसे लक्ष न देता तसेच मारून मुटकून बसले. दोन्ही हात जोडले, डोळे मिटून घेतले. अनंतरावांचे तप चालू झाले.

दिवसामागून दिवस गेले. पावसाळ्यामागून पावसाळे उलटले. श्रीहरीला काही पान्हा फुटेना. अनंतरावांचे तप संपेना. रस्ता मात्र होता तिथेच होता तसाच पडून होता. रस्त्याच्या कडेच्या पंक्चर काढणाऱ्या अण्णाच्या धंद्याला चांगलीच बरकत आली होती. टायरांचे कारखाने माल जोरात खपवत होते. नुकत्याच झालेल्या बजेटमध्ये प्रत्येक काढलेल्या पंक्चरवर सरकारने एक्साईज बसविली होती. प्रवाशांच्या हालांना सीमाच राहली नव्हती. होता होता आणखी एकदोन पावसाळे असेच गेले. आणि अनंतरावांवर प्रसन्न होऊन म्हणा किंवा साऱ्या प्रवाशांनी भाकलेल्या करुणेचे फळ म्हणून म्हणा. श्रीहरि अनंतरावांवर प्रसन्न झाले.

'बालका अनंता. उठ, मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. चित्रगुप्ताच्या वहीत तुझ्या नावावर कोणतीच जमेच्या बाजूला नोंद नव्हती. त्यामुळे तुझ्यावर प्रसन्न होण्याविरुद्ध चित्रगुप्त होता. पण निदान तुझ्यामुळे लोकांना देवाची आठवण होऊ लागली. या रस्त्यामुळे उघडपणे माझे नाव लोक जाता येता घेत असत. त्यांची करुणा माझ्यापर्यंत पोचली म्हणून मीच चित्रगुप्ताच्या गैरहजेरीत त्याच्या कारकूनाकडून तुझ्या खात्यावर आवश्यक त्या नोंदी चढवल्या. तेव्हा भक्ता आता उठ, तुला जे काय माझ्याकडे मागायचे ते एकदाच माग. स्वत:साठी काही मागू नकोस. अगोदरच तुझे रेकॉर्ड खराब आहे ते आणखी खराब करू नकोस.'

प्रसन्नवदनाने श्रीहरि अनंतरावांसमोर उभे होते. अनंतरावांच्या चेहेऱ्यावर आता काळजी पसरली होती. श्रीहरि तर म्हणत होते स्वत:साठी काही मागू नये. आता हे कसं शक्य होतं. इतकी वर्षे तप काय उगाच केलं. दोन्ही बायका घरी वाट पहात असतील. मुलाबाळांचं काय चाललं असेल ? कार्यकारी अभियंत्यालाही धडा शिकवायला हवा होता. काही सुचेनासं झालं होतं. अधोवदनाने बिचारा अनंतराव उभा राहिला होता एव्हढा श्रीहरि प्रसन्न झाला होता पण कोणता वर मागावा हे काही अनंतरावाला सुचत नव्हते.

'बोल, लवकर बोल वत्सा, इतर भक्त मंडळी खोळंबली आहेत.' भगवान श्रीहरि म्हणाले.

आणि एकाएकी वीज चमकली. अनंतरावांच्या डोक्यातील ट्यूब लाईट पेटली. चेहेऱ्यावर ओशाळं हसू आले. खांदे जरा जास्तच ओघळले. डोळ्याची एकच भुवई वरखाली होऊ लागली. आणि अनंतराव म्हणाले–

'देवा, मला एकच ध्यास लागला आहे. हा पुणे कोल्हापूर रस्ता आहे ना ! याचा उद्धार माझ्या मोठ्या मुलाकडून व्हावा व त्याचे उद्घाटन माझ्या धाकट्या मुलाकडून व्हावे. लोकांचा त्रास काही दिवस तरी संपावा. अशा रीतीने निदान माझे व माझ्या मुलाबाळांचे जीवन लोकांच्या कारणी लागावे.'

मोठीचा मुलगा रस्त्यांची लहानसहान कामे करतो असे ऐकतो. धाकटीचा मंत्रीपद मिळवण्याच्या खटाटोपात सध्या गुंतला आहे. अनंतरावही अधूनमधून दिसतात. श्रीहरि अनंतरावांना तथास्तु म्हणाले की नाही हे मला ठाऊक नाही. पण रस्त्याची धूळधाण चालूच आहे. प्रवासी न मोजता सरकारला शिव्या देतच आहेत. काढलेल्या पंक्चरमागे सरकारचा खजिना वाढतोच आहे. पंक्चरवाल्या अण्णांच्या इमारतीवर न चुकता मजला चढतोच आहे. पुणे कोल्हापूर मार्गावरच्या प्रवाशांनी घेतलेल्या देवाच्या नावामागे प्रत्येकवेळी अनंतरावांना क्रेडीट मिळते आहे. आता केव्हा अनंतरावांचा मुलगा मिनिस्टर होणार, मोठीचा मुलगा केव्हा रस्ता बांधणार व केव्हा त्याचे उद्घाटन होणार ! प्रवाशांच्या नशिबात मात्र पुढील काही वर्षे भरपूर धूळ आणि धूळ आणि धूळ.

☐ ☐

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर